1.46
/MF/2002
0099



*संवादिनी २००२

ग्रंथमोजणी
२००७-८: २०|३|८
२००८-९: १४|१५|८
२००९-१०
२०१०-११: १०-२-११

24 JUN 2007

६०१९

*जगाच्या पाठीवर*
*कुठेही असला तरी*
*महाराष्ट्राच्या मातीला,*
*मराठी मायबोलीला*
*जो विसरला नाही,*
*त्या मराठी*
*माणसाच्या 'मम'त्वाचे*
*हे सुचिन्ह!*

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
मराठी साहित्य पुरस्कार योजनेसाठी
चित्रकार शांताराम पवार यांनी तयार केलेले बोधचिन्ह

**संपादक**
दिगंबर पाध्ये

**संपादन साहाय्य**
अरुणा दुभाषी

**मुखपृष्ठ व आतील अक्षरे**
शांताराम पवार

**मुखपृष्ठ संकल्पना**
विरामांचे देखणे संभाषण

**मांडणी**
सुहास मोरे

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ

ग्रंथमोजणी
२००२-३ : २०/३/२००३
२००३-४ : २८·३·४
२००४-५ : २९/३/५
२००५-६ : ३१·२·६
२००६-७
२००८-९
२००९-१०
२०११-१२
२०१३-१४
२०१५-१६

**मुद्रक** २०१६-१७
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

**प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२

केशव गोरे स्मारक ट्रस्ट
आयोजित
**महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)**
**मराठी साहित्य पुरस्कार**
**प्रदान समारंभ**

6099

अध्यक्ष : **डॉ. भालचंद्र नेमाडे**

प्रमुख पाहुणे : **डॉ. इंदिरा गोस्वामी**

सूत्र संचालन : **शैला मुकुंद**

शुक्रवार दिनांक २४ जानेवारी २००३
सायंकाळी ५.३० वाजता । बालगंधर्व नाट्य मंदिर, पुणे

''लिहिणं माझ्या रक्तातच आहे. नसांतून वाहतं. लिहिणं थांबलं तर मी गुदमरेन. लिहिणं नसलं तर मी मरेनच. लेखणीसोबत मी मुक्त असते. कुठंही उडण्यासाठी. पाखरासारखी. कुणीही होण्यासाठी. समजून घेण्यासाठी. कुणालाही.''

ज्ञानपीठ विजेत्या आसामी लेखिका इंदिरा गोस्वामींसाठी हे शब्दश: खरे आहे. त्या आसामी भाषेतून लिहितात हे खरे असले तरी त्या सर्वार्थाने आजच्या महत्त्वाच्या भारतीय लेखिका आहेत. जम्मू-काश्मीर, गुजरात, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश अशा विविध भारतीय प्रदेशातल्या मातीचा वास त्यांच्या दिल्ली,

समारंभाचे प्रमुख पाहुणे

# इंदिरा गोस्वामी



आसाम साहित्यांतून दरवळताना दिसतो. आधीच्याच प्रकाशित बिसाहून अधिक कादंबऱ्या, कितीतरी कथा, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे संशोधन, शोधनिबंध, देशी आणि विदेशी भाषांतून केलेले अनुवाद अशा विपुल आणि कसदार साहित्यनिर्मितीची पन्नासच्या आसपासची ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर प्रकाशित आहे. आणि लिहिणं तर आजही सुरूच आहे. त्यांच्या श्वासोच्छ्वासासारखंच अखंड आणि निरंतर.

१४ नोव्हेंबर १९४२चा त्यांचा जन्म. गौहतीतल्या जमीनदार घराण्याचा वारसा. हवेलीच्या दारात हत्ती झुलायचे. विद्वान वडील. पण ते त्यांच्या लहान वयातच वारले. या पहिल्या आघाताने त्या हादरल्या. आत्महत्येचा एक असफल प्रयत्नही झाला. पण लवकरच त्या सावरल्या. परिसरातल्या जमीनदारी, सरंजामदारी वातावरणाचे बंध झुगारून त्यांनी तरूण वयातच माधवन अय्यंगार या दक्षिण भारतीय इंजिनिअर तरूणाशी विवाह केला. विवाहानंतर काही काळ गुजरात आणि नंतर नवऱ्यासोबत जम्मू-काश्मीरमध्ये वास्तव्य केले. पण अल्पकाळाचे सहजीवन नवऱ्याच्या अपघाती मृत्यूनंतर संपले. हा आघात अधिकच जीवघेणा होता. यातून सावरण्यासाठी त्यांची लेखणीच त्यांच्या मदतीला आली. आसामी भाषेचे नामवंत लेखक-संशोधक उपेंद्र लेखारू यांच्या रामायणासारख्या संशोधनात त्यांना मदत करण्यासाठी त्या मथुरा-वृंदावनात आल्या. रामायणावरल्या अभ्यासाचा हा धागा त्यांनी आयुष्यात पुढेही धरून ठेवला. 'रामायण : गंगा ते ब्रह्मपुत्रा' हा ग्रंथ. शिवाय वृंदावनातल्या विधवा स्त्रियांच्या आश्रमांचे त्यांनी जवळून निरीक्षण केले. विधवा आणि तरूण असणं हा त्यांचाही साक्षात अनुभव होता. त्या अनुभवाच्या सगळ्या जीवघेण्या वेणा त्यांच्याही परिचयाच्या होत्या. आसामातल्या ब्राह्मण कुटुंबातल्या अनाथ विधवा त्यांच्या कुटुंबियांकडूनच वृंदावनात सोडल्या जायच्या. त्यांची आश्रमातील अवस्था सगळ्या शोषणांनी भरलेली असायची. मेल्यावर अंत्यसंस्कारांतून 'मुक्ति' मिळावी या एकाच आशेवर त्या रस्त्यावर भीक मागत आयुष्य संपवायच्या. आश्रम तर छळ छावण्याच होते.

त्यांच्या साहित्यात सर्वांगीण शोषणाचा मुद्दा हा नेहमीच अग्रक्रमाने आला आहे. ब्रह्मपुत्रा, गंगा, चिनाब, अहिरन, सार्त या नद्यांच्या काठावर त्यांनी आयुष्यातले अनुभव घेतले. नदीशी त्यांचे अतूट असे नाते आहे. त्यांच्या एका कथासंग्रहाचे नावच 'हृदय एक नदीह नाम' असे आहे. नद्यांवरची बांधकामे, तिथले मजूर, व्यवस्थापक, संघटनेचे नेते, वसाहती अशा वातावरणाला कवेत घेणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या आहेत. त्यातलीच एक 'मामरी धारा तरोवाल', (गंजलेली तलवार). वृंदावनामधल्या विधवांवरची 'नीलकंठी ब्रज', दक्षिण कामरूपची गाथा म्हणूनच ओळखली जाणारी 'उने खोवा होवदा' अशा अनेक कादंबऱ्या. 'छिन्नमस्ता' ही अगदी अलिकडची कादंबरी. कामाख्या मंदिरातल्या पशुबली प्रथेचा विरोध करणारी. त्या कादंबरीचा थेट परिणाम समाजावर झाला. पशुबलीप्रथेविरुद्ध स्त्रियांनी, तरूणांनी आंदोलने केली. कामाख्या मंदिरात नेपाळच्या राजालाही पशुबलीपासून दूर जावे लागले.

त्यांच्या या साहित्याला साहित्य अकादमी, साहित्य सभा, आंतरराष्ट्रीय ज्यूरी अवार्ड, रविंद्र भारती सन्मान ते ज्ञानपीठ असे सन्मान मिळाले. पद्मश्रीही मिळाली; आणि त्यांनी ती नाकारलीही दूरदर्शन, चित्रपट अशा माध्यमांतून त्यांचे साहित्य लोकांसमोर आले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिसंवादांतून त्यांचा सहभाग वाढला. तरूण वयातच - ६० वर्षे पूर्ण होण्याआधी - 'ज्ञानपीठ' मिळाले. या आक्षेपावर त्यांचे उत्तर 'उशीराच मिळाले' असे होते.

सगळ्या भारतीय भाषांसाठी त्यांचे लेखन ही सन्मानाची गोष्ट झाली आहे. स्वत:च्या आयुष्याकडे निर्दयपणे पहाण्याची ताकद, जगणे आणि त्यातले सगळे ताण व्यक्त करण्याचे कलात्मक बळ, परिसराची विविधता, शोषणाची गुंतागुंत ओळखण्याची चिंतनक्षमता हे सगळे येत असताना त्यांच्या साहित्यात जगाविषयी तुच्छताभाव, कडवटपणा नसतो. तर असते अपार करूणा, सहभाव आणि समजूतदारपणा. 'आधा लेखा दस्तावेज' या आत्मचरित्रात हे सगळे पहाता येते. अजून पुढली वर्षे सांगायची बाकी आहेत. आणि त्या तर लिहितच आहेत. त्यांच्याविषयी असे म्हणणे - ''तिच्या भावना, तिची दु:खं आणि आठवणी तिच्या लेखनांतून नदीसारख्या वाहतात. पृथ्वीच्या आदिम सत्याचा भागच होतात. तिच्या एकटेपणात सगळं जग श्वासोच्छ्वासाइतकं महत्त्वाचं होतं.''

❑

महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कारांचे हे नववे वर्ष आहे. गेल्या आठ वर्षात जाहीर झालेल्या पुरस्कारांचे मराठी साहित्य जगतात जसे स्वागत झाले तसेच या वर्षातील पुरस्कारांचेही झाले ही गोष्ट निश्चितच आम्हाला आनंद देणारी आहे.

गेल्या वर्षी डॉ. भालचंद्र नेमाडे यांना दिलेला पुरस्कार प्रामुख्याने ललित साहित्याच्या क्षेत्रातील कार्याबद्दल होता. या वर्षीचा प्रा. ग.प्र. प्रधान यांना देण्यात येणारा पुरस्कार हा प्रामुख्याने वैचारिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दलचा आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून आधुनिक भारतीय समाजाच्या जडणघडणीला आधारभूत मूल्यांचा उदय झाला. चळवळीच्या काळात समाजाला त्या मूल्यांची जाणीव होती. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात क्रमाक्रमाने ही जाणीव क्षीण होऊ लागली. अलिकडच्या काही वर्षात तर त्याचा प्रत्यय पदोपदी येऊ लागला आहे. एवढेच नव्हे तर साधेपणा, प्रामाणिकपणा या सारखे गुणही केवळ बिनमोलाचे नव्हेत तर कधी कधी थट्टेचा विषय होऊ लागले आहेत. स्वातंत्र्य चळवळीतून उदयाला आलेल्या मूल्यांची व गुणांची घसरण होत असण्याच्या या काळात ती मूल्ये व गुण समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचविण्याचे मोठे कठीण कार्य प्रा. ग. प्र. प्रधान यांनी आयुष्यभर केले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करीत असताना कृतज्ञतेचीच भावना आमच्या मनात आहे.

महाराष्ट्र फाउण्डेशनची ही 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' असल्यामुळे पुरस्कारांसाठी नावांची शिफारस करीत असताना साहित्याची गुणवत्ता लक्षात घेतली जातेच. परंतु ही पुरस्कार योजना म्हणजे मराठी साहित्यिकांची स्पर्धा नाही. म्हणूनच विविध पुरस्कारांसाठी शिफारसी करताना साहित्यिकांचे एकूण कार्य, साहित्यकृतीमध्ये जाणवणारी प्रयोगशीलता, विषयाचा नवेपणा, आजच्या साहित्य व्यवहारातील महत्त्व अशा अनेक गोष्टींचा विचार करण्याची पद्धती सुरुवातीपासूनच ठेवली आहे. म्हणूनच या नऊ वर्षांत मराठी साहित्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील ग्रंथ व ग्रंथकार या पुरस्कारांचे मानकरी झाले आहेत. गेल्या नऊ वर्षातील ग्रंथ व ग्रंथकारांची ही नावे पाहिल्यास या पुरस्कारांमागे असणारा साहित्यविषयक दृष्टिकोन किती व्यापक व किती कालोचित आहे याची साक्ष पटण्यासारखी आहे. मराठी साहित्यक्षेत्रात 'महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कारांना' प्रतिष्ठा प्राप्त होण्याचे हे एक कारण आहे अशी आमची धारणा आहे.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती या विषयीच्या मन:पूर्वक आस्थेतून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' साकार झाली आहे. म्हणूनच केवळ 'गौरव पुरस्कार', 'विशेष पुरस्कार', 'ग्रंथ पुरस्कार' एवढ्यावरच न थांबता, मराठी भाषा, साहित्य व समाज यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या विषयांवर काम करण्यासाठी अनुदाने देण्याची तरतूदही या योजनेने केलेली आहे. त्यानुसार २००२-२००३ या आर्थिक वर्षात खाली दिलेल्या संस्था व व्यक्ती यांना अनुदाने मंजूर करण्यात आली आहेत.

**● मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (संदर्भ विभाग) - पुस्तक खरेदीसाठी अनुदान**

मराठीमध्ये प्रकाशित झालेले कोणतेही पुस्तक अभ्यासकांना मिळण्याचे महाराष्ट्रातील एकमेव विश्वासार्ह ठिकाण म्हणून 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' (संदर्भ विभाग) या संस्थेचा उल्लेख करता येईल. महाराष्ट्रातील विविध भागातील अभ्यासक व मराठी साहित्याचे उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्या दृष्टीने या संस्थेला विशेष महत्त्व आहे. ही संस्था अभ्यासकांना आपली सेवा जवळजवळ विनामूल्य देत असते. सरकारी अनुदाने व देणग्या या संस्थेच्या कारभारासाठी अपुऱ्या पडत असल्यामुळे नवी पुस्तके विकत घेणे सध्या संस्थेला जिकिरीचे होत आहे. संस्थेचे महत्त्व व ही परिस्थिती लक्षात घेऊन या संस्थेला पुस्तके घेण्यासाठी म्हणून रु. १००,०००/- (एक लक्ष रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

**संवादिनी २००२**




**● 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट - 'आंतरभारती साहित्यसंस्कृती संवाद'**

साने गुरुजींच्या 'आंतरभारती'च्या कार्यक्रमाचा प्रसार करणे हे 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट'च्या कामाचे एक अंग आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'आंतर भारती साहित्य संस्कृती संवाद' हा कार्यक्रम आयोजित करण्याचे 'ट्रस्ट'ने ठरविले आहे. महाराष्ट्राबाहेरील राज्यांचा महाराष्ट्राशी असा संवाद घडवून आणणे ही घटना सांस्कृतिक तसेच राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाची असल्यामुळे या कार्यक्रमांचे प्रायोजक म्हणून त्यासाठी रु. १,५०,०००/- (एक लक्ष पन्नास हजार रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

**● स्त्री अभ्यासकेंद्र पुणे विद्यापीठ - 'मूलतत्त्ववादाला शह'**

पुणे विद्यापीठाच्या स्त्री अभ्यासकेंद्राने वाढत्या मूलतत्त्ववादाला शह देण्यासाठी विवेचक साहित्यनिर्मिती आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यासंबंधीच्या प्रकल्पाचा आराखडा महाराष्ट्र

फाउण्डेशन अनुदानासाठी 'केशव गोरे ट्रस्ट'कडे पाठविला होता.

या आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात उपलब्ध संशोधन आणि अनुभव यांच्या आधारे (१) मूलतत्त्ववाद म्हणजे काय? (२) इतिहासाचा अर्थ, महत्त्व, जमातवादी आकलन आणि इतिहासाच्या आकलनाचे पर्यायी मार्ग. (३) मूलतत्त्ववादाला शह - महाराष्ट्र आणि तामिळनाडू या प्रांतातील अब्राह्मणी परंपरेतून मिळणारे धडे. (४) इतिहासातील गुंतागुंतीच्या घटनांचे आकलन - फाळणी, दंगली, शहाबानो खटला इ. (५) मूलतत्त्ववादाला शह. भक्तिपरंपरेतील क्रांतिकारी शक्यता. (६) लोकप्रिय साहित्यातील जमातवादाचे आकलन. (७) प्रसारमाध्यमातील जमातवाद.

अशा सात पुस्तिकांचा मसुदा तयार केला जाणार आहे.

तर दुसऱ्या टप्प्यात 'मूलतत्त्ववादाला शह' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यशाळांमध्ये तज्ज्ञांची व्याख्याने, माहितीपट, गटचर्चा यांचा समावेश असेल.

कार्यशाळांमध्ये होणाऱ्या चर्चा व प्रतिक्रिया विचारात घेऊन पहिल्या टप्प्यात तयार केलेल्या पुस्तिकांच्या मुद्यांना अंतिम स्वरूप दिले जाणार आहे.

प्रस्तुत प्रकल्पाचे स्वरूप आणि वर्तमान सामाजिक परिस्थितीतील त्याचे महत्त्व लक्षात घेऊन या प्रकल्पासाठी रु. २,५०,०००/- (दोन लक्ष पन्नास हजार रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

**● प्रतिमान, पुणे - प्राथमिक शाळेतील भाषाशिक्षण - अडचणी आणि उपाय.**

शिक्षणाच्या प्रसाराबरोबर आजपर्यंत शिक्षणापासून वंचित असणारे समाजघटक शिक्षणाच्या प्रक्रियेत आले. ग्रामीण आदिवासी भागातील मुले पहिल्यांदाच शाळेत जाऊ लागली. या प्राथमिक शिक्षणात भाषाशिक्षणाला विशेष महत्त्व असते. परंतु शिक्षण व्यवस्था ज्या प्रमाणभाषेत व्यवहार करीत असते ती प्रमाणभाषाच ग्रामीण-आदिवासी विद्यार्थ्यांना परकीय वाटत असल्यामुळे त्यांच्या शिक्षणात अडचणी निर्माण होतात. म्हणून नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील शाळा, गावे व विद्यार्थी यांची पाहणी करून या अडचणींचे स्वरूप व त्यावरील उपाय शोधण्याचा या प्रकल्पात प्रयत्न होणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व शैक्षणिक बाबतीत महत्त्वाचा ठरेल, असा हा अभ्यासविषय आहे.

अभ्यासविषयाचे हे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकल्पासाठी १००,००० रु. (एक लक्ष रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

**पुणे विद्यापीठ - मराठी विभाग - 'मराठी साहित्य आणि सामाजिकता' या विषयावरील संकल्पित चर्चासत्र**

विद्यापीठातून होणारी अशी चर्चासत्रे विद्यार्थी व अभ्यासक यांना उपयुक्त असतात. परंतु अशा चर्चासत्रांसाठी निधी नेहमीच अपुरा असतो. प्रस्तुत चर्चासत्राचा विषय आजच्या साहित्यिक वातावरणात महत्त्वाचा आहे.

चंद्रशेखर जहागिरदार, राजन गवस, रा. ग. जाधव, प्रशांत दळवी, शफाअतखान, गो. मा. पवार, सुधीर रसाळ, दत्ता भगत, वसंत आबाजी डहाके यासारखे लेखक, समीक्षक या चर्चासत्रात सहभागी होणार असल्याने ते विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल यात शंका नाही. अशा चर्चासत्रांतील निबंध व चर्चा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची मराठी विभागाची प्रथा असल्याने या चर्चासत्राद्वारे एक चांगला ग्रंथही निर्माण होईल हे लक्षात घेऊन या चर्चासत्रासाठी रु. २५,०००/-चे (पंचवीस हजार रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

**● प्रा. मीनल जगताप - 'मराठा स्त्रियांचे स्थान - सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक - एक अभ्यास'.**

महाराष्ट्रात मराठा जात ही बहुसंख्य समाजावर वर्चस्व असणारी व राजकीयदृष्ट्या नेतृत्व असणारी जात असूनही मराठी स्त्री कोठेही उच्च पद भूषविताना दिसत नाही. राजकीय सहकारी-जोडीदार म्हणून मराठा पुरुषांनी मराठा स्त्रीचा स्वीकार केला असला तरी त्याचे खरे स्वरूप काय आहे? ही स्त्री अजूनही शोषितच आहे का? यासारख्या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकल्पाद्वारा होणार आहे.

या विषयावर मराठीत आजवर कोणताही अभ्यास उपलब्ध नाही.

प्रा. मीनल जगताप यांनी प्रकल्पासाठी स्वीकारलेल्या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या प्रकल्पासाठी रु. १००,०००/- (एक लक्ष रुपये) अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**● डॉ. हरिश्चंद्र थोरात - 'फेर्दिना दि सोस्यूर' या आधुनिक भाषावैज्ञानिकाच्या 'कोर्स इन जनरल लिंग्विस्टिक्स' या पुस्तकाचे, त्यातील सिद्धांतव्यूहाचे व पद्धतीशास्त्राचे स्वरूप'**

सोस्यूरच्या भाषावैज्ञानिक पद्धतीचा समाजशास्त्र, मानववंशशास्त्र यासारख्या सामाजिक शास्त्रांवर आणि साहित्यसमीक्षेवर झालेला परिणाम लक्षात घेता हा विषय मराठी भाषेत येणे महत्त्वाचे वाटते. आज सोस्यूर हे नाव येथे सर्वांना माहित असले तरी त्याचे इंग्रजी पुस्तक पाहावयास मिळणेही कठीण आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता हे काम मराठीमध्ये आले तर ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना (साहित्य व समाजशास्त्रांचे विद्यार्थी) ते उपयुक्त ठरण्याची ठरण्याची शक्यता आहे. प्रस्तुत कामाचे हे महत्त्व लक्षात घेऊन या कामासाठी रु. २५,०००/-चे (पंचवीस हजार रुपये) अनुदान मंजूर केले आहे.

मराठी भाषा, साहित्य व समाज या संदर्भात कालोचित चांगल्या कामाना प्रोत्साहन द्यावे हा अशा अनुदानांमागील हेतू आहे. महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजनेचे हे स्वरूप पाहिले की ही योजना म्हणजे केवळ पुरस्कार प्रदान सोहळा नसून आपली भाषा व समाज या विषयीच्या आस्थेतून निर्माण झालेला सातत्याने क्रियाशील असणारा एक उपक्रम आहे हे लक्षात आल्यावाचून राहणार नाही.

**आमच्या या उपक्रमात ज्यांनी मनःपूर्वक सहकार्य केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.**

**– दिगंबर पाध्ये**

# महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००२ चे मानकरी

## महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार



प्रा. ग. प्र. प्रधान



विशेष पुरस्कार
**प्रा. केशव मेश्राम**



विशेष पुरस्कार
**प्रा. दत्ता भगत**












**ग्रंथ**

**प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती** / मधुकर अनंत मेहेंदळे

**वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट** / जया दडकर

**उत्तरायण** / रवींद्र शोभणे

**राहिले दूर घर माझे** / शफाअत खान

**हिरोशिमाच्या कविता** / तोगे संकिची / अनुवाद : निरंजन उजगरे

# दिलदार समाजवादी

# प्रा. ग. प्र. प्रधान

माझे ज्येष्ठ मित्र, राष्ट्र सेवा दल, समाजवादी चळवळ आणि साधना साप्ताहिक यांच्या वाटचालीतील जवळपास ५५ वर्षांचे सहकारी प्रा. ग. प्र. प्रधान यांना महाराष्ट्र फाउण्डेशनचा या वर्षाचा साहित्य गौरव पुरस्कार मिळाला याचा मला निरतिशय आनंद झाला.

निर्मळ मनाचे संवेदनाशील साहित्यिक, सहकाऱ्यांवर निर्व्याज प्रेम करणारे चारित्र्यसंपन्न कार्यकर्ते आणि कृतिशील विचारवंत म्हणून ते महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. साने गुरुजींचं त्यागमय जीवन, एस्. एम्. जोशींचं प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आणि आचार्य जावडेकर आणि नानासाहेब गोरे यांचे तत्त्वनिष्ठ वैचारिक मार्गदर्शन यांच्या मुशीतून तयार झालेले जे अनेक कार्यकर्ते महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला लाभले आणि ते जीवन संपन्न करण्यासाठी आयुष्यभर धडपड करीत राहिले त्यात प्रधान अग्रभागी आहेत. एस्.एम्. म्हणत असत की व्यापक अर्थाने राष्ट्र सेवा दल ही एक जीवननिष्ठा आहे. प्रधान ही जीवननिष्ठा तळमळीने जगले आणि त्या निष्ठेच्या कसोट्यांना सर्वार्थाने उतरले.



प्रधानांचा पिंड शिक्षकाचा; पण हा शिक्षक कधीही पोटार्थी नव्हता. त्यांनी एका माध्यमिक शाळेत फक्त सहा महिने मास्तरकी केली. पण सेवादलात आणि समाजवादी पक्षात अभ्यासवर्गातून त्यांनी सातत्यानं विचारप्रदान केलं. त्यामुळं १९४५ पासून मास्तर हे बिरुद त्यांना कायम चिकटलं. तसं संबोधण्यात त्यांच्यासंबंधीचा आदर, प्रेमभाव आणि आपुलकी व्यक्त होते. १९४२च्या लढ्यात त्यांनी कारावास भोगला. तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांच्या मनात सर्ववेळ सेवक व्हायचं होतं. पण कुटुंबाची जबाबदारी असल्यानं त्यांना चरितार्थासाठी नोकरी करणं भाग होतं.

पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी २० वर्षं इंग्रजी साहित्य शिकवलं. एक उत्तम प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या पठडीतून तयार झालेले अनेक विद्यार्थी आज सरकारी वा खाजगी सेवेत मोठ्या हुद्यावर आहेत.

चौफेर वाचन आणि मोठा जनसंपर्क यामुळे प्रधानांच्या मनाच्या कक्षा रुंदावत गेल्या आणि त्यांची वृत्ती विवेचक पण उदारमतवादी व सहिष्णु बनली. एकदा मला ते म्हणाले की, ''मी टिळकांचं चरित्र लिहिलं असलं तरी माझ्या व्यक्तिगत वर्तणुकीवर गोखले आणि विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रभाव होता. Basically, I am a liberat and not a revolutionary."

आपण वाचलेल्या वैचारिक आणि ललित साहित्याचा आनंद सेवादल सैनिकांना मिळावा आणि त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ते सतत प्रयत्न करीत. त्यांना ते चांगल्या इंग्रजी कादंबऱ्यांची कथानकं सांगत. 'Five ideas that changed the world' यासारख्या बार्बारा वार्ड यांच्या पुस्तकावर निवडक अभ्यासू कार्यकर्त्यांचे अभ्यासवर्ग घेऊन त्यांची वैचारिक बैठक ते तयार करीत असत. समाजवादी





**नाव** : **गणेश प्रभाकर प्रधान**

**जन्म** : २६ ऑगस्ट १९२२

**साहित्य** : हाजीपीर

**ललित** : कांजरकोट,

: सोनार बांगला,

: साता उत्तराची कहाणी

**वैचारिक** : लोकमान्य टिळक व्यक्ती आणि कार्य
भाकरी आणि स्वातंत्र्य
स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत
लोकमान्य टिळक, महात्मा गांधी (सहकार्याने)

**संपादने** : आगरकर लेखसंग्रह
पंडित जवाहरलाल नेहरू विविध दर्शन

**इंग्रजी** : लोकमान्य टिळक - ए बायोग्राफी (सहकार्याने)

: महात्मा गांधी

: इंडियाज फ्रीडम स्ट्रगल

: राम गणेश गडकरी

: सानेगुरुजी



चळवळीत चमकलेले भाई वैद्य, डॉ. बापू काळदाते यांसारखे कार्यकर्ते आजही मास्तरांचे हे ऋण मान्य करतात.

प्रधानांची बोलण्याची एक विशिष्ट शैली आहे. त्यांचं बोलणं कधीही कोरडं वाटत नाही. वैचारिक स्पष्टतेबरोबर त्यांत कायम सहानुभूतीचा आणि संवेदनाशीलतेचा ओलावा असतो. विषय खुलवून सांगण्यात त्यांची हातोटी विलक्षण आहे. दोन चार चिमटे घेत नर्म विनोदाची पखरण करून ते ऐकणाऱ्यांना आपल्या कवेत घेतात. 'ज्युलियस सीझर' आणि 'रिचर्ड द थर्ड' या दोन नाटकांच्या आधारे 'शेक्सपिअरच्या नाटकातील राजकारण' या विषयावर आणीबाणीच्या काळात येरवडा कारागृहात त्यांनी दिलेली दोन व्याख्यानं फार रंगली होती. ती अजूनही माझ्या स्मरणात आहेत.

प्रधानांनी विपुल लेखन केलं आहे. 'भोवतालच्या परिस्थितीने जे अस्वस्थ होत नाहीत ते साहित्यिक कसले?' असे ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिक इंदिरा गोस्वामी अलिकडे एका भाषणात म्हणाल्या. ही अस्वस्थता हा प्रधानांच्या मनाचा स्थायीभाव आहे. आपल्या लिखाणानं वाचकांच्या मनाला देशभक्तीचा स्पर्श व्हावा; न्याय, समता आणि बंधुभाव या जीवनमूल्यांचा त्यांच्या मनावर संस्कार व्हावा ही त्यांच्या लिखाणामागील प्रमुख प्रेरणा आहे. त्यांच्या पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'स्वातंत्र्य संग्रामाचं महाभारत' या त्यांच्या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या संपल्या. पुस्तक साधना प्रकाशनाचं. पण स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास 'आपण कर्तव्यबुद्धीनं लिहिला असल्यानं' त्यांनी साधना प्रकाशनाकडून पुस्तकाची रॉयल्टी कधी घेतली नाही. अन्य पुस्तकांचीही घेत नाहीत. कुणी व्याख्यानाला बोलावलं तर अमुक मानधन दिलं तर येतो असं चुकूनसुद्धा सांगत नाहीत. मिळालेलं मानधन सार्वजनिक संस्थांना देतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असा सच्च्या चारित्र्याचा सुगंध आहे. अपरिग्रह हा त्यांचा जीवनधर्म आहे. आपल्या मृत्यूनंतर आपलं रहातं घर साधना ट्रस्टला द्यावं असं त्यांनी मृत्युपत्रात लिहून ठेवलं आहे.

युवकांना 'आमच्या पिढीचं मनोगत' समजावं म्हणून त्यांनी राजकीय विचारमंथन करणारी 'साता उत्तरांची कहाणी' लिहिली. ध्येयसिद्धीसाठी भारतीय राजकारणात ज्या विविध वैचारिक भूमिका घेतल्या गेल्या त्यांचं अतिशय लालित्यपूर्ण विश्लेषण या कहाणीत आहे. सत्तासंघर्षाच्या नाट्यापेक्षा वैचारिक संघर्षाचं नाट्य त्यांना भावतं याची साक्ष कहाणीच्या पानांगणिक आहे. खरं तर स्वातंत्र्योत्तर पन्नास पंचावन्न वर्षांतील स्थित्यंतरांवर लिहून ती 'कहाणी' प्रधानसरांनी पुरी करावी अशी अनेकांची अपेक्षा आहे; पण या उतारवयात हे कसं जमणार याची त्यांच्या मनाला हुरहूर आहे.

गरिबांचे, वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणात ठाम भूमिका घेऊन उभं रहायचं, हे काही फावल्या वेळचं काम नाही; त्यासाठी पूर्ण वेळ द्यायला हवा, या निश्चयाने १९६६ साली त्यांनी आपल्या वीस वर्षांच्या कॉलेजच्या नोकरीचा राजीनामा दिला आणि ते सक्रीय राजकारणात उतरले. त्यावेळी ते पंचेचाळीस वर्षांचे होते. त्यासंबंधी ते आज काय म्हणतात पहा :

"राजकारणात मी उशीरा उतरलो. उशीरा पोहायला शिकतो तो सूर मारीत नाही. काठाकाठानं पोहतो. तसं माझं झालं. नेता व्हावं अशी महत्त्वाकांक्षा मला कधी वाटली नाही. माझी कुवत ही रणजी ट्रॉफीच्या सामन्यात खेळण्याची. कसोटी सामन्यात खेळण्याची नाही..." स्वत:ला आणि आपल्या कार्यकर्तृत्वाला कमी लेखण्याचा प्रधानांचा हा स्वभावच आहे. पण त्यांचं स्वत:विषयीचं हे निदान साफ चुकीचं आहे. कसं ते पाहू या.

प्रधानसरांनी पश्चिम महाराष्ट्र पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक लढवावी अशी पक्ष कार्यकर्त्यांची इच्छा होती. पण प्रधानांच्या मनात दुसरंच काही तरी. त्यांचे एक मित्र निवडणुकीसाठी उभे राहू इच्छित होते. त्यांचे वकीलपत्र घेऊन ते नानासाहेब गोऱ्यांकडे गेले तेव्हा नानासाहेब त्यांना म्हणाले : "छान! म्हणजे आम्ही तुमचं लग्न करायला निघालो आणि तुम्ही दुसऱ्या कोणाची तरी पानसुपारी द्यायला आलात!"

विधानपरिषदेत प्रधान सलग तीनवेळा निवडून गेले. त्यांची १८ वर्षांची कारकीर्द हा आदर्श लोकप्रतिनिधीच्या कामाचा वस्तुपाठ आहे. संसदीय आयुधं त्यांनी अतिशय परिणामकारकरित्या वापरली. मतदारसंघाशी आणि विशेषत: कार्यकर्त्यांशी त्यांचा जिवंत संबंध असायचा. अधिवेशनापूर्वी मतदारसंघाचा दौरा करून वैधानिक कामासाठी सामग्री गोळा करायची आणि अधिवेशन संपल्यावर आपल्या कार्याचा अहवाल देण्यासाठी भ्रमंती करायची असा त्यांचा कित्येक वर्षांचा परिपाठ होता. वर्तमानपत्रातील ऐकीव माहितीवर विसंबून ते कधीच

प्रश्न विचारीत नसत. मंत्र्यांपेक्षा त्यांच्याकडे अधिक माहिती असल्यामुळं प्रश्नोत्तराच्या तासात ते मंत्र्यांना चांगलेच अडचणीत आणत असत.

'मौजे'च्या १९९५च्या दिवाळी अंकात प्रधानांनी 'विधान परिषदेतील दीड तप' या विषयावर विस्तृत लेख लिहिला. महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात गोंधळ घालणाऱ्या आजच्या सदस्यांनी आणि ज्येष्ठांनी तो लेख वाचण्याचे परिश्रम घेतले तर त्यांच्या ध्यानात येईल की १८ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत प्रधान कधीही सभागृहाच्या 'विहिरी'त गेले नाहीत. त्यांनी अशिष्ट संसदीय वर्तन केलं नाही. पण संसदीय आयुधं अचूकपणे वापरून त्यांनी सरकारला धारेवर धरलं.




खरं तर १९७८ साली महाराष्ट्रात पुलोद सरकार आलं तेव्हा मंत्रीमंडळात त्यांचा समावेश व्हायला हवा होता. संसदीय कामाचा बारा वर्षांचा अनुभव त्यांच्यापाशी होता. विधानसभेत प्रथमच निवडून आलेले भाई वैद्य आणि मी... आम्ही मंत्री झालो. पण प्रधानांनी त्यासंबंधी कधीही राग तर सोडाच पण खंतही व्यक्त केली नाही. उलट आम्हाला मनोभावे सहकार्य दिलं. असे दिलदार आणि मोठ्या मनाचे प्रधानसर आहेत.

विधान परिषदेत १९८०-८२ ही दोन वर्षं ते विरोधी पक्ष नेते होते. या काळात महाराष्ट्रात भ्रमंती करून त्यांनी रग्गड काम केलं. विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांना कॅबिनेट दर्जा मिळाला. या संदर्भात ते म्हणाल्याचं मला आठवतं : "मंत्री म्हणून नव्हे तर विरोधी पक्ष नेता म्हणून कॅबिनेट दर्जा मिळाला याचा मला आनंद वाटतो."

प्रधानांचा ज्योतिष्यावर अजिबात विश्वास नाही. पण ते आपल्या वडिलांची एक अद्भुत आठवण सांगतात. १९४८ साली गप्पा मारताना वडील त्यांना म्हणाले होते : "उत्तर आयुष्यात तुला दीर्घ कारावास भोगावा लागेल." कसं काय ते प्रधानांना उमजेना. त्यांनी वडिलांना विचारलं, "राजकारणात मला काही स्थान मिळेल का?" तेव्हा ते म्हणाले, "तुला चांगुलपणा मिळेल. नाव होणार नाही. तुझ्याबाबतीत उलटा राजयोग आहे." योगायोगानं त्यांचं म्हणणं खरं ठरलं. आणीबाणीत प्रधान दीर्घ काळ तुरुंगात होते. आमदार म्हणून त्यांचा मोठा नावलौकिक झाला. ते मंत्री झाले नाहीत; पण विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांची कारकीर्द गाजली.

विरोधी पक्षनेते असताना त्यांना मलबार हिलवरचा प्रशस्त बंगला मिळायचा होता. पण महाराष्ट्रातून मंत्रालयात कामासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांना व भेटीस येणाऱ्या लोकांना सोयीचं जावं म्हणून त्यांनी मंत्रालयासमोरील बैठा बंगला पसंत केला. तिथं कायम कार्यकर्त्यांची ऊठबस असायची. त्यांचं चहापाणी, नाश्ता यांची व्यवस्था प्रधानांच्या पत्नी मालविकावहिनी अगत्यानं करायच्या. एकदा प्रधानांना त्यांच्या एका प्राध्यापक मित्रानं विचारलं, "अरे, सारखे तुझ्या बंगल्यावर इतके पाहुणे का येतात?" त्यावर प्रधानांनी दिलेलं उत्तर त्यांच्या अस्सल लोकशाही निष्ठेचं द्योतक आहे. ते म्हणाले, "हा बंगला कार्यकर्त्यांनी जे काम केलं त्यामुळं पक्षाच्या एका सदस्याला मिळाला आहे. तो ग. प्र. प्रधानांचा खासगी बंगला नाही. बांद्यापासून चांद्यापर्यंतचे माझ्या पक्षातील माझे सहकारी हे इथे पाहुणे नाहीत. त्यांच्या हक्काच्या जागी ते आले आहेत."

मराठवाडा विद्यापीठाचा नामांतराचा लढा आमच्या राजकीय जीवनातला एक महत्त्वाचा टप्पा होता. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा एकमताने ठराव केल्यानंतर लगेच मराठवाड्यात दलित वस्त्यांवर हल्ले झाले. मराठवाड्याच्या प्रादेशिक अस्मितेचा प्रश्न उभा राहिला. त्यामुळे नामांतर फार काळ पुढं ढकललं गेलं. प्रधानांना हे काही सहन होईना. त्यांनी विद्यापीठाच्या नामांतरासाठी १९८३ साली विधानपरिषदेत अशासकीय दुरुस्त विधेयक मांडलं. सभागृहात ते संमत होण्याची सुतराम् शक्यता नव्हती. त्यामुळे प्रधानसर विधेयक मांडायला उभे राहिले तोच ज्येष्ठ सदस्य श्री. रा. सु. गवई आपल्या जागेवरून उठले आणि प्रधानांच्या आसनासमोर खाली मांडी घालून बसले. विधेयक नाकारल्याचा शिक्का एकदा बसला की नामांतर होणे कठीण होईल अशी श्री. गवई यांना भीती वाटत होती. सभागृहात मी प्रधानांच्या मागेच बसलो होतो. त्यांनी वळून माझ्याकडे पाहिलं. मी म्हणालो, 'एकदा पाऊल उचललं ते मागं घ्यायचं नाही.' नामांतरासाठी लढलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या संमतीनेच प्रधानांनी विधेयक मांडलं होतं. प्रधानांनी फार सुरेख भाषण केलं. पण सभागृहाने विधेयक नाकारलं आणि आम्हा दोघांच्या डोळ्यात पाणी तरारलं. त्यानंतर मला वाटतं वर्ष दोन वर्षांनी विद्यापीठाचं नामांतर झालं. या बाबतीत प्रधानांचं

योगदान महत्त्वाचं ठरलं.

तीन वेळा ते विधानपरिषदेत स्वकर्तृत्वाने निवडून गेले. १९८० नंतरची वर्षं हा जनता पार्टीचा पडता काळ. नक्की निवडून येणारी जागा म्हणून प्रधानांनी चौथ्यांदा उभं रहावं असा पक्षाचा आग्रह होता. पण त्यांनी खंबीरपणे नकार दिला. त्यांना साने गुरुजींच्या साधना साप्ताहिकात काम करायचं होतं. त्यांनी संसदीय कामाच्या प्रकाशझोताकडे पाठ फिरवली आणि ते 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकाच्या खुर्चीत स्थानापन्न झाले. त्यांनी विविध विषयांवर साधनेत लिहिलं. आता ते संपादक नाहीत. पण वयाची ८० वर्षे ओलांडली तरी साधना ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम पहातात. डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांना साधनेचे संपादक करावे ही सूचना त्यांचीच.

वरवर बावळट आणि गंभीर दिसणारे प्रधान हे कमालीचे टवाळखोर, मिस्किल आणि चपखल विनोद करणारे आहेत यावर लोकांचा विश्वास बसणार नाही. त्याचे दोन किस्से सांगतो :

विधानपरिषदेत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी एका चर्चेत समाजवाद्यांच्या आक्रमक सरकारविरोधी भूमिकेची रेवडी उडवली. आमदार श्यामकांत मोरे काँग्रेसमध्ये गेले याचा उल्लेख करून ते म्हणाले, "तुमच्यातला एक एक सदस्य आमच्याकडे येतो आहे." त्यावर प्रधानांनी ताडकन उभं राहून उत्तर दिलं : "अहो, आमचा श्यामकांत काँग्रेसमध्ये गेला आणि कामशांत झाला." सभागृहात एक हास्यकल्लोळ उडाला.

प्रधानांच्या पत्नी मालविका आयुर्वेदाच्या डॉक्टर. प्रधानांच्या कायम धडपडीत त्यांना त्यांची समर्थ साथ लाभली आहे. सध्या त्यांची प्रकृती बरी नसते. प्रधानही थकले आहेत. त्यामुळं सार्वजनिक काम कमी करून घरात ते लक्ष देतात. 'तुमच्या सुखी संसाराचं रहस्य काय?' असं प्रधानांना कुणीतरी विचारलं तर प्रधान म्हणतात : "आमच्यात एक अलिखित करार आहे. मी तिचं औषध घ्यायचं नाही आणि तिनं माझं व्याख्यान ऐकायचं नाही."

आयुष्यभर इतकं झिजल्यानंतरही त्यांचं अस्वस्थ मन असमाधानी आहे. आंतरिक निष्ठा त्यांना सारखी टोचत असते. एकदा त्यांनी मला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

"आपला देश स्वतंत्र व्हावा ही उर्मी तरुणपणी माझ्या मनात तीव्र होती. स्वातंत्र्यलढ्यात माझ्या हातून फारसं घडलं नाही. तरी त्यात सहभागी होता आलं हे माझं भाग्य. स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या देशात आर्थिक व सामाजिक समता यावी यासाठी झालेल्या प्रयत्नात मी सामील झालो. बोलणं आणि लिहिणं या मार्गांनी हा विचार अनेकांना सांगितला. पण प्राण पणाला लावून मी लढलो नाही याची मला खंत वाटते. आपल्या देशातील गरिबांनी, श्रमिकांनी आणि दलितांनी मला क्षमा करावी इतकीच माझी प्रार्थना आहे."




किती निर्मळ आणि पारदर्शक मनाचा हा आविष्कार. हे निर्मळ मन, ही आंतरिक निष्ठा भोवतालच्या कितीजणांना नैतिक बळ देते हे प्रधानांना कुठं ठाऊक आहे? महाराष्ट्र टाइम्सने 'नोंद' या आपल्या सदरात ३ जानेवारीच्या अंकात म्हटल्याप्रमाणे "त्यांच्यासारखा सर्वार्थाने निर्मळ माणूस आज आपल्याभोवती आहे, याचा संस्कार कोणत्याही ग्रंथापेक्षा बलवत्तर आहे."

आता तर त्यांनी जाहीर करून टाकलं आहे की फेब्रुवारी २००३ नंतर ते कोणताही पुरस्कार / सत्कार / पारितोषिक स्वीकारणार नाहीत; व्याख्यानाला जाणार नाहीत. उरलेलं आयुष्य वाचन, चिंतन आणि स्वत:साठी लेखन यात घालवणार. असा निर्धार करायला नैतिक बळ लागतं. प्रधान आपल्या निर्णयावर ठाम राहतील याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. प्रधानसरांचं अभिनंदन.

— सदानंद वर्दे

साहित्यिक

# प्रा. ग. प्र. प्रधान आणि त्यांच्या प्रेरणा

समतेच्या राजकारणाला जीवन समर्पित केलेले प्रा. ग. प्र. प्रधान किंवा सर्वजण त्यांना म्हणतात त्याप्रमाणे प्रधानसर यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सुमारे १६ वर्षे इंग्रजी या विषयाची प्राध्यापकी केली. साहजिकच कार्लाइल, ऑस्कर वाइल्ड, स्पेन्सर, थॉमस हार्डी, शेक्सपिअर ते अलीकडचे सॉमरसेट मॉम,



वुडहाउससारखे साहित्यिक आणि वर्डस्वर्थ, लॉंगफेलो, कीट्स, शेलीसारखे कवी यांच्याशी त्यांची ओळख झाली. याशिवाय टॉलस्टॉय, वॉल्ट व्हिटमन, रस्किन, हेमिंग्वे यांच्याही साहित्याचा त्यांनी अभ्यास केला. पण त्यांचा कब्जा घेतला तो शेक्सपिअरने. मानवी जीवनातील अनेक प्रश्नांचे गूढ सादर करणारे, माणसांच्या अनेकविध वृत्ती-प्रवृत्तींचे नमुने पेश करणारे, आणि नियतीच्या चमत्कारिक लहरी आणि त्यांच्यासमोर हताश झालेल्या सत्ताधाऱ्यांचे चित्रण करणारे शेक्सपिअरचे साहित्य ही प्रधानसरांच्या मर्मबंधातली ठेव बनली. आजही शेक्सपिअरच्या नाटकांतील प्रसंगांचे आणि भूमिकांचे रसाळ विवेचन प्रधानसर करतात, तेव्हा त्यांच्यातील राजकारणी साहित्यिक लुप्त होऊन तत्त्वज्ञानी साहित्यिक डोकावू लागतो.

प्रधानसरांबद्दल राजकारणी साहित्यिक असा जो शब्द मी वापरला त्याचे कारण त्यांच्या सर्व लिखाणाची प्रेरणा समतेचे राजकारण हीच आहे. देशप्रेम, सामाजिक-आर्थिक अन्यायाशी टक्कर देण्याची जिद्द, भारतीय संविधानाबद्दल असलेला अतूट अभिमान आणि विचारांतील उदारता या सर्व गोष्टी त्यांना लेखनासाठी प्रवृत्त करतात. प्रधानसरही ते स्वच्छपणे मान्य करतात.

प्राध्यापकी चालू असताना समाजवादी पक्षाच्या 'जनवाणी' या मुखपत्रातून आणि साने गुरुजींच्या 'साधना' साप्ताहिकातून प्रधानसर प्रसंगोपात्त राजकीय व सामाजिक समस्यांवर लिहित गेले. पण त्यांच्या लिखाणाला खरा प्रारंभ झाला तो १९५६ साली. त्यावर्षी प्रिं. गोपाळ गणेश आगरकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने साहित्य अकादमीने त्यांच्या लेखांचे संकलन व संपादन करण्याचे काम प्रधानसरांवर सोपविले. या लेखसंग्रहाला प्रधानसरांनी लिहिलेली विस्तृत प्रस्तावना हा त्यांच्या वैचारिक लेखनाचा खरा प्रारंभ होता. त्याचवर्षी लोकमान्य टिळकांचीही जन्मशताब्दी होती. त्या निमित्ताने प्रधानसर आणि प्रा. अ. के. भागवत या दोघांनी मिळून लोकमान्य टिळकांचे चरित्र इंग्रजीमध्ये लिहिले. या लेखनासाठी केलेल्या संशोधनाचा परिणाम म्हणून तेव्हापासून समाजसुधारक आगरकर आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे सेनानी लोकमान्य टिळक या दोन महान व्यक्तींशी प्रधानसरांचे जिव्हाळ्याचे वैचारिक नाते जडले; आणि ते आयुष्यभर टिकले. म्हणून जरी त्यांनी त्याआधी वृत्तपत्रीय लिखाण केले होते तरी आगरकर वाङ्मयाचे संपादन आणि लोकमान्यांचे चरित्रलेखन यांमुळे त्यांच्या लेखनास प्रथम मान्यता मिळाली.

भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये १९६५ व १९७१ या वर्षांत दोन युद्धे झाली; आणि १९६८ साली आन्तरराष्ट्रीय लवादाने कच्छसीमावादाबाबतचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार भारताकडे असलेला ३५० चौरस मैलांचा भूभाग पाकिस्तानला देण्याची लवादाने शिफारस केली. त्यामुळे भारतात लोकक्षोभ माजला आणि कच्छच्या रणाच्या त्या प्रदेशात सत्याग्रह करायचाच निर्णय प्रजासमाजवादी आणि संयुक्तसमाजवादी या दोनही समाजवादी पक्षांनी व जनसंघाने घेतला. 'कांजरकोट' हे प्रधानसरांचे पुस्तक त्या सत्याग्रहाच्या अनुभवांवर आधारलेले आहे. १९६५ साली पाकिस्तानने आक्रमण केल्यानंतर भारतीय सैन्याने अतुलनीय पराक्रम गाजवून पाकिस्तानी सैन्याला लाहोरपर्यंत मागे रेटले. या युद्धाच्या धामधुमीनंतर लगेच प्रधानसरांना सरहद्दीवर पत्रकार म्हणून जाण्याची संधी मिळाली होती.




'हाजीपीर' हे पुस्तक त्या निरीक्षणांतून तयार झाले. या संघर्षभूमीवर प्रधानांना भेटलेली सामान्य माणसे, सैनिक, ट्रक ड्रायव्हर्स, राजकारणी, निर्वासित आणि अगदी सीमेच्या अलीकडे पलीकडे वावरणारे तस्करसुद्धा निर्भयपणे आणि बहादुरीने युद्ध परिस्थितीला तोंड देताना दिसले. अमाप उत्साहापुढे आणि आवेशापुढे प्रत्येकाला स्वतःचे जीवन क्षुद्र वाटत होते आणि जो तो शत्रूवर तुटून पडण्याची भाषा बोलत होता. युद्धभूमीवरील सैनिक दक्ष होते पण कोणताही तणाव त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता याचे रहस्य जेव्हा प्रधानसरांनी रॉय नावाच्या सेनाधिकाऱ्याला विचारले तेव्हा त्याचे श्रेय आम्ही सैनिकांना जे चौफर प्रशिक्षण देतो, त्याला जाते, असे त्यांनी सांगितले. सीमेवरच्या प्रदेशात येणारे हे विविध प्रकारचे अनुभव प्रधानसर आणि त्यांच्याबरोबर गेलेले शिरूभाऊ लिमये यांची मने उचंबळून टाकणारे आणि उत्साहवर्धक होते. 'हाजीपीर' या पुस्तकात प्रधानांनी त्यांचे सुरेख चित्रण केले आहे.

१९६५ साली पश्चिम आघाडीवर फिरताना मनाला मिळालेली स्फूर्ती आणि चैतन्य, १९७१ सालच्या बांगला देश युद्धात भारतीय सेना विजयी होऊन पाकिस्तानचा तुकडा पडल्यानंतर प्रधानसर जेव्हा लगेचच

बांगला देशामध्ये गेले, तेव्हा अभावानेच आढळले. वातावरणात उत्साहापेक्षा कारुण्य अधिक होते. जावे तेथे अमानुष अत्याचारांच्या व पाशवी बलात्काराच्या कथा स्वागत करीत होत्या. भारतीय जवानांचा पराक्रम, मुक्तिवाहिनीतील सैनिकांचे धैर्य आणि समर्पण यांच्या स्फूर्तिदायक कथा ऐकल्या तरी त्यांच्यामागची पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या अत्याचारांची पार्श्वभूमी गडद आणि वेदनादायक होती. सरहद्दीच्या अलीकडे पडलेले एक कोट शरणार्थींचे तंबू आणि त्यांचे उद्ध्वस्त जीवन बांगला देशमध्ये प्रवेश करतानाच सामोरे आले होते.



दीनवाण्या निस्तेज माणसाशी बोलायला लागले म्हणजे मात्र त्यांच्या डोळ्यांसमोर तरळणारी त्यांची गावे, शेतीवाडी यांच्या स्वप्नांची जाणीव प्रधानसर आणि त्यांचे सहप्रवासी यांना होत होती. बांगलादेशाच्या स्वातंत्र्यासाठी विद्यापीठातील आणि बाहेरच्याही तरुणांनी आपल्या जीवनाच्या पायघड्या कशा घातल्या हे खुलना, जेसोर, डाक्का, चितगांव, नोआरबली या गावांत फिरताना आणि तेथील महाविद्यालये आणि विद्यापीठे यांना भेटी दिल्यावर प्रधानसरांना चांगलेच जाणवले. विशेषत: चितगांव येथील रेल्वेवर्कशॉपच्या परिसरात फिरताना आढळलेले माणसांच्या कवट्यांचे ढीग, अर्धवट पुरलेल्या प्रेतांची पसरलेली दुर्गंधी, काहींना चिणून मारल्याच्या अभद्र खुणा ही दृश्ये पाहून सारेच हादरले. या संदर्भात आपल्या 'सोनार बांगला' या पुस्तकात प्रधानसर लिहितात, ''पूर्वी इतिहासात चेंगीजखान, तैमूरलंग यांच्या क्रौर्याच्या गोष्टी वाचल्या होत्या; पण आधुनिक शस्त्रे हाती असलेल्या याह्याखानाने त्यांना मान खाली घालायला लावली. कितीतरी अधिक माणसांची त्याने निर्घृण कत्तल केली.''

काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्री मधूनच विजा चमकून जाव्यात असेही काही क्षण प्रधानांनी या दौऱ्यात अनुभवले. पूर्व पाकिस्तानमधील या अमानुष संहारात मूळ बंगाली मंडळींना वाचविण्यासाठी अबंगाली मुसलमानांनी केलेली मदत आणि पत्करलेला धोका यांच्या कथा त्यांना दिलासा देऊन गेल्या. डॉ. मुनिरुझ्जमान यांच्यासारख्या तीक्ष्ण बुद्धीच्या आणि व्यापक सहानुभूती असलेल्या प्राध्यापकांचे मैत्र आणि मार्गदर्शन त्यांना तेथील प्रत्येक घटनेचा अर्थ लावून घेण्यासाठी लाभले. नौखालीतील गांधीजींच्या जोयाग आश्रमातील देवेन नारायण सरकार आणि मदन मोहन चट्टोपाध्याय या वृद्ध कार्यकर्त्यांनी तेथेच राहायचे ठरवून केलेला गांधीविचाराचा प्रसार व अखेर पाकिस्तानी सैनिकांनी त्यांची केलेली हत्या या हकीकती, गांधीजी या आश्रमात असताना त्यांची प्रत्यक्ष सेवा केलेल्या वृद्ध आश्रमनिवासिनी रमदा शुंदरी यांच्याकडून प्रधानसरांना आणि त्यांच्या मित्रांना समजल्या. आणि पाकिस्तानचे समर्थन करण्यासाठी बॅ. जीनांनी जे निवेदन केले होते त्याला उत्तर देताना 'पंजाबातील मुसलमान आणि बंगालमधील मुसलमान यांची दोन राष्ट्रे होतील' ही गांधींची भविष्यवाणी द्रष्टेपणाची कशी ठरली, याचा अनुभव आला.

आजच्या 'बांगला देश'च्या राजकारणाचे स्वरूप समजावून घेण्यासाठीही 'सोनार बांगला' हे प्रधानसरांचे पुस्तक मुळातून वाचले पाहिजे.

अनेक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृतींचा जन्म कारागृहात झाला आहे हे साने गुरुजी, काकासाहेब कालेलकर, जवाहरलाल नेहरू इत्यादींच्या ग्रंथनिर्मितीने आपल्याला दाखवून दिलेच आहे. प्रधानसरांनीही आपल्या सर्वोत्कृष्ट ग्रंथाची 'साता उत्तराची कहाणी' या ग्रंथाची निर्मिती १९७५ साली आणीबाणीच्या कालखंडात येरवडा तुरुंगात केली. या कादंबरीच्या रचनेचे प्रारूप अगदी वेगळ्या प्रकारचे असले तरी १९४३ सालापासून ते १९७९ पर्यंत म्हणजे अखेरच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून ते जयप्रकाशजींच्या मृत्यूपर्यंतच्या देशातील महत्त्वाच्या घटनांचा यात वेध घेतला गेल्यामुळे या ग्रंथाचा बाज ऐतिहासिक कादंबरीसारखा झाला आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयाने पछाडलेले सात तरूण एकमेकांचे दृढ स्नेही असतात पण स्वातंत्र्याकडे नेणारे त्यांचे मार्ग - तत्त्वज्ञान वेगवेगळे असते. सबंध कादंबरीभर या

मित्रांचा वेगवेगळ्या घटनांच्या संदर्भात आपापल्या भूमिकांबद्दल सतत संवाद, चर्चा चालू असते. त्यात वाद-प्रतिवाद आहेत पण कडवटपणा नही. गांधीवाद, समाजवाद, हिंदुत्ववाद, सर्वोदय, कम्युनिझम, आंबेडकरांची दलित चळवळ आणि बहुजनसमाज यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या मित्रांमध्ये एकजण थोडा तटस्थ पण सर्वांना सांभाळून घेणारा मित्रही असतो. या सर्वांच्या संवादातून अनेक थोर व्यक्तींची जवळून ओळख तर होतेच शिवाय त्यांच्या मतमतांतरातील विविध छटांचाही परिचय होतो. पण एका विशिष्ट ध्येयाशी बांधिलकी असणारे हे कार्यकर्ते जीवनातल्या इतर समस्यांशी सामना करीत आपले काम करीत असताना जेव्हा त्यांचे पक्षच फुटतात; आणि वर्षानुवर्षे जी भूमिका मांडली तिच्यापासून जेव्हा पक्षच दूर जाऊ लागतो त्यावेळी या कार्यकर्त्यांची दारूण फरफट होते आणि त्यांचे भावविश्व उद्ध्वस्त होते, याचेही परिणामकारक चित्रण या कांदबरीत प्रधानसरांनी केले आहे. या कादंबरीविषयी आपली भूमिका विशद करताना प्रधानसर लिहितात –

'सत्तेच्या राजकारणात पैसा, स्त्री आणि मोहवश करणाऱ्या अन्य गोष्टी यांचा उपयोग कसा केला जातो हे मी गेल्या १६ वर्षांत (आमदार असताना) जवळून पाहिले आहे. याचे चित्रण मराठीमध्ये कै. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. अरुण साधू यांनी प्रभावीपणे केले आहे. पण मला असे वाटते की सत्तेसाठी चालणारा जीवघेणा संघर्ष ही राजकारणाची एक बाजू आहे. समाजपरिवर्तनासाठी कार्यकर्त्यांनी वैचारिक बांधिलकी पत्करून केलेली अविरत धडपड ही राजकारणाची दुसरी बाजू आहे. सत्तासंघर्षातील नाट्यापेक्षा विचारसंघर्षातील नाट्य मला अधिक विलोभनीय वाटते, आणि त्याचे चित्रण करावे हेच माझे उद्दिष्ट आहे.'

वैचारिक जीवनाचे चित्रण करीत असताना प्रधानांनी लोभ, कामवासना, मत्सर, अधिकार, लालसा, सूड इत्यादी भावभावनांना कदाचित काही ठिकाणी किंचितसा स्पर्श केला असला तरी यांचे चित्रण टाळले आहे कारण ते राजकीय चर्चांच्या ओघाला बाधक ठरेल असे त्यांना वाटले असावे. म्हणूनच 'राजकीय कार्यकर्त्यांच्या भावजीवनाच्या एकाच पैलूचे दर्शन घडवायचे अशी मर्यादा मी स्वत:वर घालून घेतली' असे प्रधानसर म्हणतात.

गेल्या काही वर्षांत प्रधानसरांनी कार्यकर्त्यांसाठी व तरुणांसाठी काही छोटी चरित्रे लिहिली. जयप्रकाश नारायण, एस्. एम्. जोशी आणि ना. ग. ऊर्फ नानासाहेब गोरे यांच्या जीवनाचा संदेश पुढील पिढीपर्यंत पोचावा; आणि समतेच्या लढ्याच्या आड येणारे धर्मांधतेचे सावट दूर व्हावे ही या लेखनामागची प्रेरणा असल्यास नवल नाही. या तिघांच्याही जीवनधारणा समाजातील भेदभाव, दु:ख यांचे निवारण आणि समता व न्यायावर आधारलेली समाजरचना यांच्यासाठीच होती आणि आपल्या आयुष्यात त्यासाठी भरपूर संघर्ष करून तरुणांच्यापुढे ध्येयवादी जीवनाचे आदर्श ठेवले. जयप्रकाशजींच्या जीवनकार्याबद्दल प्रधानसरांनी म्हटले आहे की, त्यांच्या जीवनातील महान कार्य म्हणजे



लोकशाहीची पुन:स्थापना हे होते. त्याचबरोबर लोकशाहीच्या अपूर्णतेची जाणीवही त्यांना होती. भारतात राजसत्ता आणि अर्थसत्ता यांच्या केंद्रीकरणामुळे लोकशाहीचा संकोच होत चालला आहे असे त्यांना वाटत होते. यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकांच्या विशेषत: ग्रामीण स्त्री-पुरुषांच्या सहभागातून लोकशाही राजवट साकारली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. एस्. एम्. जोशी आणि नानासाहेब गोरे हे तर प्रधानांचे समकालीन ज्येष्ठ स्नेही होते; आणि म्हणून त्यांच्या जीवनकार्याचे चित्रण अधिक असोशीने केले गेले असल्यास नवल नाही.

'भाकरी आणि स्वातंत्र्य' हे प्रधानसरांचे आणीबाणीनंतरच्या काळातील आणखी एक पुस्तक. भारत आणि अन्य विकसनशील राष्ट्रे यांच्या वाटचालीतील आर्थिक आणि राजकीय समस्येचे

विश्लेषण त्या पुस्तकात प्रामुख्याने आहे.

अगदीं अलीकडेच प्रसिद्ध झालेले 'मला उमजलेले-' हे प्रधानसरांचे पुस्तक म्हणजे त्यांनी अनेक पुस्तकांना ज्या प्रस्तावना लिहिल्या, त्यांचे संकलन आहे. सुप्रसिद्ध लेखक जी. ए. कुलकर्णी यांच्या पत्रव्यवहाराचे दोन खंड आतापर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे संकलन म. द. हातकणंगलेकर व श्री. पु. भागवत यांनी केलेले आहे. 'जी.एं.ची निवडक पत्रे भाग १ व भाग २' या दोन ग्रंथांना प्रधानसरांनी दीर्घ प्रस्तावना लिहिल्या आहेत आणि त्यांत जी.एं.च्या साहित्य साधनेमागील प्रेरणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. जी. ए. यांच्या वाङ्मयीन आवडीनिवडी, साहित्यविषयक मते, समकालीन मराठी साहित्याबद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रिया आणि जीवनविषयक दृष्टिकोन यांच्यावर या पत्रांतून प्रकाश टाकलेला आहे. त्यांचा आणि सुनीताबाईंचा पत्रव्यवहार म्हणजे तर दोन गूढ आणि आत्ममग्न व्यक्तींचा उत्कट संवाद. जी.एं.च्या पत्रांविषयी प्रधानांनी लिहिले आहे, ''जी.एं.ची पत्रे म्हणजे त्यांनी अभिव्यक्तीसाठी शोधलेले एक निमित्त. म्हणून ही पत्रे म्हणजे अन्य व्यक्तिसापेक्ष न राहता आत्मसापेक्ष राहतात.''

प्रा. स. रा. गाडगीळ यांच्या 'शोकात्म विश्वरूप दर्शन' या ग्रंथाला लिहिलेली दीर्घ प्रस्तावनाही याच पुस्तकात समाविष्ट केली आहे. त्याचप्रमाणे आगरकर लेखसंग्रह आणि डॉ. शान्ताराम विसपुते यांच्या 'एस्. एम्. जोशींचे जीवन आणि कार्य' या पीएच्.डी.च्या प्रबंधाला प्रधानसरांनी विश्लेषक प्रस्तावना लिहिल्या आहेत. पण या ग्रंथातील मला सर्वांत महत्त्वाची वाटलेली प्रस्तावना म्हणजे डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या 'भारतीय प्रबोधन आणि नवआंबेडकरवाद' या पुस्तकाला प्रधानसरांनी लिहिलेली प्रस्तावना. दलित समाजाची मुक्तता होण्यासाठी भारतीय समाजमनाला जखडून टाकणाऱ्या शृंखला तोडल्या पाहिजेत ही डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. किंबहुना दलितांची सामाजिक अन्यायापासून मुक्तता हा समग्र मानव समाजाच्या मुक्तिलढ्याचाच एक भाग आहे अशी त्यांची भावना होती. या ग्रंथलेखनाचा उद्देश स्पष्ट करताना प्रधानसर लिहितात, ''व्यक्ती कितीही मोठी असली तरी काळाच्या व परिस्थितीच्या मर्यादा त्या व्यक्तीवर पडतातच. डॉ. आंबेडकर यांच्यावरही त्या पडल्या. या मर्यादांमुळे त्यांच्यात काही विसंगतीही निर्माण झाल्या असे डॉ. सबनीस यांना वाटते. पण या विसंगतीतही एक प्रकारची आंतरिक सुसंगती डॉ. आंबेडकर यांच्या विचारांमध्ये आहे. हा त्यांच्या विचारांचा गाभा उकलून दाखवणे, त्यांच्या विचारव्यूहाची रचना स्पष्ट करणे हे डॉ. सबनीस यांच्या ह्या ग्रंथलेखनामागील उद्दिष्ट आहे'' अशा मोजक्या शब्दांत प्रधानसरांनी या ग्रंथाची ओळख करून देऊन पुढे त्यातील विविध विचारप्रवाहांची चिकित्सा केली आहे.

श्री. नानासाहेब गोरे यांच्या 'नारायणीय' या निवडक लेखसंग्रहालाही प्रधानसरांनी जो उपसंहार जोडलेला आहे तो या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे.

'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रधानसरांनी तटस्थपणे लिहिलेला



इतिहास शासनाने इतिहासाचे पुरवणीवाचन म्हणून अनेक विद्यापीठात मंजूर केलेलाच आहे.

प्रधानसरांनी लिहिलेल्या ग्रंथांची लांबलचक यादी देता येणे शक्य नाही. त्यांनी लिहिले ते केवळ समाजकल्याणाच्या आस्थेने लिहिले. त्या लेखनामागे कृतीशीलतेची प्रेरणा होती. स्वत:च्या लेखनाबद्दल प्रधानसर म्हणतात –

'मी एक ग्रंथलुब्ध वाचक आहे. विद्यार्थिदशेत, कॉलेजमध्ये अध्यापन करीत असताना, संपादकाच्या जबाबदाऱ्या पार पाडत होतो तेव्हा आणि आता निवृत्तीनंतरही ग्रंथांच्या सहवासात माझे मन रमते... स्वातंत्र्य संग्रामात, समाजवादी चळवळीत आणि आर्थिक व सामाजिक समतेसाठी झालेल्या विविध संघर्षात भाग घेण्याची जी संधी मला आयुष्यभर मिळाली, तिच्यामुळे मला आपल्या समाजाच्या अंतरंगाचे दर्शन झाले आणि मानवी मनातील

### जयप्रकाश नारायण

जयप्रकाश नारायण यांना विद्यार्थिदशेत विज्ञानाची आवड होती आणि विज्ञानाच्या साहाय्याने आपल्या देशाचे जीवन बदलून टाकता येईल असे त्यांना वाटत होते. विज्ञानाचा अत्युच्च पातळीवरील अभ्यास करावा म्हणून ते अमेरिकेत गेले. विस्कॉनसीन विद्यापीठात विज्ञानाची पदवी संपादन करून संशोधनाकडे वळताना त्यांनी मार्क्सचे जे ग्रंथ वाचले त्यामुळे त्यांना समाजविज्ञानाचा अभ्यास करावेसे वाटू लागले. आपल्या देशातील लोकांच्या जीवनापर्यंत विज्ञान जावयाचे असेल तर तेथील समाजरचनाच बदलावी लागेल असे त्यांना वाटू लागले. आज आपल्या देशातील अनेक तरुण माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणि विज्ञानाच्या अन्य क्षेत्रांत अत्युच्च ज्ञान मिळविण्यासाठी अमेरिकेस जात आहेत आणि भारतातही उच्च दर्जाच्या तंत्रविज्ञानाचा अभ्यास करण्याच्या सुविधा आता उपलब्ध होऊ लागल्या आहेत. विज्ञानाच्या क्षेत्रातील अत्युच्च ज्ञान मिळावे या तरुणांच्या प्रवृत्तीचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. परंतु या तंत्रविज्ञानाचा भारतात उपयोग करताना येथील आजची समाजरचनाही बदलली पाहिजे, **ज्ञान झोपडीपर्यंत पोहोचविले** पाहिजे याचे भान ठेवले पाहिजे.

आज आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असलो तरी अर्थव्यवस्थेचे वैश्विकीकरण आणि अत्याधुनिक तंत्रविज्ञान आणि प्रचंड भांडवलसंचय यांच्या आधारे बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अमेरिका व युरोपातील सधन देश यांची जागतिक अर्थव्यवस्थेवरील पकड, यांमुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्राचे आर्थिक स्वातंत्र्यच धोक्यात आलेले आहे. अशा वेळी वैश्विकीकरणाच्या विरोधी भारतातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, प्रचंड प्रमाणात बेकार झालेले युवक, असंघटित आणि संघटित कामगार, कनिष्ठ मध्यमवर्गीय कर्मचारी यांची एकजूट घडवून आणण्यासाठी सर्व पुरोगामी शक्तींचे एक व्यासपीठ निर्माण करावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात जयप्रकाश नारायण यांनी राष्ट्रवादी शक्तींच्या एकजुटीच्या आधारे १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व केले. आज बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे यांच्याबरोबर संघर्ष करताना पुरोगामी शक्तींचे एक व्यासपीठ निर्धाराने उभे करावे लागेल. हाच आजच्या संदर्भात जयप्रकाशजींच्या जीवनाचा कार्यकर्त्यांना संदेश आहे.

**– ग. प्र. प्रधान**

विसंगती आणि आंतरिक सुसंगती यांचीही बरीच समज आली. साहित्याचे अध्यापन करताना तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्रही मी वाचले आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन व्यापक आणि सहिष्णू झाला. या माझ्या मनाच्या घडणीतून माझे सर्व साहित्य निर्माण झाले आहे. संस्कारक्षम तरूण पिढीवर स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व यांचा संस्कार करावा अशी माझ्या मनात जी उत्कट ऊर्मी आहे, तिच्यामुळेच मी लेखन करण्यास प्रवृत्त झालो. माझे सर्व लेखन सहेतुक आहे; आणि ते मी वाचलेल्या मौलिक, वैचारिक ग्रंथांवर, विदग्ध वाङ्मयावर आणि माझ्या अनुभवांवर आधारलेले आहे. कल्पनेच्या विश्वात माझे मन रमत नाही. साहित्यातील सौंदर्यस्थळांचा आस्वाद घेतला तरी सुंदर ललित साहित्याचे लेखन मी केलेले नाही.... मी प्रतिभावान नाही; संशोधक नाही. मात्र जीवनातील विविध अनुभवांना सामोरे जात असताना आणि अभिजात साहित्याशी समरस होताना माझ्या भावना उचंबळून येतात आणि मी अंतर्मुख होतो...'

प्रधानसरांनी आपल्या साहित्याबद्दल व्यक्त केलेल्या या विचारांनंतर आणखी त्यांच्या लेखनामागील प्रेरणेबद्दल काही लिहायला हवे काय?

**– कुमुद करकरे**

# एक 'मोबाईल थिएटर'
# प्रा. केशव मेश्राम

...त्यावेळी चर्चगेट स्टेशनजवळ रेल्वे सर्व्हिस कमिशनचं कार्यालय होतं. एकोणिसशे सत्तावन्न सालातील तो ऑक्टोबर महिना मला आजही नेमकेपणाने आठवतो आहे. सात-आठ महिन्यांपूर्वीच, जानेवारी महिन्यात, गाव सोडून मी पोटासाठी मुंबईला आलो होतो. एक दीड महिन्यात कुठंतरी नोकरीलाही लागलो होतो; पण रेल्वेतली नोकरी चांगली असं ऐकल्यामुळं आल्याआल्याच एक फॉर्म भरून टाकला होता. आज त्याच नोकरीच्या परीक्षेसाठी मी इथं आलो होतो.

खेड्यातील वास्तव्यामुळं मला शहर भागाची ओळख नव्हती. मुंबई तर मायानगरी. मला सतत या शहराची भीती वाटत होती. रस्त्यानं सुसाट धावणारी वहानं आपल्याच अंगावर येत असल्याचा भास मला व्हायचा. इथं माणसांचीही मला भीती वाटायची. परीक्षेसाठी चांगली शे - सव्वाशे मुलं तिथं जमली होती. मी त्यांच्यावर नजर टाकली. सगळी 'तोंडं' आपल्यापैकीच आहेत याची मला खात्री पटली. मनावरचं दडपण जरा कमी झालं.




मा. बाबू जगजीवनरामजी त्यावेळी रेल्वेमंत्री होते. एक खास फर्मान काढून, अनुसूचित जातींचा अनुशेष तातडीनं भरून काढावा असा संदेश त्यांनी दिला होता. सकाळी अर्ध्या तासाची लेखी परीक्षा आणि दुपारी तोंडी परीक्षा, अशी पद्धत होती. त्यासाठीच हा सगळा जमाव जमला होता.

या परीक्षेत आपलं काय होणार, ह्या विवंचनेत मी होतो. एक मित्र मला तिथं घेऊन गेला होता. माझा हा मित्र नोकरी करता करताच सिद्धार्थ महाविद्यालयात शिक्षणही घेत होता. जमलेल्या मुलांपैकी दहा-बारा जणांचं एक टोळकं भलतीच मस्ती करत होतं. एकदम बिनधास्त होतं. माझ्या हातात एक कापडी पिशवी होती. त्यात मी पेन्सिल, रबर, कंपास, शाईपेन असं काही बाही टाकून आणलं होतं. ती मंडळी सडेफटिंग होती. ह्याच टोळक्यात एक शिडशिडीत अंगकाठीचा पोरगा दंगा-मस्ती करण्यात आघाडीवर होता. डोक्यावर झकास कोंबडा, लांबबाह्यांचा गळाबंद पांढरा टीशर्ट, अरुंद बॉटमची पँट अशा पेहरावातला तो गडी तरतरीत दिसत होता. अंगकांती गडद काळ्या रंगाची होती. चेहऱ्याची कोवळीक आकर्षक वाटत होती. दाढी-मिशी अजून फुटलीय का नाही, ते जवळ जाऊन निरखून पाहिल्याशिवाय कळण्यासारखं नव्हतं.

त्याचा दंगेखोरपणा पाहून माझ्या मित्राला म्हणालो, 'हा परीक्षेसाठी आलाय का धुडगूस घालायला?'

माझा मित्र म्हणाला, 'अरे तो खूप हुशार आहे. आमच्याच वर्गात आहे. त्याचं नाव केशव मेश्राम आहे.'

'कुणी का असेना तो.' मी म्हणालो, 'पण नोकरीसाठी परीक्षा द्यायला आल्यावर इतका आगाऊपणा करायचा?'

'त्यानं कॉलेजमध्ये एक मैत्रिण पण गाठलीय. लवकरच तिच्याशी लग्नही करणार आहे तो.' मित्रानं माहिती पुरविली.





| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **केशव मेश्राम** |
| **जन्म** | : | २४ नोव्हेंबर १९३७ |
| **साहित्य** | | |
| **कविता** | : | उत्खनन |
| | : | जुगलबंदी |
| | : | अकस्मात |
| | : | चरित |
| | : | कृतकपुत्र |
| **कांदबरी** | : | हकिकत व जटायू |
| | : | पोखरण |
| **कथा** | : | खरवड, पत्रावळ, धगाडा, मरणमाळा, आमने सामने, कोळिष्टके, ज्वालाकल्लोळ खांडववन |
| **ललितगद्य** | : | छायाबन, रुतलेली माणसे, गाळ आणि आभाळ, गळतीचे क्षण |
| **समीक्षा** | : | समन्वय, शब्दांगण, बहुमुखी, प्रश्नशोध, शब्दबंध, अक्षरभाकिते, शब्दव्रत, अन्वेषण |
| **संपादने** | : | विद्रोही कविता |
| | : | दलित साहित्याची स्थितीगती (सहकार्याने संपादित) |
| **संशोधन** | : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चिंतन |

मृत्यु : दि. ३० - ११ - २००७

मला त्याचं देणंघेणं नव्हतं. आपल्या पोरांनी शिस्तीनं वागलं पायजे एवढंच मला वाटत होतं.

प्रा. केशव मेश्राम यांचं मला पहिलं रुप दिसलं ते असं होतं...

कालांतराने मी मेश्रामांना त्या प्रसंगाची आठवण दिली. त्यांनी ती मान्य केली.

प्रा. मेश्राम त्यावेळी म्हणाले, 'अहो, माझं सगळंच लवकर लवकर झालं. लग्न झाल्यावर वर्षभरात मुलगाही झाला. मला छोकरा झाल्याचं सांगायला माझी मोठी मेहुणी आली होती. ते ऐकल्यावर मी लाजलो कसा ते आता सांगता येत नाही. सगळीच गडबड होती.'

मी आणि मेश्राम दोघेही १९५८ साली रेल्वेत नोकरीला लागलो. मी मध्य रेल्वेत तर ते पश्चिम रेल्वेच्या कार्यालयात. अर्थात आमची ओळख-देख नसल्यामुळं आमच्या गाठी-भेटी होण्याचा प्रश्नच नव्हता.

मार्च १९६३ मध्ये माझी पहिली कथा पुण्याच्या 'कथालक्ष्मी' मासिकात प्रकाशित झाली. त्याचे संपादक होते बापू वाटवे. ह्या कथेमुळं जे लिहिणारे होते त्यांच्या गाठीभेटी मी घेऊ लागलो. माझे स्मृतिशेष साहित्यिक मित्र हिं. गो. बनसोडे मला अभिनव प्रकाशनचे वा. वि. भट यांच्या दुकानावर घेऊन जात. हे दुकान गुरुनानक मार्केट मध्ये चित्रा सिनेमाच्या समोर होते. तिथं बऱ्याच साहित्यिकांची ऊठबस असायची. डॉ. सदा कऱ्हाडे, प्र. श्री. नेरुरकर, नारायण सुर्वे, गोविंद पोवळे, भानू शिरधनकर, बाबूराव बागूल प्रभृती साहित्यिक तिथं येत असत. त्यातच प्रा. केशव मेश्रामही कधीतरी यायचे. तिथं चाललेल्या चर्चेत ते भाग घ्यायचे. गप्प राहून मी त्यांचा युक्तिवाद ऐकत असे. त्यांच्या बोलण्यातील वाङ्मयीन मुद्दे बिनतोड असायचे. चर्चेत भाग घेणाऱ्या इतरांचा भर 'पुरोगामी' पणावर असायचा. मेश्रामांचा युक्तिवाद सरस असायचा. बोलता बोलता ते अनेक अभंग, ओव्या, काव्यपंक्ती, महत्त्वाची अवतरणे याचा उल्लेख करीत. मेश्रामांच्या पाठांतराचं मला नवल वाटायचं. हा माणूस 'ज्ञानी' आहे, असं माझं मत बनलं आणि तेव्हापासून मी त्यांना 'मेश्राम सर' म्हणायला लागलो. आम्ही दोघेही तसे समवयस्क... सर माझ्यापेक्षा केवळ प्राच महिन्यांनी मोठे आहेत. मी त्यांचा कधीही विद्यार्थी नव्हतो, तरीही मी त्यांना 'सर' म्हणतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यातच १९७२ साली महाबळेश्वर येथे आयोजित केलेल्या विभागीय साहित्य संमेलनात घणाघाती भाषण करून 'मी आतापर्यंत दहा हजाराहून जास्त पुस्तकं वाचलेली आहेत. हाताच्या बोटावर मोजण्याइतकी ही त्यात चांगली पुस्तकं नाहीत. मराठीत एकही 'ग्रेट' पुस्तक नाही.' असा घणाघाती हल्ला त्यांनी मराठी साहित्यावर केला. उपस्थित असलेले साहित्यप्रेमी मुखंड त्यावेळी आवाक झाले. या संमेलनासाठी लक्ष्मणशास्त्री जोशींसारखे दिग्गज उपस्थित होते.






अकोल्याच्या कडक उन्हातून व काळ्या मातीतून आलेले मेश्राम मुंबईत असले तरी त्यांचा जीव सतत गावाकडे असायचा, याचा अनेकदा मी अनुभव घेतलेला आहे. नाना-नानीवर त्यांचा भलता जीव! ही नानी-नाना म्हणजे मेश्रामांचे आईवडील... दोघेही चिवट हाडापेरांचे! कडक उन्हाळ्यात तग धरून राहाणाऱ्या झुडूपांसारखे दोघे पतिपत्नी येईल त्या प्रसंगाला तोंड देत अकोल्यातच रहात. नोकरीनिमित्तानं दोन्ही-तिन्ही मुलं बाहेरगावी... जवळ कुणी नसलं तरी बिनधास्त असायची. पोरांच्या पैशापाण्याची वाट कधी पहात नसत. शेवटपर्यंत त्यांनी कष्ट करून दिवस काढले अर्थात केशव मेश्रामांनी आई-वडिलांना पैसा कधी कमी पडू दिला नाही. मी अनेकदा त्यांच्या अकोल्याच्या घरी गेलो आहे.

संध्याकाळच्या गाडीने निघायचे असले तरी त्यातच वेळ काढून मेश्रामांची नानीबरोबर बैठक व्हायची. माय-लेकरं एकमेकासमोर बसून कानगोष्टी करायचे. एवढा मोठा नामवंत साहित्यिक नानीसमोर एकदम लहान वाटायचा. आपल्या आईच्या प्रेमानं मेश्राम एकदम विरघळल्यासारखे व्हायचे. प्रा. मेश्राम आजही दिवसभरात पंधरा-सोळा तास काम करतात. आयतं खाऊ नये. माणसानं कष्ट करीत जगावं हा मंत्र त्यांनी आपल्या आईवडिलांकडून घेतलेला आहे, असं मला वाटतं.




प्रगत साहित्य सभेच्या निमित्ताने काही पुरोगामी लेखक-साहित्यिकांच्या संघटनेमुळे आम्ही एकत्र आलो. वाङ्मयीन चर्चा, परिसंवाद, काव्यवाचन, कथाकथन या माध्यमांद्वारे समाजप्रबोधन घडवायचं कंकण आम्ही हाती बांधलं होतं. ही काकणं कालांतराने गळून पडत गेली. प्रबोधन मात्र फारसं घडल्याचं दिसलं नाही. प्रा. मेश्राम 'प्रगत'चे खजिनदार होते. प्रबोधनासाठी आमच्याबरोबर गावोगाव फिरणाऱ्या साहित्यिकांपैकी काहीजण घरी आल्यावर गणपतीस्तोत्र, गायत्री मंत्र म्हणायचे. कुणी कुणी सत्यनारायणाची पूजाही घालत होते. काही वेगळं घडत नाही, असं दिसल्यावर सगळ्यांची एक बैठक झाली. त्या सभेत (ढसाळ) नामदेवनं अद्वातद्वा बोलून सगळ्यांनाच लाथा घातल्यासारखं केलं. मेश्राम सरांनी एवढ्याशा रकमेचा हिशोब सादर केला. 'प्रगत'चा कारभार बरखास्त झाला. मेश्राम आणि माझ्यामधील जवळीक मात्र वाढत चालली. ती अधिक दृढ झाली ती 'अस्मितादर्श'च्या पहिल्या लेखक-वाचक मेळाव्यापासून... 'अस्मितादर्श'चे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी लेखक-वाचक मेळाव्याची एक अभिनव कल्पना अमलात आणली.

१९७४ साली पहिला मेळावा औरंगाबाद मुक्कामी संपन्न झाला. तो खूपच फलदायी ठरला. त्यानंतर बहुतांशी दलित लेखक मोठ्या आत्मीयतेने एकत्र येऊ लागले. वैचारिक देवाण-घेवाण, साहित्याबाबतचे आग्रह-दुराग्रह, धर्म-ग्रंथ-शास्त्र पुराणातील फोलपणा व त्याबाबतची चर्चा आदी सर्वच गोष्टींना उधाण आले. 'प्रागतिक विचार संसद' ह्या संस्थेचे प्रा. मेश्राम अध्यक्ष आहेत. ह्याच संस्थेतर्फे 'अस्मितादर्श' त्रैमासिक चालविले जाते. या पहिल्या मेळाव्यात भाषण करताना मेश्राम सरांनी विस्तृतपणे विचार व्यक्त केले. सर्व साहित्यिकांना त्यामुळे चैतन्य लाभले. त्यांच्या शब्दांची महती त्या दिवशी प्रत्ययास आली. 'पाखरांनो, मी काय करावे तुमच्यासाठी?' या त्यांच्या कवितेने तर संपूर्ण आसमंत व्यापून टाकला होता. ह्या मेळाव्यामुळे माझी आणि केशव मेश्रामांची मैत्री आणखी वाढत गेली.

१९६७-६८ साली मी 'यशवंत' व 'धनुर्धारी' मासिकांचं संपादकीय कामकाज पहात होतो. रामकृष्ण प्रिंटींग प्रेसचे नंदकुमार सापळे आणि डॉ. प्रभाकर कृष्णाजी सापळे यांनी माझ्यावर ती जबाबदारी सोपविली होती. 'धनुर्धारी' दिवाळी अंकासाठी वार्षिक राशी भविष्याबरोबरच एक कादंबरी प्रकाशित करण्याची पद्धत होती. प्रसिद्धी दिनांक जवळ आला होता. अगदी कमी वेळात ही कादंबरी लिहून देणारा कुणीतरी लेखक हवा होता.

मी मेश्राम सरांना भेटलो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सायंकाळी सात वाजता मला त्यांची कादंबरी मिळणार होती. मला आश्चर्य वाटलं.

संध्याकाळी सहा वाजताच मी भाऊसाहेब देसाई वाडीत गेलो. त्यावेळी मेश्राम तिथं रहात होते. जागा लहानशीच होती. तिथंच एका कोपऱ्यात बसून मेश्रामांचं लेखन चालू होतं. लेखनतंद्रीमुळं त्यांचा चेहरा तारवटल्यासारखा दिसत होता. आपली लेखणी चालू ठेवूनच सरांनी 'याऽ, वामनराव' म्हणून माझं स्वागत केलं.

पूर्णपानी कागदावर, काळ्या शाईत, वळणदार अक्षरात त्यांचं लिहिणं चालू होतं. कुठे खाडाखोड नाही, ऱ्हस्व दीर्घाच्या संभ्रमानं अडखळणं नाही, शब्द नुसते नाचत होते आणि प्रा. मेश्राम त्यांच्याशी मनसोक्तपणे खेळत होते.

मी गुमान बसून पहात होतो. मी आपसुकच गुणगुणत राहिलो, 'घडव, घडव रे सोनारा, माणिकमोत्यांच्या बिल्वरा!'

कुणी कसबी कलाकारानं माणिक मोत्यांची घडण करताना एकरुप व्हावं, तसं मेश्रामांचं चाललं होतं. बरोबर सात वाजता लेखन थांबवून मेश्राम म्हणाले, 'झालं पूर्ण! सकाळी चहा घेऊन आठ वाजता लिहायला बसलो. आज जेवलोसुद्धा नाही.'

मेश्रामांच्या लेखनाचा असा झपाटा असतो. याच 'हकिकत आणि जटायू' या आत्मलेखनपर कादंबरीला पुढे राज्य

शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. मलाही त्याचा आनंद झाला.

याच दरम्यान केशवराव मला 'मॅजेस्टिक'चे केशवराव कोठावळे यांच्याकडे घेऊन गेले. 'ललित' मासिकाचं काम पहाण्यासाठी त्यांना कुणीतरी हवं होतं. मेश्राम सर त्यावेळी 'मॅजेस्टिक'कडं आलेली हस्तलिखितं तपासून देत असत. ह्या तपासणीबरोबर आपल्या फैनाबाज हस्ताक्षरात अभिप्राय लिहिलेला असायचा. वाचलेल्या पुस्तकाचं स्वरुप, त्याचा विषय, आशय, त्यातली अभिव्यक्ती, प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईनंतर वाचक त्याचं स्वागत कसं करतील, त्याची चांगल्याप्रकारे विक्री होईल का, इत्यादी तपशीलवार अभिप्रायासह मेश्राम ते हस्तलिखित केशवराव कोठावळ्यांकडं परत करीत. ह्या कामाबद्दल मेश्रामांना त्यावेळी १५-२० रुपये मिळत असत. एकाच पुस्तकावर इतर तज्ज्ञ मंडळीही आपला अभिप्राय देत असत. परंतु प्रा. मेश्राम यांनी दिलेला अभिप्राय विस्तृत आणि परखडपणे नोंदविलेला असायचा. प्रा. मेश्रामांचे बहुतेक अभिप्राय 'मॅजिस्टिक' ने स्वीकारलेले असायचे.

'ललित'चं काम म्हणून काही मजकूर वाचायला देणं, मुद्रितशोधन करणं, पुनर्वाचन करणं अशी काही कामं कोठवळे शेठ मला सांगत असत. फावल्या वेळात आम्हा दोघात खूप गप्पा व्हायच्या.

एकदा केशवराव कोठावळे मला म्हणाले, 'होवाळ, तुम्हाला मी एक प्रश्न विचारतो. उत्तर लगेच द्यायचं.'

मी म्हणालो, 'विचारा.'

'तुम्ही किती वर्ष जगणार आहात?' कोठावळे शेठनी मला विचारलं.

मी जरासा चमकलोच पण सावरून लगेच म्हणालो, 'शहाण्णव वर्षं! तुम्ही?'

केशवराव कोठावळे म्हणाले, 'मी पंचावन्न-साठ वर्षांपर्यंत जगेन.'

आणि घडलंही तसंच! साठी व्हायच्या आतच केशवराव कोठावळ्यांचं निधन झालं...

मी आता पासष्ठ वर्षांचा झालो आहे.

केशवराव मेश्रामांच्यामुळे केशवराव कोठावळे यांच्यासारख्या एका चांगल्या व भविष्यवेधी संपादकाशी माझी गाठभेट झाली. साहित्याशी निगडित अशा अनेक चांगल्या साहित्यिकांशी माझा परिचय वाढत गेला तो सरांमुळे.

मेश्रामांच्या डोक्यातील विचार आणि लिहिता हात हे सदैव समांतरच चाललेले असतात, हे मी अनेक वर्षं पहातो आहे. झपाटून काम-लेखन-करण्याच्या ह्या गुणवत्तेमुळं नव्या लेखकांच्या अनेक पुस्तकांना सरांनी प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्यांची संख्या शेकड्यांमध्ये मोजावी लागेल. प्रस्तावना लिहिणं, मूळ हस्तलिखित आवश्यकतेनुसार सुधारणे, त्यासाठी प्रकाशक गाठून देणं, त्याचा धडाकेबाज प्रकाशन समारंभ आयोजित करणं, असे कसले-कसले उद्योग मेश्राम सर करत असतात. म्हणूनच मित्रवर्य डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, 'केशव मेश्राम हे लेखकांचे लेखक आहेत.' आज अखेरही नव्या लेखकाचं 'पहिलेपण' दादरच्या मराठी ग्रंथ संग्रहालयात ते उजवतच असतात.




लिहिण्यात असलेला सहजपणा त्यांच्या वक्तृत्वातही आहे. त्यांचं बोलणं अमोघ आणि श्रोत्याला मोहित करणारं असतं. त्यांच्या अखंड बोलण्यातील दृष्टांत, बारीक-सारीक माहिती, काव्यपंक्तींची पखरण यामुळं ते श्रोत्याला दंग-गुंग करून टाकतात. समोर रसिक श्रोतृवर्ग असेल तर त्यांच्या व्याख्यानाला अधिक रंग भरतो. सलग तीन तास बोलण्याचा विक्रमही त्यांनी एकदा केलाय. विषय होता 'आजचं मराठी साहित्य.'

'आम्ही शब्दांचे व्यापारी आहोत. आम्ही शब्द विकतो.' अशी स्वच्छ भूमिका व्यक्त करणारे प्रा. मेश्राम हे एकमेव दलित साहित्यिक असावेत. उत्तम वक्ता आणि चांगला प्राध्यापक या दोन्ही भूमिका ते निष्ठापूर्वक जपतात. वक्ता म्हणून ज्ञानेश्वरीतील एखाद्या अध्यायावर जाहीर व्याख्यान देणं आणि प्राध्यापक म्हणून आपल्या विद्यार्थ्याला तोच अध्याय शिकविणं यात ते फरक करतात. जाहीर व्याख्यानातील टीका-टिप्पणी मेश्राम सर विद्यार्थ्यासमोर मांडत नाहीत. त्याला परीक्षेत चांगले गुण कसे मिळतील, असंच ते शिकवितात. आजपर्यंत त्यांच्या व्याख्यानांची संख्या हजारोंच्या घरात पोचली असेल. विद्यापीठातील व्याख्यानं, जयंती-समारोहातील जाहीर बोलणं, व्याख्यानमालेतील परिसंवाद, साहित्य संमेलनातील वादचर्चा इत्यादी रुपांमध्ये मेश्राम श्रोत्यासमोर येतात आणि फड जिंकतात.

कथाकथनाच्या कार्यक्रमांसाठी मीही त्यांच्याबरोबर अनेकदा गेलो आहे. दोन-अडीचं तासांचा आमचा कार्यक्रम होऊनही एक पैसाही न घेता अनेकदा परत यावं लागलं आहे. येण्या-जाण्याचा खर्चही करावा लागला आहे. 'खाल्लं नाही, प्यालं नाही/ग्लास फोडला, बारा आणे' अशी आमची अनेकदा अवस्था झालेली आहे. मेश्राम सर अशावेळी झकास जेवणं-खाणं (पिणं नाही), टॅक्सी किंवा लक्झरीचा आरामदायी प्रवास यासाठी बक्कळ पैसा खर्च करतात. ह्या सगळ्याला भागून खर्चाचं वाटप दोघात करावं हे त्यांच्या स्वभावात बसत नाही. आपल्यालाच मग समजून उमजून खर्च




करावा लागतो. त्याचा हिशोब नसतो. ह्या बिनहिशोबी कोष्टकाचा वापर करून आम्ही आजही बाहेरचा प्रवास तसाच करत असतो.

व्याख्यानं, त्यातून मिळणारी किर्ती आणि पैसा याचा मद मेश्रामांनी कधीही चढू दिलेला नाही. ह्या कार्यक्रमांच्या निमित्ताने आम्ही दोघांनी हजारो मैलांचा प्रवास एकत्र केला आहे. प्रवासात किंवा मुक्कामात अनेक जिव्हाळ्याच्या विषयांवर चर्चा केलेली आहे.

आवडीनं अध्यापन करणं हा मेश्रामांचा मनापासूनचा छंद आहे. रात्रभर प्रवास करून पुन: सकाळी सात वाजताच्या व्याख्यानासाठी ते हसत मुखानं विद्यार्थ्यांसमोर हजर होतात. अनेकदा प्रवासातील बॅग स्टाफरूममध्ये ठेवून त्यांनी लेक्चर्स घेतली आहेत. त्यात अंगचुकारपणा त्यांनी कधीही केलेला नाही. समोर शंभर विद्यार्थी असोत किंवा दोनच विद्यार्थी असोत, त्यांच्या शिकविण्यात फरक पडत नाही. गेल्यावर्षी शिकविलेल्या विषयात या वर्षी आणखी काय नवीन देता येईल याचा प्रा. मेश्राम सतत विचार करतात. त्यांचा तो मूळ स्वभाव आहे. त्यामुळेच ते शिकविताना सतत ताजेतवाने वाटतात.

दलित साहित्यातील विद्रोह, नकार याबरोबरच दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत आंबेडकरवाद आहे हे सूत्र प्रा. मेश्राम अतिशय मुद्देसूदपणे मांडतात. गेल्यावर्षी मराठी साहित्य संघाने आयोजित केलेल्या उपनगर साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले होते. आपल्या भाषणात त्यांनी माणूस, साहित्य आणि आंबेडकरी विचार याची सुरेख गुंफण केली होती. त्यातलं एकही अक्षर कुठल्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालं नाही. असं का होतं ते बऱ्याचदा कळत नाही. कुणी हेतुत:च अशी व्यवस्था करतं की काय कळत नाही. पण मेश्रामांना त्याची खंत नसते.

अगणित व्याख्यानं, हजारो प्रकाशन समारंभ यासाठी मेश्रामांचा अखंड प्रवास चालू असतो. आजपर्यंत गणती करता येणार नाही इतका त्यांचा प्रवास झाला असेल. प्रा. केशव मेश्राम म्हणजे एक फिरतं, 'मोबाईल थिएटर' आहे. या थिएटरची जास्त डागडूजी करायला लागू नये याची काळजी त्यांनी स्वत:च आता घ्यायला हवी. शेवटी वयाचा म्हणून माणसावर परिणाम होतच असतो. 'आता भटकन्ती कमी करा' असं मी त्यांना सांगतो तेव्हा तोच उपदेश मेश्राम सर मला करत असतात, 'वामनराव, आता दगदग थांबवा.' म्हणजे

### हकिकत आणि जटायू

'आता काळ सगळ्यांसाठीच बदलला आहे. उदारीकरण, जागतिकीकरण, संगणकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था विश्वसंकोच होऊनही मात्र हिंदू मानसिकता बदललेलीच नाही. सगळेच राज्यकर्ते केवळ बोलके ढलपे. वर्णजातीचे पुरस्कर्ते झाले आहेत. आतून पक्के टोळीबाज आणि असहिष्णू झाले आहेत. आमचे बरेचसे प्रकाशक हुकमी धंदा शोधतात आणि माझ्या परिचयातले, मोठाल्या लौकिकाचे अनेक लेखक मित्रही घेवारी, चतुर आणि हुजऱ्यांच्या रांगेतच वावरताना पाहून खेद वाटतो.

मी कधी त्रागा केला नाही. तो माझा स्वभावच नाही. माझी कुठलीही 'टोळी' नाही. माझ्या धर्मबांधवांतही नाही. सगळ्यांना गर्तेत खेचणाऱ्या मातीच्या प्रवाहात जमेल तोपर्यंत मी माझ्या वृत्तीचेच लिहीत राहणार आहे आणि 'हकिकत' सांगूनही न सांगितलेले केवढे तरी माझ्याकडे खूप खूपच आहे. माझ्या परीने त्या लेखनात मी वावरतो आहे.'

- केशव मेश्राम

'तुमच्या पुस्तकातील माणसे माझ्या मनी वस्तीला उतरली. हे केवळ उपेक्षितांचे अंतरंग नाही. चांगली कथा किंवा कादंबरी ज्या अर्थाने अंतरंगाचे दर्शन घडवते त्या अर्थाने तुमच्या कथेतल्या माणसाचे इथे अंतरंग दिसते. ललित साहित्यात पात्रांच्या पेठा कुठल्या हा प्रश्न अगदी गौण आहे. त्यातली माणसे आपल्याला किती कडकडून भेटतात, झोंबतात किंवा छळतात हे महत्त्वाचे. अरविंद गोखल्यांच्या मंजुळेने जसे मला छळले आहे तसाच तुमचा अभिमन छळणार आहे...'

'हकिकत आणि जटायू' विषयी

**- पु. ल. देशपांडे**

'सुगाय सांगते मुगायला अन् भागूबाय जाते जीव द्यायला.' या म्हणीसारखा आपला संवाद चालतो.

मध्यंतरी मी हृदयविकाराने आजारी झालो. त्यावेळी मेश्राम म्हणाले, 'वामनराव, आता हे असंच चालायचं. आपलीही एक दिवस तसली 'बातमी' येईल. त्याला इलाज नाही. शेवटपर्यंत आपले हातपाय शाबूत राहिले म्हणजे झालं.'

त्यांचा हा निराशेचा सूर मला चरका देऊन गेला. मेश्रामांनी मला कधी नव्हे तो उदास बनविलं. पण हा उदासपणाही त्यांनी परवा नाहीसा केला.

त्या दिवशी, दि. १९ डिसेंबर २००२ रोजी, 'दलित पँथरची संस्थापना : वस्तुस्थिती आणि विपर्यास' या राजा ढाले यांच्या पुस्तक प्रकाशनाचं आयोजन केलं होतं. अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतावणे तर प्रमुख वक्ते म्हणून अविनाश महातेकर व प्रा. केशव मेश्राम व आप्पासो रणपिसे होते. 'आज काहीतरी चांगलं ऐकायला मिळणार.' या उद्देशानं मराठी ग्रंथसंग्रहालयाचा हॉल भरून ओसंडत होता. कार्यक्रम छानच झाला.

प्रा. केशव मेश्राम यांनी आपल्या भाषणात पँथरचा झंजावात, त्यातला तरुणांचा सहभाग, डोक्याला कफन बांधून रस्त्यावर उतरण्याची तयारी हा सगळा इतिहास श्रोत्यांसमोर पुनःश्च उभा केला. त्याचबरोबर आता ती परिस्थिती राहिली नसून समाजात मरगळ निर्माण झाल्याबद्दल खंत व्यक्त केली. 'तो जल्लोष तुम्ही मंडळींनी पुन: एकदा निर्माण केला पाहिजे. पँथरसारखा झंझावात पुन: एकदा बघण्यासाठी मी अजून पंधरा वर्षंतरी रहाणार आहे.' प्रा. मेश्रामांच्या ह्या वाक्यानं टाळ्यांचा कडकडाट झाला.

मेश्राम सरांनी व्यक्त केलेली ही मानसिक उभारी मला आनंद देऊन गेली. आता तर त्यांना महाराष्ट्र फाउंडेशनने त्यांच्या साहित्य सेवेबद्दल पन्नास हजार रुपयांचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. महाराष्ट्र फाउंडेशनने सुयोग्य साहित्यिकाची निवड केल्याबद्दल मी मन:पूर्वक आभार मानतो. प्रा. मेश्राम यांना दीर्घ आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो आणि त्यांच्याकडून आणखी साहित्य निर्मिती होवो, अशी सदिच्छा मी मनापासून व्यक्त करतो.

**– वामन होवाळ**

## प्रांजळ शब्दव्रती

# प्रा. केशव मेश्राम

दलित साहित्यातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल प्रा. केशव मेश्रामांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने विशेष पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला, ही अत्यंत उचित अशी घटना आहे. शालेय दिवसांपासून आजपर्यंत केशव मेश्राम या व्यक्तीशी आणि त्याचबरोबर खऱ्या अर्थाने कवीशी माझा भावबंध जुळलेला आहे. या भावबंधामुळेच केशव मेश्रामांच्या साहित्यातील योगदानाबद्दल 'चार शब्द' लिहिणे मला अत्यंत समाधान देणारे आहे. खरे पाहता शालेय जीवनात एकच वर्ष आम्ही एका वर्गात होतो. इयत्ता नववीत खेड्यातून शहरात आलेला एक आणि नववीनंतर मुंबईसारख्या महानगरीतून अकोल्याला जावे लागलेला 'एक' अशा दोघांचा इतका प्रदीर्घ काळ भावबंध जुळलेला रहावा, ही एक कवितेने, साहित्याने केलेली आगळिकच म्हणता येईल. दोघांचीही सुरुवात 'कविते'नेच झाली. त्यात एक थांबला, तो थांबलाच! दुसरा लिहीत राहिला... लिहिता लिहिता पुष्कळ काही 'निर्माण करता' झाला, पण त्याच्या लिहिण्याची साहित्यविश्वाने ज्या आत्मीयतेने दखल घ्यायला हवी होती, तितकी दखल घेतलीच नाही, साहित्य विश्वाने अशी दखल घ्यावी यासाठी




सामान्यत: लागणारा 'हिकमती' स्वभावच त्याच्या ठिकाणी नव्हता... नाही, आणि नाही तेच बरे आहे! अशा 'हिकमती' करून 'मिळवले' त्याचे क्षणात कसे 'वारापाणी' होते, तेही आपण पाहतोच आहो. असो. 'एक नाटक वगळता कविता, कथा, कादंबरी, ललित गद्य, समीक्षा, बालवाङ्मय या सर्व क्षेत्रांत माझे भरपूर लेखन, निरनिराळ्या नामवंत प्रकाशकांनी सातत्याने प्रकाशित केले असूनही, शासनाची सहा पारितोषिके कथा, कविता, कादंबरी ह्या वाङ्मय प्रकारांना मिळूनही, माझा बोलबाला कमीच आहे, ही वस्तुस्थिती आहे.' अशा शब्दांत केशव मेश्रामांनी आपली 'खंत' व्यक्तही केली आहे. त्याच बरोबर वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून रसिक मनांशी आणि शब्दांशी सलगी साधणे ही प्रोत्साहक आणि हुरूप देणारी गोष्ट आहे. यश-अपयश हे ऊन-सावलीसारखे येत राहतात - जात राहतात. सगळ्या शब्दप्रवासालाच एक अनोखी मस्ती आणि नशा आहे. तिच्यात वावरायला आपणाला काहीसे साधले एवढेही मला पुरेसे वाटते.' अशा शब्दांत समंजसपणे त्यांनी 'हे सर्व' स्वीकारलेही आहे. अशा या 'शब्द प्रवाश्या'ची महाराष्ट्र फाउण्डेशनने योग्य वेळी विशेष दखल घेतली हे खूप महत्त्वाचे आणि समाधानाचेही आहे. त्यामुळेच लिहिण्यांशी फारसा अनुबंध न राखलेल्या व्यक्तीलाही 'लिहिण्यात समाधान आहे' असे म्हणावे लागले आहे.

केशव मेश्राम यांचे लेखन भिन्न भिन्न प्रकारचे असले तरी त्यांची मूळ प्रकृती कवीची आहे. त्यांनी साहित्यसृष्टीत प्रवेश केला तोच कवी म्हणून. त्यांची पहिली कविता एकोणिसशे अठ्ठावन साली प्रसिद्ध झाली. तेव्हापासून ते सातत्याने कविता-लेखन करीत आहेत. 'उत्खनन', 'जुगलबंदी', 'अकस्मात', 'चरित' आणि 'कृतकपुत्र' असे त्यांचे एकूण पांच कवितासंग्रह आजपर्यंत प्रकाशित झाले आहेत. मेश्राम ज्या दलित वर्गातले आहेत, त्याचे खोल संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. तशीच नागर, उच्चभ्रू समाजात वावरताना होणारी विशिष्ट

वर्गाची कुचंबणा, ससेहोलपटही त्यांच्या संवेदनाक्षम मनाने अचूक टिपली आहे. निसर्गाच्या विविध कला त्यातल्या सर्व तरल छटांसह रंगवणाऱ्या त्यांच्या लेखणीला शहरी जीवनातले रुक्ष, कडवट अनुभव चित्रित करताना तीक्ष्ण शस्त्राची धार चढते. त्यांच्या स्वप्नाळू वृत्तीला उत्कट सामाजिक जाणिवेची जोड मिळाली आहे. अत्यंत आत्मरत असूनही सामाजिक बांधिलकी आग्रहपूर्वक मानणारा हा कवी, म्हणून त्यांची कविता जितकी त्यांची आहे, तितकीच ती समाजाच्या एका थराचीही आहे. ज्या वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतून कवीचा आजवरचा जीवनप्रवास झाला आहे, त्या स्तरांचे हे निर्भीड आणि डोळस 'उत्खनन', त्या स्तरांमधली 'जुगलबंदी', आयुष्यात 'अकस्मात' येणाऱ्या कडुगोड क्षणांना साकार करताना जीवनाच्या विचित्र, विपरित आणि अनेकपदरी आशयाचा शोध घेणारी आत्मशोधक वृत्ती या कवितेला व्यापून राहिली आहे. म्हणूनच मानवी आयुष्यक्रमातील सर्वच व्यथा, वेदनांचे आणि आनंदकल्लोळांचे 'चरित' त्यांच्या कवितेतच सहजगत्या व्यक्त होते.

मराठी कवितेचा प्रवाह अनेक धारांनी समृद्ध आणि व्यामिश्र आहे. एकोणिसशे साठ नंतर प्रामुख्याने सामाजिक बांधिलकीचा अंत:स्रोत मराठी कवितेचा अविभाज्य भाग बनला. कवितेच्या समीक्षाव्यापारात 'दलित कविता' आणि 'आंबेडकरी जाणिवा' या शब्दांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात केशव मेश्राम या कवीचा मोठा वाटा आहे. सतत परावर्तित होणारे कालचक्र, व्यक्तिमनातील सूक्ष्म सल आणि सर्वहारा वर्गातील अनेकानेक जखमांचा ठणका केशव मेश्रामांच्या कवितेत स्वाभाविकपणे उमटतो. विश्वातील सर्वच अनुभव ते स्वत:च्या ढंगाने कवितेत संक्रमित करतात. 'उत्खनन' पासून 'कृतकपुत्र'पर्यंत सर्वच कवितेत हे सारे रसायन एकवटले आहे. म्हणूनच ही कविता केवळ दलित कविता न राहता मराठी कवितेच्या व्यापक परंपरेचा एक अविभाज्य भाग बनली आहे. केशवसुतांपासून चालत आलेला निर्भरशील मनोवृत्तीचा वारसा जसा या कवीने आत्मसात केला तसाच मर्ढेकरांच्या कवितेतील अनिर्भिरशील मनोवृत्तीला, वास्तव जाणिवेलाही हा कवी मनापासून भिडलेला आहे. निर्भरशीलता आणि वास्तव शोध या कवीच्या कवितेत एकवटला असल्यामुळेच



तिचा स्वत:चा एक वेगळाच 'पोत' आहे. म्हणूनच केशव मेश्रामांच्या कवितेच्या यशापयशाचा विचार करताना तिच्या 'दुभंगलेपणा'वर बोट ठेवण्यापेक्षा मानवी जीवनाच्या व्यामिश्रतेचा त्यांच्या कवितेत कसा एकसंध प्रत्यय येतो, याचाच विचार करणे महत्त्वाचे वाटते.

कवितेप्रमाणे कथा आणि कादंबरी या प्रांतातही केशव मेश्रामांनी मराठी सारस्वताला महत्त्वाचे योगदान दिले आहे. दलित साहित्याच्या प्रवाहात विविध आत्मकथनांना



विशेष महत्त्वाचे स्थान आहे. एक लक्षणीय भाग असा की केशव मेश्राम या वाटेने गेलेले नाहीत. पण हे म्हणणे दलित साहित्याच्या 'स्थितिगती'चा खऱ्या अर्थाने वेध न घेण्याचेच लक्षण म्हणावे लागेल. दलित आत्मकथनात समीक्षक 'बलुतं' पासून 'कोल्हाट्याचा पोर'पर्यंत सर्व आत्मकथनांचा अंतर्भाव करतात. 'ज्येष्ठ मित्रांना' मध्येही केशव मेश्रामांना आवर्जून स्थान देतात. पण, संकल्पना आणि स्वरूपाचा विचार करताना केशव मेश्रामांचे सहेतुक वा अहेतुक विस्मरण होते. 'हकीकत व जटायू'ने केशव मेश्रामांना लौकिक दिला. जर्मन, कन्नड, तेलगू, मल्याळम्, हिंदी, पंजाबी, गुजराती इत्यादी भाषांत त्यांचे कमी अधिक प्रमाणात अनुवादही झाले आहेत; आणि ते विद्यापीठीय अभ्यासात अंतर्भूतही झाले आहेत. हे यश लेखकाला 'सुखदायक' निश्चित आहे. पण दलित साहित्याच्या या प्रांतात केशव मेश्रामांचा नावनिर्देशही नसावा हे निश्चितच क्लेशदायक म्हणावे लागेल. केशव मेश्रामांनी तसे

म्हटलेले नसले, तरीही! केशव मेश्राम हे मूलत: वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असल्यामुळे कविता, नाटक आणि कथनात्मक साहित्य (कथा, कादंबरी) हे मूलभूत वाङ्मयप्रकार आहेत, याची त्यांना जाण आहे. मराठी साहित्याच्या संतकाव्य, शाहिरी कविता, पंडिती कविता इत्यादी आविष्कारांचे त्यांनी आवर्जून वाचन केले आहे. आधुनिक मराठी साहित्याचा त्यांनी प्रत्येक कोपरा धुंडाळला आहे. त्यामुळे कुठला अनुभव कुठल्या वाङ्मयप्रकारात अभिव्यक्त करावा, याची त्यांना सखोल जाणीव आहे. याच प्रगल्भ जाणिवेमुळे त्यांनी 'हकिकत आणि जटायू'ला आत्मपर अनुभवांना उचित असा कादंबरी किंवा




कादंबरिके'चा घाट दिला आहे. 'हकीकत' आणि 'जटायू' कादंबऱ्या असोत 'कादंबरिका' असोत किंवा दीर्घ कथा असोत, त्यांचा अंतर्भाव कथनात्मक साहित्यात होतो, एवढे निश्चित. कलावंताला आपल्या दु:खाची आणि संतापाची आग देऊन एक 'मूर्ती'च घडवावी लागते. ते सारे दु:ख आणि संताप, ते अन्याय, ती निराशा, ती अगतिकता, हे सारे त्या 'मूर्ती'च्या दर्शनाने दिसायला हवे. 'विकृतीच्या चित्राला' कलावंताला कलात्मक घाट द्यावा लागतो. त्यासाठी कलावंताचा 'विलक्षण कोरडेपणा' असावा लागतो. कलाकृतीचा आस्वाद घेताना रसिकाला 'स्वपर तटस्थ'तेच्या पलीकडे जावे लागते. कलाकृतीच्या निर्मितिप्रक्रियेत कलावंतालाही कलात्मक ताटस्थ्यच आवश्यक असते. असे जेव्हा घडते तेव्हाच 'शोकाला', श्लोकत्व प्राप्त होते. केशव मेश्रामांना 'हकिकत' आणि 'जटायू'मध्ये ही किमया साधली आहे. म्हणून पु. ल. देशपांडे यांना या 'दीर्घ कथा' वाचताना गोर्कीच्या आत्मचरित्रपर लेखनाची आठवण झाली. मराठीतील दलितांची आत्मकथने जर या वाटेने आणि या 'घाटा'ने प्रकट झाली असती तर मराठी साहित्याचे दालन आज अधिक समृद्ध एवढेच नव्हे, तर किमान बांगला, हिंदी भाषेतील साहित्या इतके तरी समृद्ध झाले असते. केशव मेश्रामांची 'पोखरण' ही कादंबरीदेखील मराठीतील दलित साहित्यातील एक महत्त्वाची साहित्यकृती आहे. आर्य द्रवीड संघर्षापूर्वीच्या कालखंडातील आदिम संघर्षाचे चित्रण करण्याऱ्या या कादंबरीने एकाच वेळी आदिम संघर्षाचे प्रत्ययकारी दर्शन घडवीत असतानाच सद्य कालीन समाजजीवनातील संघर्षाचेही अत्यंत कलात्मक पातळीवर दर्शन घडविले आहे. 'हकीकत' 'जटायू' आणि 'पोखरण' या मेश्रामांच्या महत्त्वाच्या साहित्यकृतींचा मराठी समीक्षेने जितक्या साक्षेपाने विचार करणे अगत्याचे होते तितके झालेले नाही हे खेदाने नमूद करावे लागत आहे. (डॉ. योगेंद्र मेश्राम हा सन्मान्य अपवाद) नाटक हा वाङ्मय प्रकार कधी लिहायला हिम्मतच झाली नाही, असे प्रांजळ निवेदन मेश्रामांनी केले आहे. आपल्या प्रकृतीला भावणारा वाङ्मयप्रकार लेखकाने निवडावा, हे स्वाभाविकच आहे. आपल्या प्रकृतीला अनुसरून मेश्रामांनी 'हकीकत' आणि 'जटायू'मध्ये कथात्मक घाट निवडला आहे आणि त्या घाटाला साजेशी उंचीही गाठली आहे, 'दलित' असो वा 'अदलित' असो वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाकडून हीच खरी अपेक्षा असते. ती अपेक्षा केशव मेश्रामांच्याच शब्दांत त्यांच्या साडेतीन कादंबऱ्या निश्चित पूर्ण करतात. श्रेष्ठ साहित्यकृतीच्या संदर्भात विंदा करंदीकरांनी 'अस्वस्थ' करते ती खरी साहित्यकृती असे म्हटले आहे. केशव मेश्रामांच्या कादंबऱ्या किंवा कांदबरिका 'साडेतीन' असल्या तरी त्या मेश्रामांना केवळ 'लौकिक' देणाऱ्या नसून लौकिकापार नेणाऱ्या आहेत, हे निर्विवाद आहे. करंदीकरांच्याच शब्दांत मी मेश्रामांना म्हणेन, 'केशवा एवढे यश तुला रगड!'

कथात्मक साहित्यातील 'कथा' या वाङ्मयप्रकारातही केशव मेश्रामांनी विपुल लेखन केले आहे. 'खरवड', 'पत्रावळ', 'धगाडा', 'मरणमाळा', 'आमने सामने', 'कोळीष्टके' हे त्यांचे कथासंग्रह. 'ज्वाला-कल्लोळ' हा त्यांचा निवडक कथांचा संग्रह. (संपादक म. द. हातकणंगलेकर) मेश्रामांनी त्यांच्या लेखनासंबंधी लिहिताना सवंग, अभिरूचिशून्य कथा मी कधी वाचल्या नाहीत. एकदाही चुकून लिहिल्या नाहीत, 'माझे लेखन समग्र आयुष्यात घडलेल्या अनेकांच्या सुखदु:खाचा, यशापयशाचा तिरस्कार प्रीतीचा स्वतंत्र किरण आहे, त्यात मी थोडाफार उजळून निघतो; कारण जळूनही जातो'. असे लिहिले आहे. एक नवसंस्कृती निर्माणाचे मूल्य हा कथालेखक मानीत असल्याकारणाने त्या मूल्यशोधात अडसर निर्माण करणाऱ्या सर्व घटकांकडे मेश्राम निर्ममतेने पाहतात. मानवी आयुष्याला क:पदार्थ ठरवणाऱ्या सर्व घटक, घटितांकडे ते जसे बघतात, तसेच ते जन्मसिद्ध स्वजाती-धर्मियांच्या विकृतीकडेही पाहतात. त्यांच्या अनेक कथांमध्ये हे धीट आत्मशोधन आढळते. हे त्यांचे वेगळेपण अन्य समीक्षकांनीही नोंदविले आहे. मेश्रामांची लेखणी स्वजातीयांच्या दोषाचेही तितक्याच कठोर वस्तुनिष्ठपणे चित्रण करते. दारिद्र्य, बकालपण, विविध व्यावसायिकांचे चित्रविचित्र

व्यावहारिक हिशेब, स्त्रीपुरुषांतील इष्टानिष्टता नेमकेपणाने पकडून मेश्राम कथामर्म बोलके तर करतातच पण त्यापेक्षाही परिवर्तनाचे सूत्र त्यांनी आपल्या कथाविश्वात सतत गुंफलेले असल्यामुळे त्यांच्या कथाविश्वाला एक वेगळे परिमाण लाभते. वास्तव 'काय' आहे हे सांगत असताना त्यांच्यातील कथानिवेदनकाला वास्तव 'कसे' असायला हवे याचेही भान असते. कोणत्याही साहित्यकृतीत मानवी जीवन कसे आहे, हे तर सांगितलेले असावे लागतेच पण त्याचबरोबर मानवी जीवनाच्या पूर्णतेचे किमान त्या दिशेचे दर्शन घडावे लागते. साहित्यकृतीच्या हवे-नकोपणाच्या संदर्भात प्लेटो-ॲरिस्टॉटल यांच्या संवादात हाच घटक अधोरेखित केलेला आहे. मुंबईसारख्या महानगरी अधोजीवनाचा विशाल भू-प्रदेश, त्याची स्थिती-गती सूक्ष्मपणे जाणणाऱ्या लेखकाकडून अध:स्तरातील जीवनाचे चित्रण आपल्या कथात्मक साहित्यातून किमान 'हकीकत' 'जटायू'च्या उंचीवर न्यावे, अशी अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल, असे वाटत नाही. आत्मोल्लंघन करण्याची क्षमता केशव मेश्रामांनी गमावली नसेल, तर त्यांना हे निश्चितच शक्य आहे.

ललित लेख किंवा ललित गद्य या स्वरूपाचे लेखनही मेश्रामांनी केले आहे. 'ललित-गद्याच्या आविष्कारात मला खूप मोकळे वाटते इतका मुक्त आणि सर्व समावेशक अन्य, वाङ्मयप्रकार अजून हाताशी नाही' अशा शब्दात मेश्रामांनी या वाङ्मयप्रकाराविषयी आपले मनोगत व्यक्त केले आहे. 'छायावन'मधील लेखन काही अंशी अनुकरणात्मक असले तरी 'रुतलेली माणसे', 'गाळ आणि आभाळ', 'गळतीचे क्षण' यांतील लेखन वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'रुतलेली माणसे' हे मेश्रामांचे सर्वात आवडते पुस्तक. त्याची दखल जितकी घेतली जायला हवी होती, तितकी घेतली गेलेली नाही. या रुतलेल्या माणसांत मेश्रामांचे 'गणगोत' सामावलेले आहे. 'आजी', 'बिताई', 'नाना', 'नानी' या गणगोतात काणेकर सरही आहेत. 'या सगळ्या काळावर काणेकरांची 'चांदरात' पसरली होती. 'धुक्यातून लाल ताऱ्यांकडे' गेलेल्या सरांच्या पक्वपिकल्या अशा आठवणींच्या असंख्य 'अनामिका' मनात बकुलफुलासारख्या फुलल्या आहेत. ही 'सावल्यांची' गर्द 'राई' केवळ अविस्मरणीय आहे'. अशा भावविभोर शब्दांत मेश्राम काणेकर सरांची आपल्याला ओळख करून देतात. मेश्रामांची 'आजी'देखील अशीच मनात घर करून राहणारी आहे. 'पण माझे पाऊल कधीही अकोल्याच्या घराच्या दारात पडले की, बाजूचे कुडुनिंब माथा हलवीत सळसळतात. एखादे पाखरू कोणत्याही वेळी का कुणास ठाऊक, पण त्यावरून फडफडत निघून जाते. मग मला आजीचे शब्द आठवतात. 'गुडून खा... बुडू नोका' मी मनातच आजीला बघतो आणि नानीला हाक मारतो. 'नानी, मी आलो - कवाड उघड'.... फाटक आजीसारखे हळूच मागे मागे जाते, मला आत बोलावते'. अशा विलक्षण हळव्या शब्दांत मेश्राम आपल्या आजीची सय जागवतात. अशी शब्दांत झंकारणारी भावनेची कोवळिक मेश्रामांच्या लेखनात आढळते. मराठी रसिकतेचे या 'रुतलेल्या माणसां'कडे यापेक्षा अधिक लक्ष जाणे निश्चितच आवश्यक होते. 'पण 'रुतलेली माणसे' हे माझे सगळ्यात आवडते पुस्तक. त्याला काही परिचितांनी आकसाने त्याच्या योग्य श्रेयापासून डावलले' अशा शब्दात या पुस्तकाविषयी आणि विशेषत: या 'रुतलेल्या माणसां'विषयी मेश्रामांनी आपली खंत व्यक्त केली आहे. त्यात तथ्य निश्चितच आहे.

समीक्षात्मक आणि वैचारिक स्वरूपाचे लेखनही मेश्रामांनी विपुल केले आहे. आपल्या समीक्षा लेखनाविषयी मेश्राम लिहितात, 'मी समीक्षा लिहिली. वेळोवेळी केलेल्या पुस्तक परीक्षणांच्या स्वरूपात, काही लेखांच्या रूपात, काही संशोधन स्वरूप उकलण्याच्या पद्धतीने लेखन झाले आहे.' 'शब्दांगण', 'प्रश्नशोध', 'बहुमुखी', 'समन्वय', 'अन्वेषण', 'शब्दबंध, 'अक्षर भाकिते' आणि 'शब्दव्रत' ही मेश्रामांची या क्षेत्रातली ग्रंथसंपदा. 'विद्रोही कविता' आणि 'दलित साहित्याची स्थितीगती' ही मेश्रामांची संपादित पुस्तके. ललित साहित्य निर्मितीत आणि समीक्षेत रस घेणाऱ्या केशव मेश्रामांचे 'डॉ. आंबेडकर चिंतन' हे पुस्तक वेगळ्या स्वरूपाचे आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारधनाचे नव्याने चिंतन करणारे हे पुस्तक मेश्रामांच्या ग्रंथसंपदेत वेगळेपणाने उठून दिसणारे आहे. 'गाथा सप्तशती'पासून 'तुकारामाच्या गाथे'पर्यंत आणि दलित संकल्पनेपासून स्वत:च्या लेखनापर्यंत, मेश्रामांनी लेखन केले आहे. आपल्या लेखनाबद्दल मेश्राम म्हणतात, 'माझ्यासोबतच इतरांनाही त्यातून आपापली वाट सापडत जाते हेच तर खरे लेखनाचे अमोघत्व मी मानतो'. 'अशा प्रांजळ वृत्तीने या 'शब्दव्रती'ने आपले लेखन केले आहे. दलित साहित्याच्या प्रवाहात राहूनही हा शब्दव्रती त्या पलीकडेही विपुल आहे.' हे लेखन मेश्रामांना 'जितके समाधान देते त्यापेक्षा अधिक असमाधान देते.' खरा कलावंत, साहित्यिक नेहमी असमाधानीच असावा लागतो कारण त्या असमाधानातून त्याला अनेक पारंब्या फुटत असतात. फुटाव्यात!

**— सुभाष सोमण**

# प्रा. दत्ता भगत
## एक 'गण' शोध

नाटककार दत्ता भगत यांचे कागदोपत्री नाव दत्तात्रय गणपत भगत असे त्यांच्या शाळेच्या दाखल्यापासून इतर सर्व महत्त्वपूर्ण नोंदीत आहे. पण मराठी साहित्य, समीक्षा आणि शिक्षणक्षेत्रात मात्र दत्ता भगत या पंचाक्षरी नावाची मोहोर उमटलेली आहे. या सुलभीकरणाची ही एक कथा आहे. शाळकरी वयात मुलाला आपली झेप जरी जाणवत नसली तरी जाणते शिक्षक पाणी जोखतात. त्यांच्या गुरुंनी वक्तृत्वस्पर्धेत उठून दिसणाऱ्या, नाटिकातून चमकणाऱ्या या तरतरीत मुलाचे नाव कौतुकाने 'दत्ता' - असे केव्हातरी सुटसुटीत केले आणि मुलाने ते स्वयंतेजाने तळपते ठेवले. तेव्हाच्या त्या नूतन मराठी विद्यालयाचे पुढे पीपल्स हायस्कूल या शाळेत विलिनीकरण झाले तसे हे 'दत्तात्रय' आता न्यूयॉर्कच्या जॉन हॉपकिन्स संस्थेपर्यंत 'दत्ता भगत' म्हणून नोंदले गेले आहे.

नाटक लिहिण्याचा उद्योग त्यांनी केला नसता तरी नाटकाचे आणि त्यांचे नाते जुळले असतेच. शाळेत इंद्रधनुष्याच्या सातरंगातून राष्ट्रीय एकात्मता सुचविणारी




एक बोधप्रद नाटिका गुरुवर्य प्रभाकर कुलकर्णी यांनी स्वत: लिहून बसविली होती. त्यातला एक रंग लागला तो बराच काळ टिकला. पुढे 'वेड्याचं घर उन्हात' हे नाटकही शाळेने उत्साहाने सादर केले. तिथे गुरूजनांसोबत एक भूमिका वाट्याला आली. आणि नाटकाचे धडे गिरविले. रत्नाकर मतकरी यांच्या 'दुखऱ्या गुडघ्याची गोष्ट' या कथेचे नाट्यरूपांतर करून एक देखणा प्रयोग झाला. त्यावेळी हा दत्ता नाटककार होईल असे कुणी म्हटले नव्हते. भूमिका करण्यातून एक दिग्दर्शक मात्र उदयाला येत होता. 'दिवा जळू दे सारी रात' हे नाटक तर प्राध्यापकांनी बसविले होते. विजय तेंडुलकर यांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकापर्यंत त्यांनी मळलेल्या वाटेनेच वाटचाल केली. 'शांतता...'च्या दिग्दर्शनाने त्यांच्या दृष्टिकोनात बरीच उलथापालथ केली असावी. तिथून त्यांची कक्षाच पूर्णत: बदलली. जर मराठी एम.ए.कडे आले नसते तर समाजशास्त्राकडे जाऊन आज कृतिशील संशोधनात शिरले असते. ही 'चरित्रात्मक समीक्षा' यासाठी की, त्यांच्या लेखनविश्वाचे आकलन सोपे व्हावे. त्यांच्या प्रत्येक नाटकाच्या मागे एक समाजशास्त्राचा विचार करणारे मन आहे, याचे मर्म बी.ए.ला मराठी पाठ्यपुस्तके न मिळाल्याने त्यांनी हिंदी पुस्तके एकटाकी भाषांतरित केली होती; त्याचा एक विषय सामाजिक मानसशास्त्र होता आणि दुसरा अपवर्तनाचे मानसशास्त्र होता अशा काही ठिकाणी शोधावे लागेल. सर्जनशील लेखनाकडे वळताना आधी कथालेखन, काव्यलेखन केल्याच्या खुणा आहेत. बायोडेटामध्ये त्या दिसतात. म्हणजे त्यांना मान्य आहेत. त्यामुळे शिक्षक म्हणून शिकवित असताना रोमँटिसीझमकडे ते क्षमाशीलपणे पाहू शकतात. 'आषाढघनातील वेदना', सुखाचा शोध, पहिलं प्रेम ही नावे विगत दिवसातल्या भावुक, हळव्या काव्यात्म अशा वृत्तीची पदचिन्हे आहेत. ऑक्टोबर ७१च्या सत्यकथेत 'प्रकाशाचे टिंब' ही कथा आहे आणि त्याच





नाव : दत्तात्रय गणपतराव भगत
जन्म : १३ जून १९४५
साहित्य
कथा : होळी
: कायापालट
नाटक : खेळिया
: वाटा-पळवाटा
अश्मक
एकांकिका : आवर्त आणि इतर एकांकिका
: चक्रव्यूह आणि इतर एकांकिका
: जहाज फुटलं आहे आणि इतर एकांकिका
समीक्षा : दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर
: दलित साहित्य : प्रवाहाचा अभ्यास
: निळी वाटचाल
: नरहर कुरुंदकरांच्या लेखनाची सूची
अनुवादित : सात शिखरे (कथा)
: म्यूलॅटो (नाटक)
: कलंकी (नाटक)

दिवसातील 'प्रश्नोपनिषद्' ही कविताही आहे. तिथून त्यांच्या लेखनाची नवी झेप दिसते.

आधीच्या त्यांच्या जडणघडणीत प्रश्न नव्हते, समस्या नव्हत्या असे म्हणण्याचा माझा बाळबोध हेतू नाही. सत्तरीच्या दशकानंतर या समस्या सर्जनशील लेखनातून मुखर होताना दिसतात एवढेच मला नम्रपणे सुचवावेसे वाटते. आपण 'शिशिरागम'नंतरचे वेगळे मर्ढेकर पाहतो तसे इथे आहे. वाढ विकासापेक्षा वेगळे काही परिवर्तन, a total departure! कदाचित याच काळात त्यांना स्वत्व गवसले असेल. सुरवंटाचे फुलपाखरू म्हणणार होतो पण त्याच्याबाबतीत मधमाशीसारखे परिवर्तन mutation झालेसे वाटते. कारण पुढे ज्या वाटेने ते चालत आहेत ती स्वच्छंदवृत्तीची नाही, समाजविन्मुख तर नाहीच नाही. ते आपल्या लेखनातून प्रश्न विचारतात ते व्यवस्थेला असतात. रचनेला असतात. एके काळी 'अस्तित्व हे जाणीवेने निर्धारित' असे काहीबाही वाचलेले बडबडण्यातून आम्ही तत्त्वज्ञाचा आवही आणीत असू. त्यातूनच विचार करतो म्हणून मी आहे. (Cogito ergo sum) असे सूत्र बाहेरून सापडले. पण पुढे भगतांचा सारा विचारव्यूह बदललेला दिसतो.

"It is not the consciousness of men that determines their existance, but on the contrary their social existance determines their consciousness."

असा व्यत्यास त्यांच्या लेखन प्रक्रियेला आकार देऊ लागला असावा. आर्थिक रचनांच्या पायावर कलेची अतिरचना (super-structure) उभी असते, हे प्रसिद्ध सूत्र मनोमन जाणूनच त्यांचा पुढील प्रवासाचा मार्ग ठरत गेला असावा. माझे हे आकलन नसून अंदाज आहेत. कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाची गुंतागुंत इतकी सोपी नसते याचे भान ठेवूनच भगतांकडे पहावे लागेल. इथे त्यांच्या एकूण साहित्यप्रवासाचे अवलोकन-आकलन हा माझा प्रपंच नाही त्यातले काही प्रारंभिक बिंदूच तेवढे मला सांगता आले तर त्यांच्या 'निळी वाटचाल' या मार्गक्रमणाचा मागोवा घेता येईल म्हणून ह्या नोंदी 'क्ष' अक्षावरील भगत दाखवतील तर 'य' अक्षावरील लेखन सुचवितील.

त्यांच्या व्यवसायाचा आरंभ शाळेत इंग्रजी-मराठी-भूगोल शिकविण्यापासून झाला असला तरी थांबणे हा त्यांचा प्रकृतिधर्म नाही. संधी मिळाली असती तर डॉक्टर-इंजिनिअर होऊन ते व्यवस्थेचा भाग झाले असते का? अशा प्रश्नांना आता अर्थ नाही. जी वाट सापडली तिच्यावर स्वार होत पुढे जाण्याचा त्यांचा स्वभाव असल्याने अडचणींचा, अडथळ्यांचा, संकटांचा ताण दिसू न देता अविश्रांत परिश्रम हे त्यांचे आरंभापासूनचे सूत्र आहे. शिकवण्या केल्या, त्यात अमराठी भाषिकांना मराठी शिकविणे अथवा नापासांना परिक्षेसाठी मदतीचे वर्ग असेही उपक्रम होते. पण मी समाजसुधारणेसाठी धडपडलो आहे असा आव नसे. अजूनसुद्धा कुणा नवोदित कवी लेखकाचे हस्तलिखित मान मोडून ते तपासून देतीलच. उपप्राचार्य असताना एक वर्षभर समोर येणाऱ्या मराठी अर्जातील एकाक्षरी शब्दांच्या लेखनातील मि, तु, कि ह्या दोषांना दूषण न देता, दूर



करण्यासाठी तो दुरुस्त अर्ज पुन्हा लिहून आणायला तो अत्यंत शांतपणे सांगताना सहकाऱ्यांनी पाहिलेले आहे. त्यांच्यातला शिक्षक आशावादी आहे. एम.ए.चे शिकविणे सांभाळून दलित साहित्यातील बोलीतील शब्दांचा कोश तयार करण्यासाठी शिस्तशीर अभ्यासासाठी त्यांनी कार्डे तयार करून एक संदर्भ सूची केली होती. प्रतिष्ठानची लेख सूची, नरहर कुरुंदकर वाङ्मयसूची अशा उठाठेवी त्यातल्याच. रुक्ष कामे रसिकतेने करण्यात ते वाकबगार आहेत. एन्.एस्.एस्.च्या निमित्ताने 'अकाऊंट' नावाचे प्रकरण त्यांना हाताळावे लागले. त्यांचे ते ज्ञान प्राचार्यांच्या कारकिर्दीत परीक्षा विभागात उपयोगी पडले असावे. अशा गोष्टीत वेळ व्यर्थ जाऊन सर्जनशील लेखनासाठी वेळ उरत नाही अशा सबबी नाहीत. झेरॉक्स येण्यापूर्वी 'खेळिया' नाटकाच्या नऊ-दहा प्रती हाताने लिहिण्याचा उपक्रम

करताना त्यांना शेजाऱ्यांनी पाहिले असेल त्यामुळे त्यांच्यापुरता आयुर्विम्यासारखा कष्टाला पर्याय नाही हे त्यांचे अलिखित ब्रीदवाक्य आहे. त्यात पुन्हा Perfectionचा ध्यास असल्यामुळे तीन चारदा केलेला Ph.D.चा निर्धार अजून तरी अ-जून अम्लान आहे.

पंचावन्न वर्षे उलटली तरी त्यांच्या नव्या योजना चालू आहेतच. त्या आणखी पुढची पंचावन्न वर्षे नक्कीच चालू राहतील. वडिलांच्या नावातील 'गणपती'मधून 'गण' हा रूपिम बाजूला करून त्यांनी आपल्या घराचे नाव अर्थपूर्णपणे 'गणशोध' असे ठेवले. या शोधात अनेक मित्र जोडले. त्याचे कारण नावडते अथवा मतभेदाचे मुद्दे वगळून ते common platform वर अनेकांशी हृदयसंवाद साधू शकतात हे आहे. पण बाह्यत: समाजाभिमुख वाटणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक सतत अस्वस्थ, कुठल्यातरी वेगळ्याच विश्वात गुंतलेला, गुंगलेला एक 'दूरस्थ कुणी' असल्याचे जाणवते. त्याला आसपासचे लोक विसरभोळेपणा समजतात. सौजन्याने त्यावर फक्त हसण्याइतका सुसंस्कृतपणा त्यांच्यात आहेच. त्यांच्यातल्या लेखकाने अधिक हिंस्र (नरभक्षक नव्हे तर उग्र या अर्थाने) असायला हवे होते असे मला कधी कधी वाटते. म्हणजे नाटकाची सुरूवात धरणीकंपाने झालेली असते असे काही दृश्य दिसले असते. त्यांच्या नाटकाला विजय तेंडुलकरांची प्रस्तावना आहे. प्रस्तावनाकार हा पाठीराखा मानायचा असेल तर त्यांच्या




पुढील कृतीची दिशा कोणती याचा अंदाज करता येईल.

सन्मान, बक्षिसे, पदे वगैरे सर्व उपाधी त्यांना यथाकाल मिळत आहेत. तेवढी एकूण नाटके, समीक्षा, संपादने हा सगळा व्यवहार सतत नव्या उमेदीने ते करत आले आहेत. करत राहतीलच. पण त्यांच्या लेखनउर्जेतला बराच भाग पोटापाण्याच्या व्यवसायात जात असला तरी त्यांच्या दिवसाचे तास २४ नसून ४२ असल्याचे दिसते. लेखनासाठी निवांत मिळावा असे त्यांना बहुधा वाटत नसावे. नसावे म्हणण्याचे कारण ते वेगळे आहेत. बाहेरून दहा ते पाच नोकरी करणारा मध्यमवर्गीय, पण आतून 'कबीरा खडा बजार में लिए लुकाठी हाथ। असा दंभावर प्रहार करणारा. पण त्यांचा प्रहार विचारातील दोषावर विसंगतीवर असतो. माणसासाठी ते सदोदित भुकेले आहेत असे जाणवत राहते. त्यांचा गणशोध चालू आहे त्यातून गणगोतही गोळा झाले आहे. पण कुठल्याही सत्कारात ते असूनही नसतात हेही जाणवतेच. चारचौघात वावरणाऱ्या कलावंताचे असेच असते का?

*अग्नीज्वाळे परी तो नग्न आहे केशरी*
*कल्पना होती तशी अन् अजून आहे ती खरी*
*मैफलीला तो नि मी दोघेहि जातो धावुनी*
*ऐकतो मी सूर तो अन् दूरचे घंटाध्वनी*
*जागवीतो तो सभेला मी तरी ना जागतो*
*दूर होतो. सूर त्याला शोधितो धुंडाळतो*
*तो कुणी अपुल्यातला तो घनतमी तेजाळतो*
*दीन मी बांधून डोळे एकटा अन् चालतो.*

या आरती प्रभूच्या कवितेत एकाच देहातील बहिस्थ-अंतस्थ अशा कलाकाराचे चित्र आहे. त्याचे काही साद पडसाद दत्ता भगतांमध्येही एकू येतात, असे म्हटले तर वावगे वाटू नये. आपल्यातला तो तेजाळतो हे

'बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने आपल्या या समाजस्थितीचे भान आम्हाला करून दिले. त्यामुळे त्यांच्या प्रेरणेने निर्माण झालेले साहित्य नकार व विद्रोहाचा स्वर साहित्यात आणते. हा स्वर समंजसपणे ऐकून घेण्याची आणि समजून घेण्याची सोशिकता साने गुरुजींचे साहित्य निर्माण करते. साने गुरुजींच्या नायकांत आढळून येणारी आत्मपीडा आणि आजच्या दलित साहित्याच्या आस्वादातला वरिष्ठ वर्णियांचा डोळसपणा परस्पर संवादी आहेत असे मला वाटते. अस्पृश्यता, जातिभेद, अन्यायपूर्ण रुढी, विषमता ह्या सगळ्यांविषयी योग्य वयात प्रतिकूल असा भावात्मक परिणाम साने गुरुजींच्या वाङ्मयाने साधला, म्हणूनच पुढच्या वयात बोचरा वास्तववादी असा दलित साहित्यात प्रकट झालेला अनुभव मराठी वाचकाला आस्वाद्य वाटू शकला. साने गुरुजींचे मराठी वाङ्मयाच्या अभिरुचीवर हे ऋण आहे, असे मला वाटते'.

**'वाटा पळवाटा' - दत्ता भगत**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने भारवलेल्या तीन पिढ्या माझ्या डोळ्यांसमोर आहेत. ह्या तीन पिढ्यांतील अंतर फार गुंतागुंतीचे आहे. पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील. अशिक्षित. एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी, एवढा बौद्धिक आवाकाही नसणारी पण प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची. दुसरी पिढी सुशिक्षित. थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली. स्वातंत्र्याच्या आगमनामुळे लोकशाही जीवनपद्धतीचे आश्वासन मिळालेली. ह्या पिढीच्या सभोवतीचे वास्तव ध्येयवादी वातावरणाच्या धुक्यामुळे काहीसे उबदार व धूसर झालेले. ह्या पार्श्वभूमीवर आपल्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करणारी. तर तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातली. परिवर्तनाची गती आणि अपेक्षा ह्यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेली. धाडसी पण लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली. ह्या तीन पिढ्यांचे चित्रण करावे हा हेतू मनात बाळगून मी हे नाटक लिहिले'.

'वाटा पळवाटा'

**- दत्ता भगत**

समाधानाचे खरेच पण त्या तेजामागे धग आहे हे तरी कसे नाकारावे?

सामान्य माणसाच्या अंत:करणातील व्यथा-वेदनांची धग त्यांचे अंतर्याम फार तर धगधगत ठेवील. कृतीशील कलावंतासाठी ते उर्जाकेंद्र बनून वेदना कलारूपात परिवर्तित होऊन जनताशीर्षावर ठेवलेल्या तरफेचे कार्य करते आणि जगाला उलथू पाहाते असा विश्वास असणाऱ्या विचारधारेत भगत आहेत. त्यामुळे त्यांचे सुखदु:ख अनीह नाही. ठामपणे ईहवादी आहे. त्यामुळे फुले-आंबेडकर यांच्याप्रमाणेच चार्वाक आणि बुद्ध असणे हेच अटळ आहे. अर्थात हे तत्त्वज्ञान मांडण्याचा त्यांचा मार्ग कलावंताचा असल्यामुळे विचारांना जीवननाट्यातील संघर्षाचे रूप येते. कथा-काव्य-कादंबरीपेक्षाही त्यांच्या मनोभूमीतून नाट्याचा अंकूर उगवण्याचे कारण राजकीय संघर्षातील ललितक्रीडा व्यक्त करण्यासाठी नाटकासारखे दृक्-श्राव्य माध्यम अधिक वास्तव ठरते असे असू शकेल. त्यात लोकसंस्कृतीतील अनेक लोकतत्त्वांचा वापर करून आशय प्रक्षेपित करण्याचे नवे तंत्रही वापरता येते. उगीच नाही विजय तेंडुलकरांनी प्रस्तावना लिहिली.

सबार्टिअन सिद्धांत (Sub-artian theory) या आधुनिकोत्तर विचारधारेचाही त्यांच्या लेखनावर प्रभाव असणे संभवते. अखेर कलावंतांच्या विचारांची किरणशलाका प्रतिभेच्या प्रीझममधून प्रवास करीत असल्याने त्याला एका आणि एकमेव तत्त्वज्ञानाच्या चौकटीत अडकवणे इष्ट नव्हे. त्यांच्या लेखनामागील विचारधारा एकेरी नसून बहुपेडी आहे एवढे सुचविणे हा माझा हेतू आहे. शोधकाला 'जिन ढूँढा तिन पाईयाँ' अशा निर्धाराने गहिरे पाणी आवाहन करीत असले तरी कलावंतापुढे मी किनाऱ्यावर बसलेला एक वीरपुरूष म्हणून कबीराने 'जो बीरा डूबन डरा' अशी माझी जागा आधीच अधोरेखित केलेली आहे.

**– माधव कृष्ण**

# प्रा. दत्ता भगत
## ह्यांचे साहित्य : एक आकलन

मराठी साहित्यविश्वात एक नाटककार आणि समीक्षक म्हणून सुपरिचित अशा प्रा. दत्ता भगत ह्यांच्या लेखनाचा आरंभ एकांकिका लेखनाने झाला आहे. 'आवर्त' (१९७८), 'चक्रव्यूह' (१९८०), 'जहाज फुटलं आहे' (१९८२) या एकांकिका संग्रहांनंतर ते नाट्यलेखनाकडे वळले. १९८५ साली लिहून झालेले त्यांचे पहिले नाटक 'अश्मक' १९९३ साली प्रसिद्ध झाले असले तरी मधल्या काळात 'खेळिया' (१९८६) आणि 'वाटा-पळवाटा' (१९८६) असा त्यांचा लेखनप्रवास चालूच होता. १९९६ साली त्यांचा 'निवडक एकांकिका' हा संग्रह श्री. विजय तेंडुलकर यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध झाला.

आपला वेगळा ठसा दलित रंगभूमीवर उमटविणाऱ्या दत्ता भगत ह्यांच्याबद्दल, डॉ. यशवंत मनोहरांनी "दत्ता भगत हे आंबेडकरी रंगभूमीवरचे एक विशेषनाम आहे." अशा शब्दांत गौरवोद्गार काढले आहेत. तसेच प्रा. गो. पु. देशपांडे ह्यांनी "मराठी रंगभूमी आणि मराठी नाटकाला फार मोठा दिलासा आणि आश्वासन देणारी" या शब्दांत त्यांच्या कामगिरीचे वर्णन केले आहे. वाचनीयता आणि प्रयोगक्षमता या दोन्ही दृष्टींनी रसिकाला अंतर्मुख करणाऱ्या या कलाकृतींना दलितेतर प्रेक्षकांचा मिळणारा प्रचंड-प्रतिसाद विशेष उल्लेखनीय म्हणावा लागेल.




नाट्यलेखनाचा ओनामा करताना थोर विचारवंत-समीक्षक कै. नरहर कुरुंदकर आणि प्रख्यात नाटककार श्री. विजय तेंडुलकर ह्यांच्या विचारधारेचा प्रभाव प्रा. भगत यांच्या मनोभूमिकेवर पडलेला आढळतो. कोणतेही पूर्वग्रह न बाळगता जीवनातले वास्तव समजून घेण्याची गुरुवर्य कै. कुरुंदकरांची संतुलित वृत्ती त्यांच्या या सत्शिष्याच्या लेखनात उतरलेली दिसते. तसेच जीवनातले उद्वेगजनक वास्तव निर्भीडपणे साहित्यातून मांडण्याची श्री. विजय तेंडुलकरांची क्षमता प्रा. भगत ह्यांच्या डोळ्यासमोर आदर्शरूपात असल्यामुळेच बहुधा प्रा. भगत म्हणतात "त्यांचे (तेंडुलकरांचे) आविष्कारतंत्र आणि संवादकौशल्य या दोन्हींचे मला खूप आकर्षण वाटे."

आकलनासाठी उपयुक्त ठरणारा आणखी एक घटक म्हणजे स्वत: लेखकाची मनोगते. ही मनोगते ठाम आणि स्पष्ट भूमिका मांडणारी तसेच प्रांजळ आत्मशोध घेणारी आहेत. 'अश्मक'च्या मनोगतात ते लिहितात, "माझी बांधिलकी माझ्या सभोवतीच्या जीवनाशी आहे. ह्या जीवनाचं आकलन सामर्थ्यासह प्रकट करणं ह्यातच मला रस आहे." ही व्यापक दृष्टी त्यांची जीवननिष्ठा दर्शविते.

मानवी मनाचे सखोल अवगाहन करणे हा प्रा. भगत ह्यांच्या लेखनाचा ध्यास आहे. हेच 'आवर्त'च्या प्रस्तावनेत प्रा. नरहर कुरुंदकर यांनी पुढील शब्दांत सांगितले आहे. ते लिहितात, "ललित वाङ्मयात विचार असतात, विचारांना महत्त्व असते. भूमिका असतात, त्यांनाही महत्त्व असते; तो ललित वाङ्मयाचा केंद्रीय शोधविषय आहे.... प्रा. भगत ह्यांच्या अभ्यासाचा विषय हे मानवी मन आहे. भूमिकांमुळे आकार घेणारे मानवी मन आणि

भूमिकांनाच आपल्या गरजांचा आकार देणारे मानवी मन ह्यांच्या विविध छटा आपण एकत्र पकडू शकतो काय या धडपडीत यशापयश पत्करणाऱ्या या एकांकिका आहेत.'' प्रा. भगत ह्यांच्या समग्र नाट्यकृतींमध्ये हेच एक महत्त्वाचे सूत्र जाणवते. दलित आणि सवर्णांच्या विविध वृत्ती - प्रवृत्तींचा व त्यातील अंतर्गत विसंगतींचा ते समरसून वेध घेतात. जीवनातील द्वंद्वांचे त्यातील सर्व अंत:प्रवाहांसह दर्शन घडविण्याइतकी तटस्थता आणि संयम त्यांच्यामध्ये आहे.

'आवर्त' या संग्रहातील 'एकटी' ही पहिली एकांकिका सुशिक्षित दलित तरुणी पारु हिच्या जीवनसंघर्षाची कहाणी आहे. कुटुंबियांना तिच्या धडपडीचे कौतुक असले तरी तिला व्यक्तिस्वातंत्र्य नाही, हे दाखवण्यास भगत विसरत नाहीत. एका महाराच्या मुलीने मांगाशी विवाहाचे स्वप्न बघावे हे तिच्या मामाला पापकृत्य वाटत असल्यामुळे तिची प्रेमभावना क्षुल्लक वाटते. यातील संघर्षाचा दुसरा बिंदू आर्थिक आहे. मिळणारी स्कॉलरशिप आपल्या कुटुंबाच्या खर्चासाठी उपलब्ध करुन देणे हे शिक्षणापेक्षा महत्त्वाचे ठरावे हे विदारक सत्य तिला उमगलेले आहे. कॉलेजमधील एका सवर्ण मुलाने केलेला विनयभंग ही घटना स्त्रीची विटंबना न वाटता एका विशिष्ट जातीचा अपमान या दृष्टीने चर्चिली जाणे यालाही दु:खाचा एक अंत:स्तर आहे, हे सूचित करण्यासाठी निवेदनावर स्वाक्षरी करण्यास ती नकार देते. शिक्षणाने दलित मनाचे झालेले उन्नयन प्रा. भगत जागोजाग अधोरेखित करतात. हे शिक्षणच त्यांच्या पात्रांना आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करते. त्यांच्या जवळपास सर्व एकांकिकांतून शहरी भागातील बदलत्या दलित वास्तवाची चित्रणे येतात. 'शोध' या एकांकिकेतील प्रा. राजाराम जाधव, 'पराभव' मधील कवी अविनाश वाघमारे, 'चक्रव्यूह' मधील नाटककार जयंत गायकवाड, 'ठिणगी' मधील आनंदा या सर्वांची दु:खं एकच आहेत. पेटून उठावं, हिंस्र आणि क्रूर व्हावं, अशा जातीयतेचे होरपळणारे अनुभव त्यांना आलेले आहेत. 'पराभव' मधील अविनाश एके ठिकाणी म्हणतो, ''सगळे परस्परांच्या इतके जवळ, पण तितकेच दूर. आणि हे सगळं दिसत असताना सारेच बधीर, बथ्थड. संवेदना संपलेल्या प्रेतासारखे!'' ''इथे मुळी माणसं राहातच नाहीत. हजारो वर्ष वयाच्या जातींचे मुखवटे असलेल्या निर्जीव आणि थंड बाहुल्या राहतात इथं'' असाही सर्वांचाच अनुभव आहे. पण या सर्वच दलित व्यक्तींच्या चित्रणात 'सूडाच्या राक्षसाला आवर घालणारं' सुसंस्कृत वर्तन प्रा. भगत दाखवितात. भावनावेग ओसरल्यावर तटस्थपणे स्वत:ला पारखण्याच्या ह्या समंजस वृत्तीमागे व्यापक समाजहिताचा मूलस्रोत आहे. ''माझ्या उगवत्या पिढीला तरी प्रकाशाचा किरण सापडेल'' असं 'शोध' मधील राजाराम शेवटी म्हणतो, त्यातला प्रखर आशावाद हे प्रा. भगतांच्या नाट्यकृतींचे बलस्थान आहे असे वाटते.

'आवर्त', 'जहाज फुटलं आहे', 'रंगला खटला हातोडीचा' व 'आम्ही सगळे' या एकांकिकांचा वेगळा विचार करावा लागतो, कारण या ठिकाणी ते समूहचित्रणाकडे वळलेले दिसतात. नाट्यतंत्राच्या दृष्टीनेही त्यांत वेगळे प्रयोग आहेत. प्रा. भगत हे



मुळात विचारवंत लेखक आहेत. त्यांच्या विचारांची दिशा पुरोगामी समाजपरिवर्तनाच्या प्रेरणेतून निश्चित झालेली आहे. त्यामुळे समाजपरिवर्तनाच्या आड येणाऱ्या मनोवृत्तींचा ते तीव्र उपहास करत एक गंभीर आशय साकार करतात. 'आवर्त' मध्ये समतेचा जयघोष करीत विषमता जतन करणाऱ्या वर्तमानकालीन वारकरी समाजाचा उपहास आहे. त्यासाठी लोकनाट्याचे प्रभावी तंत्र ते वापरतात. 'जहाज फुटलं आहे' मध्ये बेकारीच्या भस्मासुराची व्यापक समस्या संयत स्वरुपात ते उभी करतात आणि या निमित्ताने खोल अंतर्मनात दडून असणाऱ्या, जातीय वैमनस्याचे विदारक चित्रण करतात. 'रंगला खटला हातोडीचा' मध्ये समाजाला पोखरून टाकणाऱ्या भ्रष्टाचाराचे विदारक चित्रण करताना आजच्या भ्रष्ट राजसत्तेचे नागडे दर्शन घडवतात. 'आम्ही सगळे' या एकांकिकेत धार्मिक आणि जातीय विद्वेष निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींचे अत्यंत अस्वस्थ करणारे चित्रण

आले आहे.

'खेळिया' या प्रा. भगतांच्या प्रकाशित झालेल्या पहिल्या नाटकात नारायण या दलित तरुणाची कहाणी आहे. ॲड. भास्कर या सवर्ण वकिलाने नारायणला लहानपणीच नसरतपूरहून शिक्षणासाठी तालुक्याच्या गावी आणले आहे. या विनापत्य दांपत्याला नारायणचा चांगलाच लळा लागला आहे. भास्कर त्याची जाणीवपूर्वक जडणघडण करतो. भास्कर आणि त्याची पत्नी नलू हे नारायणचे श्रद्धास्थान बनले आहेत, त्यांच्यात दृढ भावनिक संबंध निर्माण झाले आहेत. अशा परिस्थितीत नारायणचे आयुष्य भास्करच्या एका निर्णयामुळे ढवळले जाते. आपल्या गावातल्या स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांना शह देण्यासाठी नारायणाचा एक प्यादं म्हणून तो वापर करतो आणि नारायण गावातल्या सवर्ण दलित संघर्षात उतरतो. पुढचे त्याचे आयुष्यच संघर्षमय बनत जाते व शेवटी एका दलिताकडूनच नारायणाचा खून करविला जातो. शोषितच शोषणमुक्तीची चळवळ चिरडून टाकतात! या नाटकाबद्दल डॉ. प्रकाश मेदककर यांचे निरीक्षण फार मौलिक आहे. ते लिहितात, ''अंतिमत: हे नाटक फक्त दलितसवर्ण संघर्षाचा स्तर ओलांडून मानवी प्रेरणा, स्वार्थ इ. मूलभूत गोष्टींना स्पर्श करणारे यशस्वी नाटक ठरले आहे.''

प्रा. भगतांचे 'वाटा-पळवाटा' हे नाटक सर्वात लोकप्रिय ठरले. नुकताच या नाटकाचा Routes and Escape-Routes या नावाने इंग्रजीत अनुवाद झाला असून प्रा. भगतांचे नाव जागतिक स्तरावर पोचले आहे. 'वाटा-पळवाटा' हे नाटक 'दलित चळवळींची उध्वस्त धर्मशाळा' आहे. अशा शब्दांत श्री. विजय तेंडुलकरांनी या नाटकाचा गौरव केला आहे. या नाटकाला एवढी ख्याती मिळाली याचं कारण संहिता व प्रयोगक्षमता या दोन्ही दृष्टींनी हे नाटक अत्यंत प्रभावी व प्रा. भगतांच्या विचारांची झेप दाखविणारे नाटक आहे. डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेल्या तीन पिढ्यांचे चित्रण करणे हे या नाटकाचे मुख्य सूत्र आहे. या तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काका, सतीश आणि अर्जुन या तीन पात्रांच्या संघर्षाचे प्रभावी चित्रण या नाटकात आहे. या शिवाय दासराव नावाचे एक पात्र समाजातील जातीय षड्यंत्रांचे प्रतिनिधित्व करते. प्रा. भगत अत्यंत आस्थेचे या पात्रांच्या दु:खांचे चित्रणे करतात, त्यांची अगतिकताही समजून घेतात. आंबेडकरी चळवळीतील तीन पिढ्यांची ही ओढाताण समर्थपणे उभी करताना आंबेडकरी विचारांचे सम्यक आकलन कोणत्याही पिढीला झालेले नाही, अशी खंत ते त्यातून सूचित करतात. प्रत्येकाला आपली बाजूच बरोबर वाटते. आपल्या त्या वाटा व इतरांच्या त्या पळवाटा, असे वाटते. त्यामुळे चळवळीची होणारी वाताहत प्रा. भगतांना अस्वस्थ करते. व्यक्तिमनाचा व समूहमनाचा वेध घेण्याची मूळ प्रवृत्ती असल्यामुळे प्रा. भगतांच्या नाट्यकृती कालातीत ललितकृती कशा ठरतात, याचे हे नाटक उत्तम उदाहरण आहे. आंबेडकरी चळवळीतील तीन पिढ्यांची ही कहाणी इतर कोणत्याही चळवळीतील तीन पिढ्यांची कहाणी वाटू शकते. या संदर्भात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा. ल. भोळे यांची साक्ष देणे उचित ठरेल. 'वाटा-पळवाटा' या नाटकाचा प्रयोग पाहून ते लिहितात, ''दलित चळवळीतील तीन पिढ्या पात्ररुपाने या नाटकात वावरत असल्या तरी फुले किंवा गांधी यांच्याही चळवळींना नाटकातील पेचप्रसंगातून जावे लागत असल्यामुळे 'वाटा-पळवाटा'ची आवाहनक्षमता फक्त आंबेडकरी चळवळीपुरती मर्यादित म्हणता येणार नाही.'' जातिविरहित जगू पाहणाऱ्या सर्वांचीच व्यथा साकार करणे हा या नाटकाचा मध्यवर्ती मुद्दा असल्याचे डॉ. भोळे नोंदवितात, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

प्रा. भगतांचे तिसरे नाटक 'अश्मक' हे एक लक्षणीय राजकीय रूपक आहे. ''सत्तेचा जबरदस्त मोह आणि मानवी कल्याणासाठी अथक परिश्रम घेणारी करुणामय प्रज्ञा ह्यांतील संघर्ष'' हे नाटकाचे मुख्य सूत्र असल्याचे त्यांनी स्वत:च म्हटले आहे.[९] वर्तमान राजकीय जीवनातील मन विदीर्ण करणारे वास्तव एका काल्पनिक जातककथेच्या परिवेषाचे तंत्र वापरून ते साकार करतात. महाप्रतापी अप्रबुद्ध विचक्षण महाराजांच्या गणराज्यात दरवर्षी एक दानमहोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवात असुर व इतर गणांना एका कुंभाचे दान केले जाते. पण प्रथा अशी की दान देताना त्या कुंभास एका अश्म्याने छेद दिला जातो. साहजिकच कुंभातील दान याचक घरी जाईपर्यंत झिरपत झिरपत संपून गेलेलं असतं. असुरगणांनी हा छेदित कुंभ स्वीकारुन लाचार होऊ नये यासाठी श्रमण मुरारीमल्ल धडपडतो. त्याला प्रज्ञाचक्षू थेरांचे विचार पटलेले आहेत. तो प्रयत्नपूर्वक असुरगणांना परावृत्त करतो. पण दानमहोत्सव जवळ येतो तसे असुरगणांचं चित्त विचलित होते आणि ते या महोत्सवात सहभागी होण्याचे ठरवतात. मुरारीमल्लाने महोत्सवात सहभागी न होण्याचा स्वत:पुरता निर्णय घेतला आहे. पण युवराज्ञी कांचनदेवीवरील प्रेमामुळे त्याच्यासमोर पेच उभा राहतो. अखेर तो उद्योग महामंडळाचं अध्यक्षपद मागायचं ठरवतो. महाराज ही मागणी धुडकावतात, पण असुरगणांच्या जमावातील असंतोष पाहून एक वेगळीच चाल खेळतात. आश्वासन

पत्र खाली जमावात फेकून, जो कोणी हे पत्र वर आणून देईल त्याला उद्योग महामंडळ अध्यक्षपद देण्याचे जाहीर करतात. ते पत्र पकडण्यासाठी असुरगणांत झुंबड उडते, मारामारी होते व त्यातच मुरारीमल्लासह सगळे असुरगण मरतात.

ह्या नाटकातील पात्रे आणि घटना- प्रसंगांची संगती दलितांच्या राजकीय चळवळीची आठवण करून देणारी आहे हे स्पष्टपणे जाणवते. राजकारण हे रथाचे दुसरे चाक मानणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलित नेत्यांमधले सवते सुभे, त्यामुळे दलित जनतेत निर्माण झालेला गोंधळ आणि अखेर या राजकीय चळवळीची शोकांतिका या नाटकातील रूपकातून भेदकपणे उभी राहते, हे खरे आहे. पण एखाद्या वाचकाला या नाटकातून वर्तमानातील अन्य राजकीय चळवळीच्या शोकांतिकेचे चित्र दिसू शकते. किंबहुना वर्तमान भारतीय राजकारणात दबावगट म्हणून वावरणाऱ्या कोणत्याही राजकीय चळवळीची अशी शोकांतिका होणे स्वाभाविक आहे, असे वाटू शकते. अर्थाची अशी अनेक वलये निर्माण करणे हे श्रेष्ठ कलाकृतीचे लक्षणच असते. वैश्विक साहित्याची अशी गुणवैशिष्ट्ये प्रा. भगतांच्या नाट्यकृतींत आहेत, म्हणून त्या मोलाच्या वाटतात. मराठीतील दलित रंगभूमीचा जो सुसूत्र प्रवास चालू आहे, त्यातील प्रगल्भ असा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून प्रा. भगतांचे योगदान ऐतिहासिक महत्त्वाचे आहे.

प्रा. दत्ता भगत ह्यांनी नाटकांबरोबरच मौलिक समीक्षालेखनही केलेले आहे. 'दलित साहित्य: दिशा आणि दिशांतर'(१९९२) व 'निळी वाटचाल'(२००१) ही त्यांची या संदर्भातली लक्षणीय पुस्तके. या व्यतिरिक्त त्यांची संपादित व सहसंपादित अशी ग्रंथसंपदाही बरीच मोठी आहे. मराठीमध्ये दलित साहित्याला पुरेशी प्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतरच्या काळात कठोर आत्मपरीक्षणाची भूमिका घेऊन त्याचे वेगळेपण ते स्पष्ट करतात. दलित साहित्याला समीक्षेची एक शास्त्रशुद्ध चौकट प्राप्त करुन देण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले आहे. दलित साहित्याची पार्श्वभूमी आणि प्रेरणा, दलित साहित्याची व्याख्या, बांधिलकी, मूल्यमापन आणि महत्त्वाच्या दलित साहित्यसमीक्षकांचा परिचय अशा स्वरुपाचे लेख 'दलित साहित्य: दिशा आणि दिशांतर' मध्ये आहेत. या सर्व लेखांतून दलित साहित्याविषयी ठाम आणि परखड भूमिका भगत यांनी मांडली आहे. त्यातील महत्त्वाचा भाग म्हणजे विद्रोह, नकार आणि विज्ञाननिष्ठा या तीन घटकांच्या आधारे दलित साहित्याचे आकलन करणे ते योग्य समजतात. आकलनासाठी वेगळे घटक मानले तरी मूल्यमापनासाठी विश्वसाहित्याचेच निकष असावेत व सध्या रूढ असणाऱ्या जीवनवादी समीक्षेच्या कसोट्या पुरेशा आहेत हे त्यांनी निःसंदिग्धपणे नोंदविले आहे. "त्यांच्या वैचारिक आणि ठाशीव लेखनाने दलित वाङ्मयाच्या समीक्षेला एक नवी दिशा मिळून तिची प्रगल्भतेकडे वाटचाल सुनिश्चित झालेली दिसते." हे या ग्रंथाच्या मलपृष्ठावरील विधान सार्थ वाटते. म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आमूलाग्र परिवर्तनवादी चळवळीचा वारसा मिळालेली त्यांची समीक्षादृष्टी रूढ दलितवाङ्मयसमीक्षेपेक्षा वेगळी असून एकंदर मराठी वाङ्मयसमीक्षेच्या प्रवाहात स्वतंत्र ठरणारी आहे.

'निळी वाटचाल' या ग्रंथात आपल्या समाजाच्या जडणघडणीत ज्या महापुरुषांचा वाटा आहे असे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्याविषयीचे विचार प्रवर्तक लेख आहेत. त्यांच्या विषयीच्या इतर लेखनाची परखड चिकित्साही ते करतात. 'तृतीय रत्न: मराठीतील पहिले आधुनिक नाटक' 'नीच्चौच्च जातिविवाह नाटक' यांसारख्या लेखातून समीक्षेसोबतच वाङ्मयसंशोधनाची त्यांची ऊर्मी प्रकट होते. इतके बहुविध आयाम असलेल्या लेखकाचे सगळे पैलू एका दृष्टिक्षेपात आणणे कठीण आहे. तरी दलित साहित्य, समीक्षा आणि एकूण मराठी साहित्यविश्वाच्या व्यापक संदर्भात प्रा. दत्ता भगत यांचे कार्य मोलाचे ठरलेले आहे, असे निश्चितपणे म्हणता येईल.

**– श्रीनिवास पांडे**

# प्राचीन भारत: समाज आणि संस्कृती

## मधुकर अनंत मेहेंदळे

विद्यावाचस्पती म. अ. मेहेंदळे (यापुढे संक्षेपात 'मअ') यांच्या प्राज्ञपाठशाळा मंडळ (वाई) या संस्थेने प्रकाशित केलेल्या 'प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती' या प्राचीन भारताशी संबद्ध अशा अनेक महत्त्वांच्या विषयांवर, साङ्गोपाङ्ग चर्चा करून, महत्त्वाचे व मोलाचे नवीन विचार सादर करणाऱ्या, भारदस्त (एकूण पृष्ठे ५१६) संशोधनपर ग्रंथास महाराष्ट्र फाउण्डेशनचा मराठी साहित्यविषयक मानाचा पुरस्कार प्राप्त होत




आहे ही अतिशय समाधानाची बाब आहे. कै. विद्यावाचस्पती रा. ना. दांडेकर यांच्या 'वैदिक देवतांचे





| | | |
|---|---|---|
| नाव | : | **मधुकर अनंत मेहेंदळे**<br>प्राच्यविद्येत मौलिक संशोधन करणारे,<br>आंतर्राष्ट्रीय दर्जाचे संशोधक |
| जन्म | : | १४ फेब्रुवारी १९१८ |
| साहित्य | : | **(मराठी)** |
| | : | ऋग्वेद संहिताकार आणि फादर एस्तेलर<br>वैदिक वाङ्मयातील प्रश्नोत्तरे<br>ऋग्वेदसार (आचार्य विनोबा भावे<br>यांनी निवडलेल्या ऋचांचे भाषांतर) |
| | : | प्राचीन भारतीय द्यूत |
| | : | गाथा जरथुस्त्राच्या आणि यस्न हप्तङ्हाइति<br>(समांतर संस्कृत शब्दांसह मराठी भाषांतर) |
| | : | प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती |
| | : | संशोधनपर लेखनास वाहिलेल्या<br>देशी-विदेशी नियतकालिकांतून<br>इंग्रजीमधून विपुल लेखन,<br>इंग्रजीमध्ये सात ग्रंथ प्रकाशित. |

अभिनवदर्शन', 'हिंदुधर्म : इतिहास आणि आशय' अशा प्रकारच्या व कै. विद्या. दा. ध. कोसंबी यांच्या 'पुराणकथा आणि वास्तवता' यासारख्या कसदार, मूलगामी, नवीन विचार मांडून, विचारांची दिशा दाखवणाऱ्या सकस संशोधनपर ग्रंथांच्या परंपरेत शोभून दिसेल असा हा ग्रंथ आहे. ''संशोधन फेसदार नाही; कसदार हवे.'' या दिवंगत गं. बा. सरदारांच्या निकषावर उतरणारा हा ग्रंथ!

पर्याप्त संशोधन-वेतन देऊन साठ वर्षांच्या अवधीत प्राचीन भारतातील समाज व संस्कृती या विषयावर मौलिक संशोधन सिद्ध करा असे कोणी मअंना म्हटले असते तरी त्या स्वतंत्र ग्रंथाचे स्वरूप या लेखसंग्रहरूप ग्रंथाहून 'आशयदृष्ट्या' तरी फारसे वेगळे झाले नसते. एका व्यापक विषयावरील समग्र लेखन कालक्रमानुसार व विषयवार प्रकरणांच्या बंधात सादर झाले असते व निरनिराळ्या लेखात ते स्वतंत्र घटक असल्याने आवश्यक ठरलेली पुनरुक्ती (लेखदृष्ट्या नव्हेच पण लेखसंग्रहरूप-ग्रंथदृष्ट्या म्हणा!) टळली असती एवढेच! सूज्ञ वाचक तर हे समजून घेतीलच पण रन्ध्रान्वेषी समीक्षकही अशा बाबींचा उच्चार करणार नाहीत असा विश्वास वाटतो.

प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीला आपल्या समाजाचा व संस्कृतीचा नेमका इतिहास जाणून घ्यायची इच्छा असते. प्रत्यक्षात मूळ ग्रंथांचे वाचन करण्याची त्याची भाषिक-क्षमता नसते व त्याला वेळही नसतो. अशावेळी आपले वैदिक साहित्य, रामायण व महाभारतासारखी सांस्कृतिक आदर्श रुजवणारी राष्ट्रीय महाकाव्ये, उपनिषदे व गीता (हेही तसे एक उपनिषदच!) यातील शिकवण, वैदिक ब्राह्मणी धर्मांइतकेच भारतीय वैचारिक जीवन समृद्ध करणाऱ्या बौद्ध व जैन परंपरा, संस्कृताबरोबरच पाली व प्राकृत (अगदी शिलालेखातील प्राकृताचे स्वरूप), वेदांइतकेच पारसीकांच्या अवेस्त्यात असणाऱ्या व साम्य-वैषम्याच्या बाबतीत तुलनीय ठरणाऱ्या बाबी, आपली दैवते, याविषयी अभ्यासू-अधिकारी व्यक्तीकडून जाणून घ्यायची सामान्य सुशिक्षिताची जी इच्छा असते ती मअंच्या अशा प्रकारच्या ग्रंथांतून निश्चितच समाधानकारक रीतीने पूर्ण होते. ग्रंथाच्या वाचनाने कितीतरी गोष्टींचा उलगडा झाला, अपसमज दूर झाले, वैचारिक संपन्नता अनुभवाला आली असे त्याला वाटते. 'सत्यमेव जयते' हे भारतीय ब्रीद-वाक्य मुळात कोणत्या अर्थाचे होते व सत्यनिष्ठा या आदर्शाचा आविष्कार करण्यासाठी ते कसे खुबीदार रीतीने नीतिपर अर्थाने प्रयुक्त केले गेले; शरपंजरी भीष्म म्हणजे शर नामक गवताच्या आस्तरणावर पडलेले भीष्म असा बुद्धीला पटावा असा अर्थ दुर्दैवाने ग्रंथाशी प्रामाणिक राहून करता येणार नाही; जमिनीवर विखुरलेल्या बाणांच्या शय्येवर पडलेले भीष्म असाच करावा लागेल. अंगातून आर-पार गेलेल्या बाणांवर पहुडलेले भीष्म दाखवणारी चित्रे ही गैरसमजुतीवर आधारित आहेत असेच म्हणावयास हवे.

कौरव व पाण्डव हा भेद परस्परव्यावर्तक नाही. पाण्डूची मुले म्हणजे पाण्डव पण तेही कुरुकुळातीलच असल्याने कौरवही होते. गीतेत अर्जुनाचा उल्लेख 'कुरुनन्दन' असा झालाच आहे. कौरव सर्वतोपरी दुष्ट व पाण्डव निखालस सुष्ट असे महाभारतातील चित्रण नाही. कौरवांनी राजसभेत रजस्वला द्रौपदीला पूर्णत: विवस्त्र केले असते तर ते कृत्य केवळ कौरवांनाच नव्हे तर एकूण 'भारतीय संस्कृतीलाच दूषणास्पद ठरले असते. प्रा. विंटरनिटझ्, गो. के. भट, घुर्ये, हिल्टेबाइटल (दुर्गा भागवत आदी आठ-दहा अभ्यासकांच्या निर्देशासाठी पृ. ८८ पहावे.) या सर्वांच्या मतांचा विवेचक परामर्श घेऊन द्रौपदीचे कटिवस्त्र नव्हे तर केवळ उत्तरीयच सभेत ओढले गेले हे मअंनी सप्रमाण दाखवून दिले आहे. अशाप्रकारचे लेखन करतांना भारतीय संस्कृतीची जपणूक करणे अशा स्वरुपाचा कोणताही पूर्व-नियोजित हेतू लेखकाच्या मनात नसणार. मी मअंचे जवळजवळ सर्व लेखन वाचले आहे, त्यांच्याशी अनेकवार चर्चा केल्या आहेत. कै. मे. पुं. रेगे म्हणतात त्याप्रमाणे गांधी-विनोबांच्या विचाराकडे ते आकृष्ट झाले असले तर ते ही 'विचारपूर्वक' व 'विवेक' राखूनच. अभ्यास करतांना हे गृहस्थ खुद्द 'म.अ.मेहेंदळे' ही नसतात; केवळ निखळ अभ्यासक असतात. संस्कृत, पालिप्राकृत यांवर प्रभुत्व, शिलालेखीय प्राकृतावर विशेष प्रभुत्व, अवेस्ता व पहलवी यांचे त्या त्या लिप्यांसह उत्तम ज्ञान, ऐतिहासिक भाषा-शास्त्राची भक्कम बैठक, ऐतिहासिक-संस्कृत-शब्दकोशाचे अनेक दशके काम (सहसम्पादक म्हणूनही) केले असल्याने शब्दार्थ-निर्णय करतांना व्याकरण, निर्वचन शास्त्र, संदर्भ व प्रत्यक्ष वापर (attestation) या निकषांचा आग्रह, मराठीखेरीज भारतीय भाषांतील गुजराथी-हिंदीचे आकलन, हवा तेथे द्राविड-भाषांचा प्रामाणिक निर्वचन कोश पाहण्याची वृत्ती आणि पूर्वग्रहरहित, शास्त्रीय दृष्टिकोण यामुळे मअंचे लेखन विशुध्द, निरामय राहिले आहे. अतिरिक्त भारतीय निष्ठा, मूलतत्त्ववादाचा आग्रह, अशुद्ध-अप्रामाणिक पाठांतरांचे आधार हे संशोधनातील 'आमय'च म्हणायला हवेत. मला या ठिकाणी काहीसे थांबून असे सांगावसे वाटेल की या ग्रंथात व ग्रंथाच्या

मलपृष्ठावर अशी मअंची दोन रंगीत छायचित्रे आहेत. त्यामधून निर्मळ चष्म्यातून पाहणारे एक प्रसन्न, साधे पण देखणे व्यक्तिमत्त्व आपल्या प्रत्ययाला येते. छायाचित्रे फक्त चेहेऱ्याची आहेत. एकेकाळी खेळाडू असणाऱ्या मअंची अंगयष्टी जोमदार व मजबूत आहे. फुलशर्टच्या बाह्या ते घडी घालून वर करु लागले की अंगयष्टीचा पिळदारपणा जाणवतो. 'प्रसन्न' व 'साधे' हे दोन शब्द वगळता 'सडसडीत, पीळदार व जोमदार' ही विशेषणे 'लेखन' या (अभि)'व्यक्तीच्या' नशिबी फारशी येत नाहीत. पण मअंचे लेखन खरोखरीच त्यांच्या



व्यक्तिमत्त्वासारखे पंचगुणविशिष्ट आहे. त्यातही 'सडसडीत' व 'जोमदार' ही विशेषणे लक्षणीय आहेत. मअंच्या देहावर कधी मेद चढला नाही आणि त्यांचे लेखनही शब्दमेदाने कधी फोपसे ठरले नाही. या सत्याच्या प्रचीतीसाठी निबंध क्र. २ (श्रद्धा), ४ (असित...) आणि ५ (प्राप्य वरानू...) येवढे पाहिले तरी पुरेसे आहे. दोन, तीन व चार पानांचेही लेख कसदार असतात हे त्यावरून पटण्यासारखे आहे.

अनेक विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना यास्काचार्यांचे निरुक्त साक्षेपी रीतीने शिकवल्यामुळे मअंना निरुक्त टिपणांवर दोन पुस्तिका काढाव्या लागल्या. या ग्रंथात केवळ पहिला लेख यास्काने उपस्थित केलेल्या 'तत्को वृत्र:?' या विषयीचा आहे. 'ऐतिहासिक' (म्ह.इतिहासकार) म्हणतात वृत्र हा एक 'असुर' (असीरियन?) होता. त्याच्या पित्याचे नाव त्वष्टा. नैरुक्तांनी वैदिक देवता म्हणजे निसर्गशक्ती या आपल्या धारणेतून 'वृत्र' म्हणजे पाण्याचा अवरोध करणारा 'मेघ' असा अर्थ दिला आहे. यानंतर याविषयी टिळकांचे मत अनेकांच्या वाचनात येत नाही म्हणून, व हेनरिश ल्यूडर्स यांचे लेखन शार्मण्य भाषेत असल्याने अनेकांना मुळातून वाचता येत नाही म्हणून, त्या दोघांच्या मतांचा व्यवस्थित, परामर्श मअ घेतात. लोकमान्यांच्या धारणेनुसार वृत्र व इन्द्र यांच्यातील संघर्ष हा अंधार व प्रकाश यांच्यातील संघर्ष आहे. वृत्रवधाची कथा म्हणजे आर्यांचे (टिळकांच्या मते) मूलस्थान असलेल्या उत्तरध्रुवावर वर्षातून एकदा अंधारावर मात करून सूर्याने क्षितिजावर येणे याविषयीची रुपक कथा आहे तर, पाण्याबरोबरच वृत्रवधामुळे सूर्याचा मार्गही मोकळा होतो म्हणून एकूणच आप्, तेजस ह्यासारख्या सृष्टीच्या (निर्मितीच्या) म्हणजे सृष्टीच्या आरंभाची कथा म्हणजे वृत्रवधकथा असे ल्यूडर्स मानतात, ओल्डेनबर्ग व हिलेब्रांट यांच्या मतांचाही आटोपशीर परामर्श येथे घेण्यात आला आहे. मअंनी स्वत:चे वेगळे असे मत दिलेले नाही. लेख मुख्यत्वे माहिती करुन देणारा पण एकूण ल्यूडर्स यांचे मत स्वीकारण्याकडे झुकणारा आहे. आमचे डॉ. घाटगे म्हणतात, "मअंचे दोन गुरू (teachers) आहेत; प्रा. थीम व प्रा. ल्यूडर्स." आलंकारिक अर्थाने मला हे पटते. 'गुरू' यापेक्षा 'आदर्श' हा शब्द मी अधिक पसंत करीन. या दोन जर्मन अभ्यासकांचे संशोधन खरोखरीच यच्चयावत् संबंधित संदर्भांचा विवेचक परामर्श घेऊन केलेले, नि:पक्षपाती, ऐतिहासिक स्वरुपाचे, शास्त्रीय विवेचन असते. प्रा. ल्यूडर्स यांच्या संशोधनपद्धतीवर ज्ञानप्रबोधिनीत एक कालिक व्याख्यानमालाच मअंनी आम्हाला दिली. आदर्शांच्या (ideals) आदर्श पद्धतीचा स्वीकार करणे म्हणजे त्यांच्या सर्वच निष्कर्षांचा स्वीकार करणे नाही. मअंच्या बाबतीत हीच वस्तुस्थिती आहे. मराठी व इंग्रजी वाचकांना त्यांनी ल्यूडर्स यांच्या डॉयिशमधील प्रभूत लेखनाची माहिती करुन दिली. थीमंच्याही अनेकविध उपपत्तींची ओळख करुन दिली. पण या 'द्वयी' चे 'दास' होऊन श्रद्धेने व भक्तीने त्यांची मते मअंनी स्वीकारली नाहीत. 'वाचावे जनांचे परी लिहावे मनाचे' हीच वृत्ती मला मअंच्यात आढळते. फादर एस्टेलर मअंचे एकेकाळचे प्राध्यापक! ऋग्वेदातील पालिमसेटविषयीचे त्यांचे लेखन मअंनी समजून घेतले. पण गुरुजी 'अपभाषिते' करु लागल्यावर मात्र त्या लेखनाचा (लेखकाचा नव्हे) त्यांनी 'कठोर' संशोधनाने समाचार घेतला. मृच्छकटिकातील वीरकाच्या पद्याचे (मृच्छ. ६.१५) अंशत: अनुकरण करून मअंच्या भूमिकेविषयी सांगता येईल.

*"जानामि लोकमान्यं, पितरं (फादरं) एस्टेलरं च जानामि।
प्राप्ते लेखनकार्ये, गुरुमप्यहं न जानामि " ॥*

*"मी लोकमान्यांना जाणतो, एस्टेलर यांना मानतो पण लेखन करतांना बृहस्पतीलाही ओळखत नाही".*

जर्मन भाषेच्या ज्ञानामुळे डॉ. दांडेकर, डॉ. घाटगे, डॉ. पळसुले यांच्याप्रमाणेच डॉ. मेहेंदळे यांनाही पुष्कळच लाभ झाला.

प्रा. गेर्शेविच यांसारख्या अवेस्तातील अधिकारी विद्वानांच्या बरोबर अवेस्ताचे वाचन करण्याचाही मअंना चांगला लाभ झाला. 'झरतुष्ट्राच्या गाथा' इत्यादी त्यांच्या लेखनाचे वाचन जरूर करावे. प्रस्तुत संग्रहात लेख ६ व ७ यांमध्येच त्यांचे अवेस्ताविषयक संशोधन दिसून येते. गीतेतील 'मित्रद्रोहे च पातकम्'(१.३८ङ) या वचनाचा अर्थ 'मित्रद्रोह' असा केला तर कौरव नेमके कोणत्या अर्थाने 'मित्रद्रोह' करीत होते हे कळत नाही. अवेस्तातील मिथ्र म्हणजे 'समय,करार' व 'द्रुज्' म्हणजे 'फसवणे, खोटे करणे' याच्याशी या वचनाचा मेळ घालून अनेक संदर्भाचे दाखले मअंनी सादर केले आहेत. 'करारभंगाचे पाप' हा अर्थ गीतेतील एका दुरूह वचनावर स्वच्छ प्रकाश पाडतो. भारतीय वैदिक 'मित्र' व इराणी अवेस्तामधील 'मिथ्र' ही मुळात कराराची अधिष्ठात्री देवता, 'संधिदेवता' होती. पुढे या अमूर्त कल्पनेला सृष्टीतील 'सूर्य' या मूर्तरूपात पाहिले गेले या मेय्ये यांच्या मताला प्रा. ल्यूडर्स व प्रा. थीम यांचे प्रमाणेच मअंनीही पाठिंबा व्यक्त केला आहे.

केवळ मअच नव्हे तर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. कुसुमताई यांचाही गांधी-विनोबाजींच्याकडे कल आहे, आंग्लवैद्य असणाऱ्या सुपुत्राकडे पवनार वर्धा येथे या उभयतांचे बऱ्याच वेळा वास्तव्यही असते. मअंच्या लेखनात फारशी न आढळणारी भाविक व भावुक वृत्ती त्यांच्या विनोबांच्या 'गीताई' वरील लेखात आढळते. "गीतेचा समवृत्त सुबोध अनुवाद मराठीत करणे सोपे नाही. परंतु विनोबांना ते सहज जमले आहे. त्याचे कारण, त्यांचे जीवन एकपरी गीतामय झालेले आहे." (पृ. ३१९) या वाक्यानंतर विनोबांची गीतेविषयीची श्रद्धा व्यक्त करणारे गीताप्रवचनातील (पृ.१) वाक्यही मअ आवर्जून उद्‌धृत करतात. मराठी अनुवादात अक्षरसंख्या संभाळण्याचे कठीण कार्य विनोबांनी करुन दाखविले हे व असे बरेच काही स्तुत्य गुणांचे निरूपण करून पुनश्च आपल्या विषयाशी प्रामाणिक राहणाऱ्या स्वाभाविक साक्षेपी सावधानतेनुसार 'अयोग्य अनुवाद', 'संदिग्ध

'मेहेंदळ्यांनी ह्यांतील बहुतेक लेख सामान्य, सुशिक्षित वाचक डोळ्यांपुढे ठेवून, त्यांना उद्देशून लिहिले आहेत. अशा वाचकांच्या मनांत ह्या ग्रंथांविषयी आदर, पूज्यभाव कुठेतरी रेंगाळत असतो. (माझ्या मनात हा पूज्यभाव काहीसा दाट आहे.) पण त्यांच्या आशयाविषयी फारतर जुजबी माहिती त्यांना असते. बरेच कुतूहलही असते. कित्येक प्रश्न त्यांना अधूनमधून त्रस्तही करीत असतात. उदा. 'गीतेची खरी शिकवण काय आहे?' 'इतक्या श्रेष्ठ, विचारी व्यक्ती उपस्थित असताना कौरवांच्या राज्यसभेत द्रौपदीवर अन्याय कसा होऊ शकतो?' इ. मेहेंदळ्यांचे वैशिष्ट्य असे की ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे, प्राच्यविद्येत मौलिक संशोधन करणारे पंडित असले तरी ह्या विषयांतील जटिल प्रश्नांवर मराठीतून लिखाण करतात. त्यांची उत्तरे शोधण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती वाचकांना चोखपणे सादर करतात. अगोदरच्या संशोधकांनी काढलेले निष्कर्ष त्यांच्या आधारांसह नमूद करतात. त्यांचे नि:पक्षपातीपणे मूल्यमापन करतात, आणि अखेरीस आपला निर्णय देतात. ह्या साऱ्या समालोचनात कुठेही, यत्किंचितही अभिनिवेश नसतो. उदा. कौरवांचा राग नाही, पांडवांवर लोभ नाही, श्रीकृष्णावर आंधळी भक्ती नाही, त्याच्या हातून अनुचित कर्म होणारच नाही असा अगोदरच निर्वाळा दिलेला नाही. मेहेंदळ्यांचा समतोलपणा असाधारण आहे. त्यांची भेदक मर्मदृष्टीही तितकीच असाधारण आहे. त्यांच्या सोबत ग्रंथवचनांचा मागोवा घेत, त्यांनी मांडलेल्या युक्तिवादांना अनुसरून वाचक जातो तेव्हा ज्या प्रश्नाची चर्चा होत असते त्याच्या गाभ्याला आपण भिडलो आहोत, प्रश्नाची उकल करण्याची किल्ली हातात आली आहे असा प्रत्यय त्याला येतो. हे सर्व विवेचन सहज, सरळ, चोख, प्रसन्न मराठीतून होत असते. मेहेंदळ्यांनी वेळोवेळी लिहिलेले हे लेख ग्रंथरूपाने संग्रहीत व्हावे अशी त्यांच्या सर्व वाचकांची इच्छा असणार. ती आज फलद्रूप होत आहे ह्याचा मोठा आनंद वाटतो.'

- मे. पुं. रेगे

अनुवाद' यांची यथावत् चर्चा करून कित्येक अधिक दुरुस्त व समर्पक पाठान्तरेही मअ सुचवतात. 'गिरामस्म्येकमक्षरम्' (गीता १०.२५) याचा मेळ 'अक्षराणामकारोऽस्मि' (गीता १०.३३अ) याच्याशी सुसंगत ठेवून मराठी वाचकाला 'मी एकाक्षर वाणीत' यावरुन ॐकाराचा नेमका बोध होणार नाही म्हणून ''ओंकार मी हि वाणीत'' (पृ. ४१४.) अशी पाठसुधारणा व अशाच अनेक सुयोग्य पाठसुधारणा सुचवून आपला विनोबांविषयीचा 'अवेच्चप्पसाद' (पालीत 'अवेत्य प्रसाद' म्हणजे 'डोळस श्रद्धा' enlightened belief) मअ व्यक्त करतात. 'गीताप्रवचनां' ची समीक्षा करताना याच वृत्तीचा प्रत्यय मअ आपल्याला आणून देतात.>'' विनोबांच्या मते 'गीतेचा जन्म स्वधर्माच्या आड येणारा जो मोह, त्याच्या निवारणार्थ आहे.' (पृ. ८ गीताप्रवचने) तो मोह दूर करून गीतेने अर्जुनाला स्वधर्मप्रवृत्त केले हे गीतेचे फलित आहे.' < कै. दे. द. वाडेकर अनेकदा गंमतीने यावर 'जांभेकरी' करु का? असे म्हणायचे. त्याच धर्तीवर विनोबाजींच्या भूमिकेवरील 'माधुकरी-वृत्ती' (वार्तिक) पाहावे. ''विनोबांच्या ह्या म्हणण्याला मान्यता द्यायला हरकत नाही; पण लगेचच सांगायला हवे, की ही मान्यता मर्यादित स्वरूपाची असू शकेल. गीतेचा मुख्य संदर्भ युध्दाचा आहे, आणि त्या संदर्भापुरते विनोबांचे म्हणणे पटण्याजोगे आहे. पण गीता वाचताना असे वाटते, की साऱ्या गीतेला युद्धाचा तेवढा एकच संदर्भ नाही आणि म्हणून समग्र गीतेचे एकच-एक फलित असू शकत नाही.'' उत्तम समीक्षक 'मर्यादावचनोत्तम' अशा विन्टरनिट्झ सारखा असावा लागतो. वाक्यरचना इकडून-तिकडून ठाक-ठीक करुन घ्यायची असते. तरुण संशोधकांना हा आदर्श वस्तुपाठच आहे.

कै. भाऊ धर्माधिकारी यांच्या 'गीताचिकित्से' ची चिकित्साही मअंनी समतोलपणे केली आहे. भाऊंच्या लेखनातील 'शब्दालंकार' आणि क्वचित येणारी 'अतिशयोक्ती' मअंनी नेमकी टिपली आहे.(पृ. ४६०) भाऊंच्या मते ''अंती जीवनाचे सार्थक 'समाधीस्थितीत आहे.'' (प्रस्तुतग्रंथ पृ. ४७६) समाधी या शब्दाचा अर्थ 'धी' म्हणजे बुध्दी-बोधनशक्ती - जाणिवकळा''. ती काटेतोल रहायला हवी. हा अर्थ अभिप्रेत असता तर गीतेने 'समधी' असा शब्द वापरायला हवा होता. 'समाधी' असा नव्हे हे मअंचे मत कोणासही मान्य व्हावे असे आहे.

या ग्रंथातील दोन लेख क्र. २६ व २८ (पृ. बारा वरील क्रमांनुसार मात्र क्र. २६ व २१(?) हे अनुक्रमे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व भारताचार्य चिं. वि. वैद्य यांच्या जाडजूड ग्रंथांचा आढावा व परीक्षण करणारे आहेत. मोठ्या ग्रंथांमधील प्रतिपादनाचा किती काळजीपूर्वक आढावा घ्यावा लागतो हे या लेखांवरुन कळते.

एकूणच 'प्राचीन भारत:समाज आणि संस्कृती' हा मअंचा विस्तृत, विचारसम्पन्न ग्रंथ याविषयाच्या अभ्यासकांना सुयोग्य दिग्दर्शन करणारा आहे.

ग्रंथाची पुढची आवृत्ती निश्चितच निघेल. त्यावेळी पृ.क्र.बारा वरील अनुक्रमणिका नक्कीच दुरुस्त केली जाईल. काही लहानसहान मुद्यांची भर घालता आली तर बरे होईल असे माझ्या शिक्षकी-वृत्तीला वाटते. विद्यार्थांना काही थोड्याफार 'विषयान्तरा'नेही माहिती मिळते. 'असि' व 'असित' याची चर्चा करताना 'असुर' हा मूळ शब्द आहे. त्यात अभावार्थक 'अ' नाही. पण तसा अभावार्थी अ समजून पुढे सुर हा ghostword निपजला आहे. तसेच असित हा मूळ शब्द व त्यापासून अशाच प्रक्रियेने 'सित' (श्वेत, धवळ, पांढरा) असा शब्द कृत्रिमपणे व सदोषपणे निर्माण झाला आहे हे मला सांगितल्या खेरीज राहवले नसते; मअंनी संयम पाळला आहे. 'श्रत् +√धा' यामधील 'श्रत्' हा संस्कृतातील 'अनु, परि, वि, आ, प्रति, सम्' यासारखा उपसर्ग नाही तर 'हृत-श्रत्' cardiac heart असा शब्द आहे व त्यामुळे to put your heart into म्हणजे श्रद्धा. माढव्याच्या वाक्यातील चिंचेवर 'मन जाणे, जडणे' हे असेच आहे हे मला सांगावसे वाटले असते. 'तत्को वृत्र: ?' या पहिल्या लेखात निघण्टूंत उपमानवाचक शब्द व्यापकरीतीने समानार्थी मानल्याने 'पर्वत' या शब्दाचा 'मेघनामानि' मध्ये समावेश झाला आहे. 'य इङ्खयन्ति पर्वतान्.... (१.१९.७) या ऋचेत 'मेघ' हा अर्थ संभवतो हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने माहितीचे ठरले असते. पर्वतासारखाच 'वल्मीक' (वारूळ) हा शब्दही संस्कृतात (वल्मीकाग्रात्प्रभवति धनु:खण्डमाखण्डलस्य मेघ. १५ व.) विशिष्ट मेघांसाठी वापरतात. (वल्मीक :सातपो मेघ:।) वृत्र-पर्वत-दगडांच्या पेट्या या संदर्भात कै. दा. ध. कोसंबी यांनी वृत्रवध म्हणजे उत्तरभारतातील 'सैलाब' (शैल-आप:) पद्धती असे सुचवले आहे. पर्वतावरील पाणी दगडांनी अडवून मग दगड काढून पाणी शेतीसाठी मोकळे करणे. (वृत्रस्य निण्यं विचरत्याप: ऋ १.३२.१०) नंतरकालीन रामरावण युद्धावर इन्द्र-वृत्र संघर्षाची काहीशी छाया आहे. रावणाच्या मुलाचे इन्द्रजित असे नाव आहे 'प्राप्य वरान् निबोधत' या कठवचनात मला अजूनही शंकर व रंगरामानुज यांच्याप्रमाणे 'वरान् आचार्यान्' हाच अर्थ करावासा

'डॉ. मधुकर अनंत मेहेंदळे पुणे येथील सुविख्यात डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्थेत पंचवीसहून अधिक वर्षे संस्कृतचे प्राध्यापक होते. १९८३ पासून भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे, यांच्या वतीने प्रसिद्ध होत असलेल्या महाभारत-उपसंहार या ग्रंथाचे डॉ. मेहेंदळे संपादन करीत आहेत.

''मेहेंदळ्यांचे वैशिष्ट्य असे की, ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे, प्राच्यविद्येत मौलिक संशोधन करणारे पंडित असले तरी, ह्या विषयांतील जटिल प्रश्नांवर मराठीतून लिखाण करतात... मेहेंदळे संहिता (text)... सूक्ष्म आणि भेदक दृष्टीने वाचतात... आणि सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरलेल्या प्रश्नांवर नवीन प्रकाश पाडतात... मेहेंदळ्यांचा समतोलपणा असाधारण आहे... सर्व विवेचन सहज, सरळ, चोख, प्रसन्न मराठीतून होत असते... मेहेंदळ्यांच्या ह्या सर्वच पांडित्यपूर्ण लेखांना हा समकालीन संदर्भ, प्रकटपणे वा सूक्ष्मपणे, आहे आणि म्हणून वाचकांना महत्त्वाची नवीन माहिती देत असताना त्यांना ते अंतर्मुखही बनवितात.'

**- मे. पुं. रेग**

वाटतो. निबोधासाठी ज्ञानासाठी 'गुरु' आवश्यक ठरतो. 'आचार्यवान् पुरुषो वेद' या उपनिषद्वचनात (छां. ६.१४) हेच सांगितले आहे. नचिकेत्यासारखे सर्वांनाच 'वर' मिळतात असे नाही. शकार घमेंडीने स्वत:ला 'वरपुरुषमनुष्य:' म्हणवून घेतो हे अलाहिदा. चौथ्या लेखातील (अनुपलब्ध) संस्कृत साहित्याचा निर्देश मला आश्वासक वाटला,, सुखवून गेला. 'ऋति' असे व्याकरणदृष्ट्या निर्दोष नाम attest होत नसले तरी हरकत नाही असा विश्वास वाटला. मअंनी असेच 'पुरस्करणीय' संशोधनाचे आदर्श आमचेसमोर ठेवांवेत.

**— मो. गो. धडफळे**

# वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट

## जया दडकर

श्री. जया दडकरांनी खांडेकरांसंबंधी केलेले हे तिसरे वैशिष्ट्यपूर्ण तितकेच महत्वाचे असे काम. 'एक लेखक एक खेडे' (१९७३) हे पहिले, 'वि. स. खांडेकर वाङ्मयसूची' (१९८४) हे दुसरे आणि 'सचित्र चरित्रपट' (२००१) हे तिसरे. खांडेकरांसंबंधी दडकरांना असलेल्या आंतरिक जिव्हाळ्यापोटी आणि अनाम अशा हृद्य नात्यापोटी ही जिकिरीची आणि अपार कष्टांची मागणी करणारी कामे दडकरांनी केली यात संशय नाही.




साहित्यिकांच्या छायाचित्रांचा संग्रह करण्याच्या छंदातून दडकरांचा १९६८ साली खांडेकरांशी प्रत्यक्ष संबंध





| | | |
|---|---|---|
| नाव | : | **जयवंत केशव दडकर** |
| जन्म | : | ३१ मे १९३५ |
| साहित्य | : | एक लेखक आणि खेडे |
| | : | चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात |
| | : | वि. स. खांडेकर वाङ्मयसूची |
| | : | काय वाटेल ते / कीचकवधाचा तमाशा |
| | : | वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट |
| संपादने | : | श्री. दा. पानवलकर (सहकार्याने संपादित) |
| | : | संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश खंड पहिला (सहकार्याने संपादित) |
| | : | वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश (सहकार्याने संपादित) |

आला. पण खांडेकर त्यांच्या ओळखीचे होते ते बालपणापासूनच. शिरोड्याच्या ज्या 'ट्यूटोरिअल इंग्लिश स्कूल'मध्ये १९२० पासून १९३८ पर्यंत खांडेकर शिक्षक आणि हेडमास्तर होते, त्याच शाळेत, खांडेकरांनी ती सोडल्यानंतर दडकर शिकले. तेथेच खांडेकरांचे वाङ्मय त्यांनी प्रथम वाचले तेव्हा हे आंतरिक नाते निर्माण झाले असणार. पण दडकरांचे वैशिष्ट्य हे की, या जिव्हाळ्याचा, आंतरिक नात्याचा अडथळा त्यांनी आपल्या कामात येऊ दिलेला नाही. काम करण्यामागे उत्कट, दृढ जिव्हाळा असावा आणि तरीही प्रत्यक्ष कामात वाङ्मयाभ्यासकाची, चरित्रलेखकाची तटस्थ, वस्तुनिष्ठ दृष्टी असावी ही कठीण गोष्ट दडकरच निभावू जाणोत. त्यामुळे हा 'सचित्र चरित्रपट' एखाद्या चांगल्या, संवेदनक्षम दिग्दर्शकाने एखाद्या कलावंतावर चरित्रपट करावा तसा वाटतो. तेथे खांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अकारण उन्नयन नाही, खांडेकरांच्या लेखनाचे मूल्यमापनही नाही आणि तरीही १९२३ ते १९७६ या काळातला 'सर्वात लोकप्रिय लेखक' हे खांडेकरांचे नेमके मोठेपण त्यानी क्षणभरही दृष्टीआड होऊ दिलेले नाही. दडकरांनी तयार केलेली 'खांडेकर वाङ्मयसूची' चाळली तर खांडेकरांनी या ५० वर्षांत कथा, कादंबरी, ललितलेख, स्फुट लेख, समीक्षात्मक लेख, परीक्षणे, चरित्रे, चरित्रात्मक संकीर्ण लेख, नाटक, नाट्यछटा, इतरांच्या पुस्तकांना प्रस्तावना, वृत्तपत्रीय लेखन, चित्रपटांच्या कथा, संवाद, गीते असे विविध प्रकारचे, किती प्रचंड लेखन केले होते हे लक्षात येईल. या व्यतिरिक्त भाषणे-व्याख्याने, अध्यक्षीय भाषणे, मुलाखती, परिसंवादातील सहभाग हे इतर वाङ्मयीन व्यवहारही ते करीत होतेच. शिवाय, अनेक कृतींचे संकल्प त्यांच्या मनात घोळत होते. इतरांना त्यासंबंधी शब्दही देत होते. खांडेकरांचे हे सर्व लेखन प्रकाशित तर होत होतेच, पण प्रकाशकांकडून त्यांना मागणी होती, त्यांच्या आर्थिक व्यवहाराबाबतीतल्या अटी मान्य करून प्रकाशक खांडेकरांचे लेखन मागत होते. खांडेकरांच्या कादंबऱ्यांचे आणि कथांचे १९३८ पासूनच, कन्नड, गुजराथी, तमिळ, बंगाली, मल्याळी, हिंदी अशा इतर भाषांत अनुवाद होऊ लागले होते. याचा अर्थ या भाषांतील वाचकही त्यांच्या लेखनाचे चाहते होते. त्यांच्या लेखनावर समीक्षा लिहिली जात होती. त्यांच्या लेखनाची चर्चा झाल्याशिवाय वाङ्मयेतिहास पूर्ण होत नव्हते. महाराष्ट्राचे सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन विश्व '१९२३ ते १९७६' या काळात 'वि. स. खांडेकर' नावाच्या लेखकाने भारावून टाकलेले होते. वास्तविक १९४५ नंतर नवसाहित्याची चळवळ आली, १९६० नंतर लेखकांची नवी पिढी आली. दलित लेखकांची चळवळ उभी झाली. अनियतकालिकांनी आपला वेगळा आवाज उठवला. वि. स. खांडेकरांच्या लेखनाविषयीचे असमाधान नवसमीक्षेने आणि कुसुमावती देशपांडे यांच्यासारख्या मर्मग्राही समीक्षिकेनेही स्पष्ट शब्दांत व्यक्त केले होते. तरीही, खांडेकरांची लोकप्रियता कमी झाली नाही. त्यांना पद्मभूषण, साहित्य अकादमी आणि ज्ञानपीठ असे सर्वोच्च सन्मान मिळत गेले. अशा या कृतार्थ लेखकाच्या १८९८ ते १९९८ (या वर्षी खांडेकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे टपालतिकीट निघाले) अशा जीवन-प्रवासातील प्रत्येक वर्षाच्या महत्त्वाच्या गोष्टींची दैनंदिन नोंद घेत दडकरांनी हा 'सचित्र चरित्रपट' विणला आहे. रा. ज. देशमुख प्रकाशनाने तो प्रकाशित केलेला आहे. देशमुख कंपनीशी निगडित असलेल्या विनय हर्डीकरांनी मराठी साहित्य आणि वाचकांची अभिरुची यांचे विश्लेषण करणारी व काही मार्मिक निरीक्षणे नोंदवणारी प्रस्तावना लिहिलेली आहे. शेकडो छायाचित्रांनी या २५५ पृष्ठांचा चरित्रपटातील मजकूर आरेखित केलेला आहे. म्हणून हा चरित्रपट 'सचित्र' चरित्रपट झालेला आहे. हा चरित्रपट उभा करताना खांडेकरांचे साहित्य, त्यांचा पत्रव्यवहार, आत्मनिवेदनात्मक आठवणी, वृत्तपत्रे-नियतकालिके यांच्यातून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले खांडेकरांसंबंधीचे वृत्तान्त आणि लेख, त्यांचे आत्मचरित्र यांचा आधार दडकरांनी घेतलेला आहे. पण संदर्भांचे अडथळे न ठेवून, निवेदनाच्या ओघात बाधा येऊ न देण्याची दक्षता घेतली आहे. हा चरित्रपट वाचताना खांडेकरांचे व त्यांच्या संबंधीचे उतारे दडकरांनी कोठून घेतले आहेत हे जाणून घेण्याची, वाचकाला आवश्यकताच वाटत नाही. क्वचित एखाद्या वेळी कुतूहल वाटते पण क्षणभरात ते बाजूला ठेवून वाचक पुढे जातो. एका तटस्थ निवेदकाचे निवेदन, खांडेकरांचे निवेदन आणि वृत्तान्तलेखकांची निवेदने असे तीन पातळ्यांवरचे निवेदन असूनही हा चरित्रपट सलग, एकसंध राहातो आणि त्यातून जिवंत होत जाते एका 'लेखका'चे जीवन आणि त्याचे व्यक्तिमत्त्व. त्याच्या आशाआकांक्षा, स्वप्ने आणि स्वप्नभंग. इच्छा, तळमळ, तडफड आणि प्रत्यक्ष वास्तव जगणे यांच्यातले ताण. त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक बाजू. त्याचे बहिर्मुख जीवन आणि अंतर्मुख मन. त्याचा परिवार आणि त्यांच्यापासून त्याला लाभलेले सुखदु:खाचे क्षण. आणि या साऱ्या चरित्रपटातून उभे होत जाते एक मानवी जीवन, अडखळती सुरुवात झालेले आणि पुढे लेखनाच्या

आणि लेखक म्हणून लाभलेल्या लोकप्रियतेच्या वेगात भिरभिरणारे जीवन, लाभलेल्या आयुष्यातील परिस्थिती, मन:प्रवृत्ती आणि प्रकृती हे घटक आणि कधी त्यांवर मात करून, जिद्दीने, निर्मितीच्या अदम्य प्रेरणेने घडविलेले आयुष्य. ते जगत असताना मनासारखे, पुऱ्या ताकदीनिशी ते घडवता आले नाही, हवी ती उंची गाठता आली नाही याबद्दलची खंत, सच्चेपणा आणि तडजोड अशी अंतर्बाह्य जग आणि मन यांच्यातली ओढाताण सदैव जाणवणारे आयुष्य, वाचनाने, संस्कारांनी, विचारशीलतेने, प्रामाणिक जगण्याने, आदर्शांच्या ओढीने



निर्माण झालेली मूल्यांवरची श्रद्धा आणि भोवतीच्या जीवनात त्यांना तडे जात असलेले पाहाताना होणारी तडफड... लेखक म्हणूनच केवळ नव्हे तर संवेदनक्षम माणूस म्हणून जगत असताना कोणत्याही माणसाला भोगाव्या लागणाऱ्या अनेक प्रकारच्या सुखदु:खांच्या असंख्य छटांनी हा चरित्रपट साकार झालेला आहे. हा चरित्रपट साकार करताना दडकरांनी घेतलेली भूमिका आणि प्रकट केलेला अभिजात संयम पाहाण्यासारखा आहे. दडकरांना, महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय, बहुचर्चित लेखकाचे व्यक्तिमत्व उभे करायचे आहे. खांडेकरांची जनमानसात असणारी प्रतिमा, स्वत: दडकरांच्या मनात असणारा खांडेकरांविषयीचा आदर आणि आत्मीयता, स्वत: खांडेकरांनी वेळोवेळी स्वत:च्या आयुष्याबद्दल आणि लेखनाबद्दल व्यक्त केलेले असमाधान या सर्व गोष्टींचे संतुलन या चरित्रपटात साधण्यात दडकरांना पुरेपूर यश आले हे सर्वप्रथम उल्लेखिले पाहिजे.

'खांडेकर घराण्याची वंशावळ' येथपासून हा चरित्रपट सुरू होतो. आत्माराम आणि रमाबाई या दांपत्याचा हा मुलगा. बुद्धिमान, वयाच्या तेराव्या वर्षी वडील मृत्युमुखी पडल्यावर आईच्या वडिलांच्या म्हणजे आजोबांच्या आश्रयाला जावे लागले. तेथेही ओढगस्त होतीच. गरिबीचे चटके लहानपणापासूनच कळले होते. मॅट्रिकला महाराष्ट्रातून आठवा आणि बेळगाव केंद्रातून दुसरा आल्याने चुलतमामांनी त्याला पुढे शिकवायचे ठरवून फर्ग्युसनमध्ये घातले. पुण्यात गडकरी भेटले, कोल्हटकर वाचायला मिळाले, साहित्यविषयक जाण वाढली, कदाचित नाट्यलेखनाने कुठेतरी आर्थिक मदत मिळेल म्हणून पहिले 'रमणीरत्न' नाटक लिहिले. गडकऱ्यांनी 'कोल्हटकरांच्या गादीचा वारस आहे' अशी त्याची बालगंधर्वांना ओळख करून दिली. आर्थिक विवंचनेतून सुटण्यासाठी लेखनाला प्रवृत्त होणे या घटनेशी आपण क्षणभर थबकतो. पुढचा चरित्रपट पाहाताना खांडेकरांच्या जीवननाट्यातील हे पताकास्थान होते, हे आपल्याला कळून येते. १९१६ साली खांडेकर चुलतचुलत्यांना दत्तक गेले खरे पण त्यांनी शिक्षणासाठी पुण्याला निघालेल्या या दत्तक मुलाच्या हाती चार पैसेही ठेवले नव्हते. खांडेकरांचे मन विरसून गेले. त्यांचे शिक्षणात लक्ष लागेना. तीन साडेतीन वर्षे पुण्यात घालवून, निराश मन:स्थितीत ते शिक्षण सोडून घरी परतले तेव्हा आधार दिला तो दत्तक बहिणीने - अक्काने. १९१८ साली बालकवी अपघातात गेले (५ मे) आणि १९१९ साली गडकरी (२३ जानेवारी). त्यावेळी खांडेकर सावंतवाडीत होते. मनाला विरंगुळा म्हणून लेखन-वाचन सुरू होते. कोल्हटकरांच्या प्रभावामुळे गंजलेली मने आणि बुरसटलेल्या रूढी यासंबंधी विनोदी लेख लिहायचे खांडेकरांनी ठरवले. 'उद्यान'मध्ये लेख छापून आला 'श्रीमत्कालिपुराण' प्रथम स्कंध. माडखोलकरांनी गडकऱ्यांवर टीका केली, त्यांना उत्तर देणारा लेख 'नवयुग'मध्ये छापून आला आणि 'कुमार' या टोपणनावाने 'होळी' ही कविता रचली ती अगदी 'दसरा'च्या वळणाची. 'माझे लिहिणे, लोकांचे लक्ष वेधू शकते, हे कळले आणि कादंबरी लिहायला घेतली 'क्षितिज'. विषय होता 'एका दत्तक मुलाचा अनुभव'. ही कादंबरी अपुरी राहिली. तसेच पुढेही कित्येक संकल्प अपुरे राहिले. १९२० साली खांडेकरांनी गडकऱ्यांच्या पहिल्या स्मृतिदिनी 'नवयुग'साठी लेख लिहिला. समारोप करताना लिहिले - 'सरस्वतीच्या मनोमंदिरात महाराष्ट्रातला

हा राजहंस अक्षय शांतीची झोप घेऊ दे... 'ऋणानुबंधाच्या तुटल्या आता गाठी । मग कुठल्या गाठभेटी ।। हे देवाघरचे देणे । नशिबाने देणे घेणे । कुणीतरी कुणास्तव रडणे । ती रडणारी रडतिल धाई घाई । करि आता जो तो गाई ।।'' गडकऱ्यांवरील हा लेख 'हा हन्त हन्त' या नावाने प्रसिद्ध. हे तटस्थ निवेदकाचे (जया दडकर यांचे) वाक्य. -

खांडेकरांच्या पुढच्या सबंध लेखनप्रवासाची ही पहिली पाऊलवाट होती. याच भावुक वळणाने ते पुढे आयुष्यभर चालत राहिले. पण तटस्थ निवेदक असे काहीच बोलत नाही. या लेखाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी शाबासकी दिली. माडखोलकरांनी खांडेकरांना तसे कळवले. खांडेकरांनी श्रीपाद कृष्णांना पत्र लिहिले आणि त्याचे उत्तर आले : आपल्या विनोदी लेखात शाब्दिक कोट्या फार असून त्यांची भाषा गुंतागुंतीची असावी असे मला आठवते... हे दोष आपण जरूर टाळावेत. शाब्दिक कोटी फारच विलक्षण नसल्यास तिजमुळे रसभंग होतो...' तटस्थ निवेदक सांगतो, कोल्हटकरांचे पत्र वाचून खांडेकरांना अस्मान ठेंगणे झाले.

१९२० साली खांडेकरांनी शिरोड्यात प्रवेश केला. प्रकृती साथ देत नसूनही १८ वर्षे ते तिथे राहिले. शाळेसाठी निधी मिळवण्यापासून कष्टांना सुरुवात केली. शाळेने त्यांच्या आयुष्याला ध्येय मिळवून दिले. मासिकांकडून विनंतीपत्रे येऊ लागली आणि लेखन आणि समाजसेवा यांनी त्यांच्या आयुष्याला अर्थ दिला. 'वैनतेय' साप्ताहिक त्यांनी सुरू केले. लेखनामुळे अनेक लेखकांचा स्नेह, विद्यार्थ्यांचे प्रेम, व्याख्यानांची निमंत्रणे, साहित्यसंमेलनांची निमंत्रणे, नाटक, ललित लेख, कथासंग्रह, परीक्षणे इ. लेखन, विवाह आणि १९३० साली पहिली कादंबरी ('हृदयाची हाक'). खांडेकर झपाटल्यासारखे लिहीत होते. साहित्यिक म्हणून सुप्रतिष्ठित होत होते. दडकरांनी खांडेकरांच्या लेखक म्हणून होणाऱ्या या वेगवान प्रवासावर लक्ष अधिक केंद्रित केले आहे. त्यांचे खाजगी जीवन, विवाह, मुलांचे जन्म, पत्नीचे आजारपण, आप्तांचे मृत्यू अशा घटनांच्या उल्लेखांतून सूचित केलेले आहे. दत्तक पित्याचा, सख्ख्या आईचा, दत्तक आईचा, दत्तक बहिणीचा मृत्यू अनुभवताना त्यांच्या मनात आलेले विचार त्यांच्या शब्दात वर्णिले आहेत. लेखक म्हणून त्यांची सुरू असलेली घोडदौड वृत्तपत्रांतील बातम्यांच्या उल्लेखांवरून, साहित्यिकांच्या भेटीगाठीसंबंधीच्या वृत्तांतातून, इतर वर्णनांतून दाखवली आहे. वक्ते म्हणून, साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून, प्रमुख वा सन्माननीय निमंत्रित म्हणून त्यांना मिळणारी लोकप्रियता यांचा आलेख तर दडकर उभा करतातच पण ठिकठिकाणी झालेल्या त्यांच्या अनेक व्याख्यानांच्या

''१९७४ चा पुरस्कार माझ्या लेखनाला देऊन ज्ञानपीठाने माझा जो गौरव केला आहे त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. हा पुरस्कार भारतीय साहित्यक्षेत्रातला सर्वोच्च बहुमान आहे, पण तो माझा वैयक्तिक सन्मान नसून, सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व या गुणांनी संपन्न झालेल्या मराठी सर्जनशील साहित्याचा एक प्रतिनिधी म्हणून मला लाभला आहे, याची पूर्ण जाणीव मला आहे.

या यंत्रयुगात आणि त्याने निर्माण केलेल्या जगड्व्याळ तांत्रिक पसाऱ्यात प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या आत्म्याचे पोषण स्वतःच्याच प्रयत्नाने करायला हवे. त्यासाठी प्रेम, करुणा, पराक्रम इत्यादी चिरंतन मूल्यांवर तिची पूर्ण श्रद्धा असायला हवी. केवळ श्रद्धा असून चालणार नाही. ही श्रद्धा दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची त्या व्यक्तीने शिकस्त करायला हवी. या श्रद्धेच्या जोडीला बदलत्या समाजव्यवस्थेच्या आव्हानांना अभिप्रेत असलेली समता, आर्थिक न्याय, सामाजिक न्याय इत्यादी मानवी मूल्यांचाही व्यक्तीने भावनिक स्वीकार केला पाहिजे.

हे काम सामान्य मनुष्याच्या दृष्टीने सोपे नाही हे मी जाणतो. पण मानव जातीच्या दीर्घकालीन प्रवासात मनुष्याने अशी अनेक आव्हाने स्वीकारली आहेत. कारण, मनुष्य हा केवळ सिसिफसच नसतो. त्याच्या जोडीने प्रॉमिथिअसही त्याच्या ठिकाणी सुप्त स्वरूपात नांदत असतो. अधिक सुखी अशा मानवी समाजाची, अधिक चांगल्या अशा समाजव्यवस्थेची, आणि अधिक उन्नत अशा मानवाची स्वप्ने हा प्रॉमिथिअस शतकानुशतके पाहत आला आहे.''

**— वि. स. खांडेकर**

वृत्तान्तांमधून काही अवतरणे निवडून त्यांची वाङ्मयविषयक व जीवनविषयक भूमिकाही स्पष्ट करीत जातात.

हे चरित्र 'चरित्र' या नेहमीच्या पद्धतीने न लिहिता, धावते निवेदन टाळून, वर्णनपरता टाळून, विश्लेषण वा भाष्य टाळून ते एखाद्या कॅमेऱ्याने टिपावे अशा पद्धतीने निवेदिल्याने हा चरित्रपट आग्रहांपासून, पूर्वग्रहांपासून, बाजू घेण्यापासून, गुणदोष दाखवण्यापासून अलिप्त राहातो. लेखक म्हणून आपण कुठे कमी पडतो याविषयीचे विश्लेषण स्वत: खांडेकरांनीच केलेले आहे. त्याची कारणमीमांसाही केली आहे. आर्थिक मजबुती लाभावी म्हणून ते चित्रपट क्षेत्राकडे वळले. तिथेही त्यांना लेखक म्हणून यश आणि आर्थिक बळ लाभले, पण लेखक म्हणून आपण स्वत:वर अन्याय करतो आहोत हेही जाणवले. शिरोडे सोडल्यानंतर खांडेकर लेखनावरच जगत होते. त्यामुळे वर्षाकाठी किती लिहिले म्हणजे नीट जगता येईल याचेही हिशेब मांडत होते. तडजोडी करीत होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्याशी झुंज सुरूच होती. लोकांच्या प्रेमादरास पात्र झालेला लेखक म्हणून सतत प्रवास सुरू असे. या साऱ्या धावपळीत मुलांकडे लक्ष देणे, त्यांचे शिक्षण, पत्नीशी चाललेला संसार? खांडेकरांनी अविनाशला १८व्या वर्षी लिहिलेले दीर्घ पत्र दडकरांनी निवडले आहे. मुलीच्या लग्नाचा विचार त्यांच्या मनात आल्याचे वाक्य येते. एवढेच. 'गृहस्थ' ही भूमिका त्यांना रंगवायची नाही. पण 'माणूस' आणि 'लेखक' रंगवायचा आहे.

या चरित्रपटाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे जवळजवळ ५० वर्षांच्या कालखंडातल्या महत्त्वाच्या वाङ्मयीन घडामोडींचे वातावरण आणि महत्त्वाच्या साहित्यिकांचे दर्शन त्यातून प्रकट होते. अर्थात त्यातही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे ती खांडेकरांचीच. खांडेकर वक्ते म्हणून, अध्यक्ष म्हणून जेथे जेथे गेले त्यांची वृत्ते, भाषणांचे वृत्तान्त, लेखक-स्नेह्यांशी त्यांनी केलेल्या चर्चा, खांडेकरांच्या लेखनाच्या प्रकाशनांचे तसेच कलाकृतींचे

'वि. स. खांडेकर यांचे हे चरित्र नाही. हा खांडेकरांच्या कारकीर्दीचा जमा-खर्च नाही. त्यांचे गुण व मर्यादा यांचे विश्लेषण नाही. त्यांना महान किंवा लहान ठरविण्याचा हा आटापिटा नाही. खांडेकरांच्याच शब्दांतून आणि त्यांच्या छायाचित्रांमधून व त्या काळच्या इतर दृश्य साधनांमधून अतिशय संयमाने पण सत्यप्रियतेने घडविलेले हे खांडेकर-दर्शन आहे. यात काही लपविलेले नाही आणि मुद्दाम उघडे पाडलेले नाही. जवळजवळ वीस वर्षे दडकर या प्रकल्पाच्या मागे असावेत; पण एवढ्या दीर्घ ग्रंथात त्यांचे स्वत:चे नाव फक्त एकदा आले आहे. तो उल्लेखही खांडेकरांनी त्यांना लिहिलेल्या पत्राच्या निमित्ताने आला. अर्थात दडकर हे भाबडे भक्त नाहीत. सहजासहजी कोणाला बरे न म्हणण्याचे कोकणी कृपणत्व त्यांच्याकडेही आहे. त्याचे काही मासले जाणकार वाचक लगेच ओळखतील. पण दडकरांनी केवळ खांडेकरांचेच नाही तर एकूणच तत्कालीन मराठी साहित्यविश्व साहित्यिकांच्यासकट या पुस्तकात पकडण्याचाही प्रयत्न केलेला आहे. साहित्यिकांचे वाद, हेवे-दावे, आरोप-प्रत्यारोप त्यांनी समंजसपणे टाळले आहेत; पण महत्त्वाच्या साहित्यिक घटना, व्यक्ती, महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाच्या घटना व व्यक्ती, त्यांचे अखिल भारतीय संदर्भही अधोरेखित केले आहेत. या पुस्तकातील छायाचित्रे आणि दृश्यप्रतिमा पाहिल्यावर दडकरांनी घेतलेले अपार परिश्रम जाणवतात आणि निवड करण्याची दडकरी-पद्धत मनाची पकड घेते. मराठी साहित्यात एकूणच डॉक्युमेंटेशनविषयी अनास्था असताना, सोयी व साधनांचा तुटवडा असताना दडकरांनी सूर्य-जयद्रथ-वृत्तीने पिवळे आणि फाटके जुने कागद, संस्थांची धूळ खात पडलेली रेकॉर्ड्स, ग्रंथालयांच्या अलमाऱ्या, देशमुख कंपनीच्या जुन्या ट्रंका, खांडेकरांची गदळ अक्षरातली पत्रे, महाराष्ट्रभर विखरून पडलेले फोटो, खांडेकरांच्या इतर भारतीय भाषांतील भाषांतरांच्या प्रती आणि कव्हरे, वर्तमानपत्रांतील कात्रणे, खांडेकरांना मिळालेली मानपत्रे आणि मानचिन्हे या सर्वांचा धांडोळा घेऊन एक अपूर्व दस्तऐवज उभा केला. सार्वजनिक व्यक्तीचे कौटुंबिक जीवनही त्यांनी दुर्लक्षिले नाही. एवढेच नव्हे तर मराठी साहित्याच्याही कुटुंबाचे प्रमुखत्व भाऊसाहेबांकडे कसे चालून आले तेही आत्मीयतेने दाखविले आहे. हे पुस्तक वेगळे आहेच, पण आगळेही आहे. त्याचा वाङ्मयप्रकार कोणता या प्रश्नाला उत्तर एकच : हा वाङ्मयप्रकार या पुस्तकापासूनच मराठीत सुरू होत आहे.'

**- विनय हर्डीकर**

अनुवाद प्रकाशित झाले त्यांचे उल्लेख तारखांसह दिलेले आहेत. खांडेकरांचे लेखक म्हणून विकसित होत गेलेले, कधी निराशेने व्यग्र झालेले, कधी समाधान पावलेले, सुखावलेले किंवा कुटुंबियांकडून पुरेसा निवांतपणा लाभत नाही, त्यांना आपल्या लेखनाचे महत्त्व वाटत नाही याबद्दल हळवेपणाने खिन्न होणारे मन दडकरांनी साक्षात वाचकांसमोर उभे केले आहे. या मागे दडकरांचे विलक्षण परिश्रम आहेत, ते पानापानांवरील उल्लेखातून दिसून येतात. प्रत्येक वर्षाच्या प्रत्येक महिन्यातल्या सर्व महत्त्वाच्या घटनांची तारीखवार नोंद घेताना दडकरांनी तत्कालीन दुर्मिळ जुनी वृत्तपत्रे, नियतकालिके, खांडेकरांचा पत्रव्यवहार, आठवणी, त्यांचे आत्मचरित्र किती बारकाईने वाचून टिपून घेतले असणार ते पाहून वाचक चकित होतो. खांडेकरांचे कार्यक्षेत्र दर्शविणारा महाराष्ट्राचा नकाशा प्रथम येतो. नंतर खांडेकरांचे कुलदैवत श्री म्हाळसादेवीचे छायाचित्र व त्यांची कुंडली येते. त्यानंतरच्या पानापानांवर खांडेकर जिथे वावरले ती घरे, मंदिरे, त्यांचे आप्त, त्यांनी वाचलेली पुस्तके, त्यांच्या मॅट्रिकच्या रिझल्टची छायाप्रत, पुणे नगर वाचन मंदिर आणि किर्लोस्कर नाट्यगृह, फर्ग्युसन कॉलेजच्या पहिल्या वर्षी उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या यादीत खांडेकरांचे नाव, फर्ग्युसन कॉलेजचे सदस्य आणि प्राध्यापक, सावंतवाडीतील सखारामबापूंचे घर, सखारामबापूंची मोडीतील स्वाक्षरी, श्रीराम वाचन मंदिर किंवा नानेलीचा मांगर, खांडेकरांचे जुन्यात जुने हस्ताक्षर किंवा पुढे पटकथा लिहितानांच्या वेळचे वेड्यावाकड्या अक्षराचे एक पृष्ठ, पहिला लेख, पहिली प्रकाशित कविता, पहिला विनोदी लेख यांच्या छायाप्रती, खांडेकरांच्या सर्व पुस्तकांची मुखपृष्ठे, खांडेकरांचे वयोमानानुसार होत गेलेले बदल दाखवणारी छायाचित्रे, शिरोड्याच्या शाळेच्या नव्या इमारतीचे आणि तिच्या अनावरण विधीच्या निमंत्रणाचे छायाचित्र. विद्यार्थ्यांबरोबर, लेखक स्नेह्यांबरोबर, अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून असणारे खांडेकर - विविध वाङ्मयीन कार्यक्रमात सहभागी असणारे खांडेकर आणि तत्कालीन ज्येष्ठ, श्रेष्ठ साहित्यिक अशी छायाचित्रे पानोपानी आहेत. खऱ्या आणि संपूर्ण अर्थाने हा 'सचित्र' चरित्रपट पाहणे हा एक आगळा अनुभव आहे; कारण तो आपल्याला एका कालखंडातल्या वाङ्मयीन वातावरणाचा स्पर्श देतो. खांडेकरांच्या अनुवादित पुस्तकांची, अनुवादकांचीही छायाचित्रे, त्यांनी लिहिलेल्या चित्रपटांची, त्यातल्या अभिनेत्यांची व त्यांच्या दिग्दर्शक स्नेह्यांची छायाचित्रेही खांडेकरांच्या लेखक म्हणून समृद्ध आयुष्याचा प्रत्यय देतात. ज्ञानपीठ पारितोषिकाचे प्रशस्तीपत्र प्रारंभी आणि अखेरीस आसपास म्हणूनच दिलेले आहे. खांडेकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९९८ साली काढलेले खास टपालतिकीट वाचकाला येथेच पाहायला मिळते. पंतप्रधान नेहरूंच्या हस्ते अकादमीचे उपराष्ट्रपती जत्ती यांच्या हस्ते विश्व हिंदी साहित्य संमेलनप्रसंगीच्या सत्काराचे, ज्ञानपीठ पुरस्कार लाभतानाचे, दुर्गाबाईंच्या हस्ते कऱ्हाडला सत्कार होतानाचे अशी अनेक महत्त्वाची छायाचित्रे दडकरांनी जमवलेली आहेत. कऱ्हाड संमेलनात दुर्गा भागवतांनी 'आणीबाणी'त जयप्रकाश नारायण यांना दीर्घायुष्य लाभो म्हणून प्रार्थना करण्यासाठी व्यासपीठावरील सर्वांना उभे राहाण्याची विनंती केली. तो ऐतिहासिक क्षण पकडणारे छायाचित्र, खांडेकरांच्या अंत्ययात्रेचे छायाचित्र आणि अनेक थोर नेत्यांनी, साहित्यिकांनी वाहिलेल्या श्रद्धांजलीचे उतारे - '१८९८ : जानेवारी ११ पौषातली अंगारकी संकष्टी. संध्याकाळी ७ वाजून १९ मि. आजोळी माईणकरांच्या घरी गणेशचा जन्म' या वाक्यापासून हा चरित्रपट सुरू होतो आणि १९७६ सप्टेंबर ३ : 'भाऊसाहेबांच्या रक्षेचे विसर्जन आज सकाळी दहा वाजता पंचगंगेवर झाले' या वृत्ताने तो संपूर्ण होतो.

या चरित्रपटासाठी दडकरांनी किती परिश्रम घेतले हे तर पानोपानी जाणवतेच, पण हे आगळेवेगळे चरित्र मराठीत एकमेव असणार आहे हेही आपल्याला पूर्ण कळून चुकते. कारण 'असे चरित्र लेखन' करणारे, असे खांडेकरांवर मनोमन विलक्षण प्रेम करणारे, दडकरांसारखी अंतर्दृष्टी असणारे छायाचित्रकार आणि चरित्रकार पुन:पुन्हा निर्माण होत नसतात. म्हणून हा खांडेकरांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व साकार करणारा सचित्र चरित्रपट मराठी वाचकाने एकदा तरी अनुभवावा असाच आहे.

**– प्रभा गणोरकर**

# उत्तरायण

## रवींद्र शोभणे

'रामायण' आणि 'महाभारत' (विशेषत: 'महाभारत') ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची आर्ष महाकाव्ये गेल्या दोन सव्वा दोन हजार वर्षांपासून भारतातील आर्ष महाकाव्यांची असंख्य वेळा पुनर्निर्मिती झालेली आहे. मराठीपुरते बोलायचे झाले तर महानुभावांच्या उदयापासूनच महाभारतातून कथाबीज घेऊन नवनिर्मिती




अनेक कवी लेखकांना आकर्षित करीत आहेत. सर्वच भारतीय भाषांमध्ये 'रामायण' आणि 'महाभारत' या होऊ लागलेली दिसते. वारकरी संतांनाही महाभारताचे आकर्षण आहेच. परंतु जेव्हा जेव्हा कथात्मक,





नाव : **रवींद्र शोभणे**

जन्म : १५ मे १९५९

साहित्य

कांदबऱ्या : प्रवाह, रक्तध्रुव, कोंडी, चिरेबंद, सव्वीस दिवस, उत्तरायण

कथा : वर्तमान, कथांजली, दाही दिशा, शहामृग

समीक्षा : कादंबरीकार श्री. ना. पेंडसे

नाटके : इतिहास बदलतो आहे

: होती एक बृहन्नडा

: एक दीर्घ सावली

आख्यानात्मक काव्य निर्माण करावयाचे असेल तेव्हा तेव्हा बहुसंख्य मराठी कवी महाभारताच्याच आश्रयाला गेलेले आहेत असे दिसते. कधी या कथाकवींनी संपूर्ण महाभारत तरी सांगितले आहे किंवा छोटे कथाबीज घेऊन तरी ते फुलविलेले आहे. याचा अर्थ मध्ययुगीन मराठी कवींनी महाभारताची कथा जशीच्यातशी मराठीमध्ये सांगितली असे मात्र नाही. त्यांनी त्यांच्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. हा अर्थ लावताना अनेक ठिकाणी त्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्यही प्रकट झाले आहे. आधुनिक काळातही महाभारताच्या कथासूत्राने अगर त्यातील एखाद्या व्यक्तीने अनेक प्रतिभावंतांना भुरळ घातली आहे. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, वि. वा. शिरवाडकर, अण्णासाहेब किर्लोस्कर, वि. स. खांडेकर, रणजित देसाई, शिवाजी सावंत अशी काही ठळक नावे सांगता येऊन शकतील. परंतु मध्ययुगातील आणि आधुनिक युगातील लेखकांच्या प्रेरणांमध्ये खूपच अंतर आहे. मध्ययुगातील प्रमुख प्रेरणा धर्म हीच होती. जीवन समजून घेणे, श्रेष्ठ काव्याचे पुनर्निर्माण करणे या प्रेरणा नसतीलच असे नाही, परंतु प्रमुख प्रेरणा मात्र निश्चितपणेच धर्माची होती. भक्तीची होती. आधुनिक काळात ही प्रेरणा फारशी महत्त्वाची राहिलेली नाही. स्वाभाविकपणेच महाभारताची कथा ही आपल्या भोवतीच्या समाजाचा काही अन्वायार्थ लावता येईल का यासाठी वापरली जाऊ लागली. म्हणूनच ' कौंतेय'मधील कर्ण हा उपेक्षितांचा प्रतिनिधी म्हणून येऊ शकला. किंवा भोवतीच्या समाजात भोगवादाला प्राधान्य आल्यावर वि. स. खांडेकर यांना 'ययाती'चे व्यक्तिमत्त्व उभे करावे असे वाटले. याचा अर्थ असा की मिथकांचा आपल्या काळाच्या अनुषंगाने काही अर्थ लावता येतो का, तसेच मानवी जीवनाच्या चिरंतन प्रेरणांचा शोध घेता येऊ शकतो का या दृष्टीने महाभारत कथेचा विचार सुरू झाला. याच लेखकांच्या परंपरेमध्ये आवर्जून उल्लेख करावा अशी कादंबरी म्हणजे श्री. रवींद्र शोभणे यांची 'उत्तरायण' ही होय. भीष्माला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली ही कादंबरी पृष्ठसंख्येच्या दृष्टीनेही लक्षणीय आहे. (रॉयल डेमी आकाराची ५६० पृष्ठे) महाभारतकालीन समाजाचा, भारतीय युद्धाचा आणि त्यासाठी युद्धशास्त्राचा भरपूर अभ्यास केल्याशिवाय एवढा मोठा पट कुठल्याही लेखकाला साकार करता येणे शक्य नाही. येथे श्री. रवींद्र शोभणे यांनी असा व्यापक पट तर निर्माण केलाच आहे, पण तो त्यांनी आपल्या अभ्यासाने तोलून धरला आहे.

'महाभारत' किंवा महाभारतातील एखादी व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून पुनर्निर्मिती करावयाची म्हणजे अनेक प्रश्न निर्माण होतात. एक तर महाभारताच्या निर्मितीचा काळ खूप दूरचा आहे. त्यामुळे महाभारताची अधिकृत संहिता निश्चित करणे अगर अशी एखादी संहिता प्रमाण मानणे ही गोष्ट खूप अवघड असते. दुसरे असे की, त्यातील पुष्कळसा भाग गूढ, धूसर आणि चमत्कारांनी भरलेला असतो. विशेषत: मध्ययुगातील कवींनी आपल्या भक्तीच्या प्रेरणेसाठी चमत्कारांचे मिश्रण मूळ कथेत केले आहे. जनसामान्यांच्या मनावर त्यांचा इतका पगडा पडलेला असतो की तो दूर करून मूळ महाभारत कथा समजून घेणे पुष्कळच जिकीरीचे होऊन जाते. उदा. द्रोपदीची विटंबना जेव्हा कौरवसभेत झाली तेव्हा तिला वस्त्रे पुरविण्याचे काम श्रीकृष्णाने केले असे जनमानसात ठाम रुजलेले असते. श्रीकृष्णामुळे तिच्या अब्रूचे रक्षण झाले यावर जनसामान्यांचा ठाम विश्वास असतो. यातून श्रीकृष्णाचे परमेश्वरी रूपही सिद्ध होते. भक्तिप्रेरणेमुळे हे झालेले आहे हे उघड आहे. तरीही या कथेचा अर्थ कसा लावायचा असा प्रश्न पडतो. हा असा प्रश्न पडणे मध्ययुगातील लेखकाला शक्य आहे असे वाटत नाही. (किंवा पडला तरी तो महत्त्वाचा आहे असे दिसत नाही.) त्यांच्या दृष्टीने परमेश्वरी कृपेमुळेच हे घडू शकते. त्यामुळे तो भक्तिरसात न्हावून या प्रसंगाचे मोठे बहारदार वर्णन करतो. परंतु आधुनिक लेखक असा दृष्टिकोण स्वीकारू शकत नाही. रवींद्र शोभणे हे केवळ आधुनिक काळातील लेखक आहेत, असे नाही तर आधुनिकतेचे कोणते परिणाम मानवी जीवनावर झाले, याचा शोध घेणारे लेखक आहेत. त्यांची 'कोंडी' ही या संदर्भातील महत्त्वाची कादंबरी आहे. त्यांच्या कथांमधूनही अशाच प्रकारच्या जीवनजाणिवा येताना दिसतात. तेव्हा आधुनिकतेच्या परिणामांचा सजग दृष्टीने विचार करणाऱ्या लेखकाला बुद्धिनिष्ठा आणि विज्ञानातील प्रगती यांचा विचार करावाच लागतो आणि रवींद्र शोभणे तो करतात. त्यामुळेच त्यांच्यासारख्या लेखकापुढे प्रश्न निर्माण होतो तो, कृष्णाने द्रौपदीला वस्त्र पुरविले असतील का? हे शक्य आहे का? दौपदीवस्त्र हरणाच्या या प्रसंगात रवींद्र शोभणे यांनी वेगळाच मार्ग काढलेला आहे. त्यांच्या दृष्टीने द्रौपदीला वाचवले ते गांधारीने. गांधारी ही राजमाता आहे. दुर्योधन-दुःशासनाची आई आहे. मुख्य म्हणजे स्त्रीची दुःखे स्त्रीलाच कळू शकतात हेही येथे गृहीत आहे. एकंदरीत द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगाला वास्तवरूप देण्याचा रवींद्र शोभणे यांचा हा प्रयत्न निश्चितच मानवी स्वभावाला अनुसरून आहे असेच म्हणावे लागते. या प्रसंगाप्रमाणेच इतर प्रसंगातील

चमत्कारांच्या जंजाळातूनही लेखकाने अशीच वाट शोधली आहे. रवींद्र शोभणे यांचा संजय दिव्यदृष्टी प्राप्त झालेला असा कुणी पुरुष नाही, तर सामान्य सूतपुत्र आहे. धृतराष्ट्राला युद्धवार्ता सांगण्यासाठी तो प्रत्यक्ष रणांगणावर जातो, आजूबाजूचे निरीक्षण करतो, इतरांकडून माहिती गोळा करतो आणि खूप दूरचा प्रवास करून परत येतो व धृतराष्ट्राला जे आवडेल तेवढेच सांगतो. अशा त्याच्या सतत फेऱ्या चाललेल्या असतात. धृतराष्ट्राबरोबरच तो विदुरांनाही वार्ता सांगत असतो. म्हणजे संजयाला दिव्यदृष्टी प्राप्त झालेली होती, ही जनमानसात रुजलेली गोष्ट रवींद्र शोभणे



स्वीकारीत नाहीत. संजयाला ते वास्तवाच्या पातळीवर घेऊन येतात. जयद्रथवधाचेही गूढ लेखकाने असेच उलगडले आहे. अर्जुनाची प्रतिज्ञा आणि जयद्रथवध हे प्रकरणही असेच चमत्कारांच्या जंजाळात अडकलेले आहे. लेखकाने येथे निसर्गाच्या बदलत्या रूपाचा आश्रय घेतलेला आहे. म्हणजे या कथेवरील कृष्णचमत्काराचे आवरण दूर केले आहे. धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांचाही लेखकाने असाच उलगडा केला आहे. गांधारीपासून झालेल्या त्याच्या पुत्रांची संख्या केवळ चौदाच आहे हे त्यांनी त्यांच्या नावांसह नोंदिवले आहे. इतर सगळी मुले दासीपुत्र होते हेही त्यांनी सांगितले आहे. राजवाड्यातील अनेक दासी या राजाच्या भोगासाठीच असत हे समाजातील सगळ्यांनीच गृहीत धरलेले असे. महाराणीला हे मान्य असो किंवा नसो कबूल करावे लागे. यातून अशा पुत्रांची संख्या वाढत जात असे. धृतराष्ट्राच्या शंभर मुलांची कथा ही अशी लेखकाने उलगडून दाखविलेली आहे. अर्थात् दासीपुत्रांना राजवाड्यात जागा नव्हती, हे रंगवायलाही लेखक विसरलेला नाही हे महत्त्वाचे. स्वर्ग नावाची गोष्टही अशीच अद्भुत आणि गूढ. रवींद्र शोभणे यांनी स्वर्गालाही वास्तव रूप देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या दृष्टीने हिमालयापलिकडील आर्यांचे मूळ वसतिस्थान म्हणजे स्वर्ग. या स्वर्गाशी क्वचित का होईना तत्कालीन भारतीयांचे आदानप्रदान होते हे लेखकाने गृहीत धरलेले आहे आणि त्यातून स्वर्गकल्पनेचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. कुंती आणि माद्री यांच्या मुलांच्या जन्मामागे काही मंत्रसामर्थ्य आहे, असे लेखकाला वाटत नाही, तर या स्त्रियांनीही नियोगानेच मुले मिळविलेली होती असे लेखकाला वाटते. त्यासाठी दुर्वास आणि कोवळ्या वयातील कुंती यांचे संबंध कसे आले असावेत याचा काही एक तर्क करून लेखकाने या संबंधाची फार चांगली उभारणी केली आहे. हे सगळे प्रयत्न म्हणजे महाभारत कथा वास्तव पातळीवर आणण्याचा प्रयत्न आहे असेच म्हणावे लागते. यासाठीच या संबंध कांदबरीत युद्धभूमीवर गीता अवतरली हे लेखकाने कोठेही सांगितलेले नाही, हे फार महत्त्वाचे आहे. युद्धाच्या धामधुमीत गीतेसारखा तत्त्वचिंतनपर सूत्ररूप ग्रंथ अवतरणे शक्य नाही, असेच लेखकाने गृहीत धरले असले पाहिजे हे उघड आहे. एकंदरीत अशा अनेक चमत्कार कथांमागील वास्तव काय असू शकेल याचा लेखकाने फार कसोशीने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याआधारे संपूर्ण महाभारत कथेला एक मानवी रूप प्राप्त झालेले आहे हे महत्त्वाचेच म्हणावे लागेल. असे असले तरी शिखंडी रहस्य मात्र लेखकाला नीटपणे उलगडता आलेले नाही याचीही नोंद करावी लागतेच.

चमत्कारांच्या जंजाळातून आधुनिक लेखकाला जशी वाट काढावी लागते, त्याप्रमाणेच इतरही अनेक बारीकसारीक प्रश्नांचा सूक्ष्म विचार त्याला करावा लागतो. मुख्य म्हणजे भक्तीचा, आणि आणि त्याबरोबरच व्याज रोमँटिक दृष्टीचा पगडा उतरवून ठेवावा लागतो. हे एकदा झाले की महाभारतातील माणसे ही कर्तृत्वाने मोठी असली तरी शेवटी माणसेच होती, माणसांचे सारे विकार त्यांच्याकडेही होते, हा दृष्टिकोण प्राप्त होतो आणि महाभारताची कथा हळूहळू वास्तवाच्या पातळीवर येऊ लागते. ही प्रक्रिया एकदा सुरू झाली की, महाभारतातील व्यक्ती त्यांच्या भोवतीची संस्कृती, त्यांच्या निष्ठा, त्यांचे संघर्ष आणि त्यांची विचारसरणी यांना जसे महत्त्व प्राप्त व्हायला लागते, त्याप्रमाणेच

त्या व्यक्तीचे वय काय होते, हा मुद्दाही महत्त्वाचा ठरत जातो. महाभारतीय युद्ध सुरू झाले तेव्हा भीष्माचे वय शंभरपेक्षा अधिक होते, तर कृपाचार्यांचे वय शंभरच्या जवळपास येऊन पोचलेले होते, या सगळ्याच गोष्टींना महत्त्व प्राप्त होते. लेखकाने त्या त्या वयाची मानसिकताही नेटकी प्रकट केली आहे.

चमत्कारांच्या गर्दीतून मार्ग काढून आणि मानवी वास्तवाशी निगडित असणाऱ्या प्रश्नांचा सूक्ष्म शोध घेऊन येथील महाभारतकथा वास्तवाच्या ठामपणे उभी राहते. आणि त्यामुळेच युद्धाची भीषणता तीव्रतर होत जाते. किंबहुना भीष्माला केंद्रस्थानी ठेवून युद्धपर्वाचे चित्रण करू इच्छिणाऱ्या या कांदबरीसाठी हे अधिकच आवश्यक होते.

महाभारताची ही कथा वास्तवाच्या पातळीवर आणण्यासाठी लेखकाला आणखी पुष्कळ गोष्टी कराव्या लागलेल्या आहेत. ही कांदबरी प्रामुख्याने युद्धाच्या छायेत वावरणाऱ्या राजघराण्याचे चित्रण करते. अनुषंगाने पूर्वस्मृती येत असल्या आणि त्यातून प्लॅश बॅक पद्धतीने युद्धपूर्व काळ येत असला तरी ही कादंबरी प्रामुख्याने युद्धचित्रणावरच केंद्रित झाली आहे. कादंबरीचा प्रारंभ होतो तो युद्धाच्या सूचनेने आणि कादंबरीचा शेवट होतो तो पांडवांच्या विजयाने आणि अपरिमित विध्वंसाने. युद्धाची भयप्रदता, प्रचंड विध्वंस आणि विनाश यांचे मोठे अंतर्मुख करणारे चित्रण रवींद्र शोभणे यांनी केले आहे. त्याबरोबरच आवश्यक असणारे असंख्य तपशील त्यांनी अतिशय कलात्मक आणि परिणामकारक रीतीने प्रकट केले आहेत. युद्ध म्हणजे केवळ विजय किंवा पराजय असत नाही तर, त्यासाठी केवढी तरी पूर्वतयारी करावी लागते याची जाणीव लेखकाला आहे. यामुळे कौरवसेना जेथे तळ ठोकून बसलेली होती, तेथे विपुल पाण्याची सोय नसल्याने प्रातर्विधीची प्रचंड दुर्गंधी पसरल्याचे लेखक चित्रित करतो. पुढे युद्ध जसजसे तीव्र होत जाते, तसतशी मानवी देहांची दुर्गंधी सबंध आसमंतभर भरून राहिली, त्याचे चित्रण करतो. भीष्म शरपंजरी पडल्यानंतर बाण टोचून शरिरात पू कसा भरून राहिला, तो कसा वाहू लागला याचे चित्रण करतो. या सगळ्या चित्रणामधून जुगुप्सा तर निर्माण होतेच, पण युद्धाची भयप्रदताही तीव्रतर होत जाते. याशिवाय युद्धात सहभागी होणाऱ्या राजांची आणि त्यांच्या सैनिकांचीही मोठी सरस चित्रणे लेखकाने केली आहेत. नकुल, सहदेव या भावंडांचे मामा पांडवांना मदत करण्यासाठी येतात आणि मधल्यामध्ये दुर्योधनाने केलेल्या पाहुणचाराला भाळून पांडवांच्या विरोधात लढायला सिद्ध होतात. काही राजे जुने वैर स्मरून युद्धात सहभागी होतात. जयद्रथासारखे राजे केवळ पूर्ववैमनस्यामुळे कौरवपक्षात सामील होतात. काही राजे तर केवळ स्वत:ला आर्य म्हणून मान्यता मिळावी या हेतूनेच युद्धात सहभागी होतात. याचा अर्थ असा की धर्म-अधर्म, सत्पक्ष असत्पक्ष या गोष्टी दुय्यमच होऊन जातात. प्रत्येकाचे हेतू निराळे असतात. मुख्य म्हणजे स्वत:चे अस्तित्व आणि स्वत:चे संरक्षण महत्त्वाचे असते हेच या युद्धात सामील होणाऱ्या राजांचे धोरण दिसते. धर्म अधर्माची चर्चा ही केवळ देखाव्याची गोष्ट असते. या सर्वच बाबींचे चित्रण लेखकाने अतिशय बारकाईने केले आहे. शिवाय सामील होणाऱ्यांमध्ये जसे आर्य आहेत, त्याप्रमाणेच अनार्यही आहेत याचे भानही त्यांना आहे. त्यातून अनार्यांची संस्कृती आणि लढण्याचे वेगळे तंत्र यांचे चित्रणही लेखक करतो.

युद्धही सत्ताधाऱ्यांशी निगडित असणारी गोष्ट असली तरी ही युद्धात सामान्यांचा सहभागही वेगवेगळ्या पातळ्यांवर असतो. म्हणजे युद्ध होणार असे कळले की काही लोक घरदार सोडून दुसऱ्या राज्यात जाऊन राहतात. तर, कलावंत मंडळी आपल्या कलेला कोठे आश्रय मिळेल ते पाहून स्थलांतर करतात. युद्ध सुरू झाले की कष्टकऱ्यांची केवळ संपत्तीच नाही तर सर्वस्वही राजाच्या मालकीचे होऊन जाते आणि त्यातून सामान्यांचा अपरिमित छळ होतो. या सगळ्यांपेक्षा भयावह गोष्ट म्हणजे लढणाऱ्या सैनिकांच्या मनोरंजनासाठी सापडेल ती स्त्री पकडून युद्धभूमीवर नेली जाते. उपभोग संपला की तिला सोडून दिले जाते. या सगळ्याचा अर्थ असा की, युद्ध नावाची गोष्ट केवळ सत्ताधाऱ्यांशी निगडित राहात नाही तर तिच्यामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उत्पात घडून येतात. माणसांना नीतिमत्ता सांभाळणे अवघड होऊन जाते. मग काही स्वार्थी माणसे मेलेल्या सैनिकांच्या अंगावरील दागदागिने शोधत निघतात... या आणि अशा असंख्य गोष्टींचे चित्रण रवींद्र शोभणे करतात आणि या सगळ्यांमधून ही महाभारताची कथा वास्तवाच्या पातळीवर आणण्याच्या प्रयत्न करताना. महाभारतकथेतील वास्तव शोधण्याचा हा आगळा वेगळा प्रयोग रवींद्र शोभणे यांनी मराठीमध्ये प्रथमत:च केला आहे, किंबहुना या वेगळ्या दृष्टिकोणातच या कादंबरीचे सामर्थ्य साठविलेले आहे असे म्हणावे लागते. असा प्रयोग कन्नडमध्ये सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. एस. एल. भैरप्पा यांनी त्यांच्या 'पर्व' या कादंबरीमध्ये केला आहे. अर्थात 'पर्व' या कादंबरीचा पट 'उत्तरायण' पेक्षा अधिक मोठा आहे.

७०१०

अद्भुताच्या जंजाळातून महाभारत कथेची मुक्तता करणे व सर्व दृष्टीने या कथेला वास्तवाच्या पातळीवर आणणे यातून या कादंबरीचे वेगळेपण व्यक्त होत असले तरी एवढ्यावर एक चांगली कादंबरी उभारणे ही अवघड गोष्ट आहे. एक तर 'महाभारत' मुळातच जटिल आणि गुतागुंतीचे आहे. शिवाय असंख्य व्यक्तिरेखा आणि त्यांच्यातील परस्परसंबंध हेही गुंतागुंतीचे आहेत. परंतु हे सगळे समजून घेऊन रवींद्र शोभणे यांनी असंख्य व्यक्तिरेखा त्यांच्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह उभ्या केल्या आहेत. कितीतरी प्रमुख व्यक्ती आपापल्या स्वभाववैशिष्ट्यांसह येथे उभ्या राहतात. भीष्म, कृपाचार्य, धृतराष्ट्र, गांधारी, दुर्योधन, दुःशासन, द्रोणाचार्य, कर्ण, कृष्ण, कुंती, विदूर, दौपदी आणि पांच पांडव या कादंबरीतील प्रमुख व्यक्ती असल्या तरी विराट, अभिमन्यू, उत्तरा, शकुनी, गंगा, दुर्योधनपुत्र लक्ष्मण आणि कन्या लक्ष्मणा, मेघनाथ, भानुमती, सांब, शल्य, रूक्मरथ, सुशर्मा, सत्यवती, शंतनू, कृष्णद्वैपायन, अंबा, अंबिका, अंबालिका, विचित्रवीर्य, माद्री, वैशंपायन, जैमिनी, परशुराम, विश्वामित्र, संजय, अश्वत्थामा, दाशराज, नहूष, ययाती, महाभीष, विकर्ण, युयुत्सू, स्वयंप्रभा, विकर्ण, वशिष्ठ, अरुंधती, द्यू, इरावान, शारद्वान, शिशुपाल, शीलभद्र, सात्यकी, जयद्रथ अशा कितीतरी व्यक्ती महाभारतकथेत महत्त्वाची भूमिका बजावतात. या प्रत्येकाचे स्वभाववैशिष्ट्य लक्षात घेऊन येथे त्याला व्यक्तिमत्त्व प्रदान करण्याचा प्रयत्न शोभणे यांनी केला आहे. याशिवाय नोकर चाकर, दासदास्या आणि सूतवर्ग यांची संख्याही विपुल आहे. प्रस्तुत कादंबरीत अशा असंख्य व्यक्ती येतात., त्यांच्यातील संबंधही शोभणे यांनी नेमकेपणाने चित्रित केले आहेत. उदा. द्रौपदी आणि तिचे पाच पती यांचे संबंध सारख्याच पातळीवरचे नाहीत. भीम हा द्रौपदीला सर्वार्थीने जवळचा वाटतो तर अर्जुन हा एकाच वेळी तिच्या जवळचा असूनही दूरच राहणारा वाटतो. धर्मराजा, नकुल, सहदेव यांच्याशी असणारे तिचे संबंधही वेगवेगळे असतात. शोभणे यांनी या सर्वाचे भान ठेवले आहे. अशाच प्रकारे इतरही अनेक संबंध चित्रित केले आहेत. धृतराष्ट्र-गांधारी, विदुर-भीष्म, भीष्म-कृष्ण, कृष्ण आणि कुंती, भीष्म आणि कृष्णद्वैपायन, दुर्योधन-भानुमती, सुभद्रा-अर्जुन अशा कितीतरी व्यक्तींचे परस्परसंबंध त्यांच्या त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांसह येथे साकार झाले आहेत. या सगळ्यांमधून या कादंबरीचे 'कादंबरीपण' साकार झाले आहे.

राज्यकर्तावर्ग आणि सामान्य जन यांचे संबंध चित्रित केले नसते तर या कादंबरीत निश्चितच उणीव राहिली असती. म्हणूनच शोभणे यांनी कादंबरीत राज्यकर्त्यावर्गाचे ख्यालीखुशालीचे जगणे, त्याची भोगलोलुपता यांचे जसे चित्रण केले आहे, त्याप्रमाणेच सामान्यांची असहाय्यताही प्रकट केली आहे. एकंदरीत समाजातील राज्यकर्त्यावर्गापासून सामान्य जनापर्यंतचा एक मोठा पट लेखकाने चित्रित केला आहे ही या कादंबरीच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

या सगळ्या वेगळ्या आणि जमेच्या बाजू असल्या तरी आधुनिक काळातील एखादा लेखक 'महाभारता'कडे कां वळतो असा प्रश्न उरतोच. शिवाय भीष्माला केंद्रस्थानी ठेवून ही कादंबरी कां लिहिली गेली? असाही प्रश्न निर्माण होतो. महाभारताचा नायक कोण? अर्जुन, कृष्ण, भीष्म की नियती? असेही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. रूढ आणि पारंपरिक दृष्टीने 'कर्ता आणि करविता' श्रीकृष्ण आहे. भीष्मसुद्धा या कादंबरीत एका ठिकाणी म्हणतो की, भारतवर्षावर आपली प्रभूसत्ता श्रीकृष्णाला निर्माण करावयाची आहे, म्हणून तो पांडवांच्या बाजूने उभा आहे. तरीही भीष्माला कादंबरीच्या केंद्रस्थानी ठेवण्याचा लेखकाचा हेतू काय असावा?

एक तर भीष्म हा पितामह, त्याने त्या काळातील भारतवर्षाच्या पांच पिढ्या पाहिलेल्या आहेत, शिवाय आपण जिवंत असेपर्यंत हस्तिनापूरचे रक्षण करू ही प्रतिज्ञाही त्याने स्वतः होऊन केलेली आहे. त्यामुळे हस्तिनापूरासाठी युद्ध होणार असेल तर भीष्माला महत्त्व येणे स्वाभाविक आहे. परंतु केवळ एवढ्या एकाच हेतूने लेखकाने भीष्माला केंद्रस्थानी आणलेले आहे, असे मात्र वाटत नाही. ही कारणे तर आहेतच, परंतु त्यापेक्षाही एक महत्त्वाचे कारण म्हणजे महाभारत कथेच्या अनुषंगाने मानवी जीवनावर भाष्य करणे हे होय. असे भाष्य तर शोभणे ठिकठिकाणी करतात, परंतु सद्य:स्थितीतील मानवाची विनाशाकडे होणारी वाटचालही शोभणे याना अधोरेखित करावयाची आहे. किंबहुना वर्तमानकालीन हा संदर्भच अनेक ठिकाणी महत्त्वाचा ठरत जातो. कादंबरीला प्राप्त झालेले हे परिमाण निश्चितच महत्त्वाचे आहे आणि यातच कदाचित लेखकाची प्रेरणा सामावलेली असू शकेल.

महाभारतकथा ही पांडवांच्या विजयाबरोबरच प्रचंड विनाशाची आणि विध्वंसाची कथा आहे. धर्म-अधर्म हे सर्वच मुद्दे आपापल्या स्वार्थाप्रमाणे वापरायचे असतात, हेही सांगणारी ही कथा आहे. या विध्वंसाचा, स्वार्थाचा अर्थ लेखकाला द्यायचा आहे. म्हणूनच कथेच्या ओघात लेखकाने जे चिंतन प्रकट केलेले आहे, ते महत्त्वाचे आहे. राजधर्म म्हणजे काय? स्त्रीची प्रतिष्ठा म्हणजे काय? विजय हा अंतिम असतो का? विनाशाशिवाय

विजय प्राप्तच होऊ शकत नाही का? युद्धामध्ये लढणाऱ्या सामान्य सैनिकांना काय मिळणार असते? आज विजयी होणारा उद्या विनाशाच्या खाईत कां लोटला जातो? सूडाचा एकदा पेटलेला अग्नी विझवता येणारच नाही का? सूडाची भावना तरी का निर्माण होते? हे आणि यासारखे असंख्य प्रश्न शोभणे उपस्थित करतात आणि त्यानुषंगाने त्याचे चिंतन प्रकट होत जाते. एका प्रकारे महाभारतासारखे आर्ष काव्य समकालीन करून घेण्याचाच हा प्रयत्न आहे!

या संदर्भात काही ठिकाणचे चिंतन निर्देशिता येऊ शकेल. कादंबरीच्या प्रारंभीच युद्धाचे नगारे वाजायला लागतात आणि भीष्म-कृपाचार्य यासारख्या ज्येष्ठांपुढे धर्मसंकट उभे राहते.. त्यावेळी चर्चा करताना भीष्म राजधर्मावर भाष्य करतो. "आचार्य, अधर्माचा पक्ष कुठला, हे आपण ठरविण्यापेक्षा आपल्यासमोर उभा ठाकलेला आपद्धर्म हाच आपला धर्म आहे, हे जाणून घ्या. राज्यातील प्रत्येक वस्तू राजाच्या मालकीची असते. राजाच्या शब्दाबाहेर जाणे अथवा राजाला स्पष्टपणे विरोध करणे, हाच अधर्म ठरतो आचार्य... धर्ममूलक तत्त्वज्ञान हे परिस्थितीजन्य असते... तुम्ही किंवा मी या राजसत्तेत क:पदार्थ आहोत. साधनीभूत आहोत आचार्य" पुढे कृपाचार्य राजधर्माला कुठलाच अर्थ उरला नाही का? असा प्रश्न विचारतात तेव्हा भीष्म म्हणतो, "... धर्मसत्ताक राज्याचा खरा अर्थ तर आता मातीत मिळालाच आचार्य" (पृ. ५६-५७)

भीष्माचे हे शब्द त्यांच्या भोवतीच्या परिस्थितीसंबंधी जसे आहेत, त्याचप्रमाणे आजच्या राजकीय वास्तवासंबंधीही आहेत. असाच भीष्म जैमिनी संवादही महत्त्वाचा आहे. सामान्य सैन्य कशासाठी लढत आहे? यातून त्यांना काय मिळणार आहे? असे प्रश्न जैमिनी उपस्थित करतात. हे प्रश्न त्याकाळी जसे महत्त्वाचे होते, त्याप्रमाणे आजही महत्त्वाचे आहेत.

युद्धाच्या मागे सत्ताभिलाषा असली तरी राज्यकर्तावर्ग कधी ती उघडपणे प्रकट करीत नाही. मग तो आपल्या अभिलाषेला तात्त्विक आवरणे चढवीत राहतो. दुर्योधन सतत आपण आर्यांसाठी, वंशाच्या शुद्धतेसाठी लढत आहोत अशी भूमिका घेत राहतो. बहुसंख्य राजे त्याच्या या भूमिकेमुळे (आणि स्वत:च्या स्वार्थामुळेही) त्याच्याबरोबर येतात. वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार अंतिमत: विनाशाकडेच नेत असतो, हे सूत्रही येथे आपापत:च सिद्ध होत जाते. त्याबरोबरच कौरवांच्या पक्षापेक्षा आपला पक्ष कोठे वेगळा आहे, हे सांगताना श्रीकृष्ण जी भूमिका मांडतो तीही महत्त्वाचीच आहे. तो म्हणतो, "पितामह, माझ्या व्यक्तिमत्त्वाचं, माझ्या कृतींचं, माझ्या सत्ताकांक्षेचं आणि माझ्या राजनीतीचं आकलन तुमच्याशिवाय आणखी कुणाला होऊ शकेल? कारण या आर्यावर्तातल्या पांच पिढ्या तुम्ही अनुभवल्या आहेत. या युद्धाच्या संदर्भात माझ्या ठायी ज्या महत्त्वाकांक्षा आहेत, त्याच दुर्योधनाच्याही ठायी आहेत. आमच्यात भेद एवढाच की तो आर्यवंशाच्या शुचितेच्या कालबाह्य विचारानं झपाटलेला आहे, तर मी नव्या सर्वसमावेशक समाजनिर्मितीच्या दृष्टीने विचार करू पाहतो आहे. या दृष्टीनं मला माझा विचार अधिक मूलगामी आणि सर्वसंमत वाटतो." (पृ.३९०)

येथे महाभारत कथा काही निराळेच सांगू पाहते. वर्ण श्रेष्ठत्वाचा अहंकार आणि सर्वसमावेशक नवसमाजनिर्मिती यामधील सनातन संघर्ष तर येथे चित्रित होतोच, पण वर्तमानाचे भानही येऊन जाते.

अशाच प्रकारच्या चर्चा कादंबरीशी एकजीव होऊन कादंबरीभर विखुरलेल्या आहेत. या चर्चांमधून युद्ध ही नेहमीच विनाशाकडे नेणारी गोष्ट असते असा एक मानवतावादी अर्थ लेखक सतत ध्वनित करीत जातो. सत्ताकांक्षा माणसाला आंधळी करीत जाते, त्यातून त्याचा चांगल्या वाईटाचा विवेक हरपत जातो आणि या सगळ्यांची परिणती असणाऱ्या युद्धात विनाशाशिवाय हाती काही लागत नाही. अशा वेळी मिळणारा विजयही एखाद्या दु:स्वप्नासारखाच असतो. सूडाची भावना काही संपता संपत नाही. अंतिमत: सारेच निरर्थक ठरत जाते असाच काहीसा सुन्न करून टाकणारा मानवी जीवनासंबंधीचा अर्थ लेखक सूचित करीत जातो. हा सगळाच अर्थ मानवी जीवनाचे सनातन रूप स्पष्ट करणारा जसा आहे, तसा वर्तमानाकडे अंगुलीनिर्देश करणाराही आहे!

कादंबरीचे शेवटचे प्रकरण अतिशय महत्त्वाचे आहे. पांडव विजयी होतात. कौरव निर्वंश होतात याचा निर्देश तर येथे येतोच, परंतु तिकडे कृष्णाच्या राज्यात बंडाळी माजल्याचा आणि कृष्णाला कुणी तरी मारल्याचा उल्लेख येतो... म्हणजे विध्वंसाची परिसीमा झाली आहे. परंतु येथे ही कादंबरी थांबत नाही. शेतात 'कृषक' येऊन येत्या मोसमात नवे पीक घेण्याचा संकल्प करीत आहेत, उत्तरेच्या मुलाने जन्म झाल्याबरोबर डोळे उघडले आहेत, अनेक सूतस्त्रिया गरोदर राहिलेल्या आहेत आणि कुरुक्षेत्रावर कोसळलेल्या पावसाने सारी भूमी न्हाऊन निघाली आहे. ऋतुस्नात व्हावी तशी...

असे हे विनाशातूनच चिवटपणे उभे राहणारे जीवन आहे. मानवी जीवनाचा सनातन अर्थ विनाश आणि निर्मिती एवढाच आहे की काय!

**- नागनाथ कोत्तापल्ले**

# राहिले दूर घर माझे

## शफाअत खान

नाटककार महेश एलकुंचवार आणि सतीश आळेकर या नाटककारांच्या नंतरच्या पिढीतील प्रशांत दळवी, अजित दळवी, संजय पवार, जयंत पवार, प्रेमानंद गज्वी, राजीव नाईक, अभिराम भडकमकर हे काही वैशिष्ट्यपूर्ण नाटककार आहेत. एखाददुसरा अपवाद वगळता, नाटककारांची ही सगळी पिढी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्माला आली आहे आणि सामान्यत: पंच्याहत्तर सालानंतर नाट्यलेखन करू लागलेली आहे. ऐंशीच्या दशकामध्ये आणि त्यानंतरच्या काळामध्ये या नाटककारांचे लेखन







| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **शफाअत खान** |
| **जन्म** | : | २१ नोव्हेंबर १९५२ |
| **साहित्य** | | |
| **नाटके** | : | गर्दीत गर्दीतला |
| | : | मुंबईचे कावळे |
| | : | किस्से-भाग एक |
| | : | किस्से-भाग दोन |
| | : | भूमितीचा फार्स |
| | : | शोभायात्रा |
| | : | राहिले दूर घर माझे |
| **एकांकिका** | : | आणि वशा प्रेमात पडला |
| | : | आमार बंगला सोनार बंगला |
| | : | क |
| | : | म |
| | : | काहूर |
| | : | लव्ह स्टोरी |
| | : | नि:शब्द |
| | : | लोभी राजा आणि शहाणे माकड (मुलांसाठी) |
| **रूपांतरित** | : | पोलिसनामा |
| | : | नागमंडल |

विशेषत्वाने बहरू लागलेले दिसते.

कोणताही नाटककार त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, राजकीय पर्यावरणामध्ये आपले लेखन करीत असतो. स्वाभाविकच एखाद्या नाटककाराचे लेखन अथवा त्याची एखादी नाट्यकृती समजून घ्यावयाची असेल, तिचे आकलन आणि स्वरूपनिर्णयन करावयाचे असेल तर त्या सभोवतालचे हे विविध स्वरूपाचे पर्यावरण समजून घेणे अपरिहार्य ठरते. निदान त्या पर्यावरणाचे भान ठेवणे आवश्यक ठरते. नाटककारासारख्या प्रयोगनिष्ठ आणि पर्यायाने समष्टीनिष्ठ साहित्यप्रकाराच्या बाबतीत तर ही पूर्वअट असावी लागते. त्यातही अगोदर नमूद केलेल्या या नाटककारांचे लेखन ज्या ऐंशीच्या दशकामध्ये विशेषत्वाने आकाराला आले त्या दशकाला काही विशिष्ट घटनांची पार्श्वभूमी लाभलेली आहे. ही पार्श्वभूमी या ठिकाणी सूत्ररूपाने नोंदविणे उचित ठरेल.

सामान्यत: पंच्याहत्तर सालापासून सुरू होणाऱ्या या काळामध्ये किंवा या सालाच्या आसपास जयप्रकाशजींचे आंदोलन, आणीबाणीचे पर्व, नामांतराची चळवळ; दलित आणि सवर्ण यांच्यामध्ये वाढत चाललेली दरी, पुरोगामी चळवळीची होणारी पिछेहाट, भ्रष्टाचाराला सार्वजनिक जीवनामध्ये, विशेषत: मध्यमवर्गाच्या आणि उच्च मध्यमवर्गाच्या जीवनामध्ये मिळत चाललेली प्रतिष्ठा, मूल्यांचा झपाट्याने होणारा ऱ्हास, नीति-अनीतीच्या वेगाने बदलत जाणाऱ्या कल्पना, नंतरच्या काळातील मंडल आयोगाची अंमलबजावणी, सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक पटावरदेखील पुनरुज्जीवनवादी शक्ती विशेषत्वाने कार्यरत झाल्यामुळे सांप्रदायिक विचारांमध्ये होत गेलेली वाढ, अतिरेकी हिंदुत्ववादी धर्मांध शक्तींनी अयोध्येमधील वादग्रस्त ढाचा उद्ध्वस्त केल्यामुळे देशभर उसळलेले धार्मिक, जातीय दंगे, धोक्यात आलेला शतकानुशतकांचा जातीय आणि धार्मिक सलोखा, अल्पसंख्यांक जाती-धर्म-वर्णांच्या लोकांमध्ये वाढत गेलेली असुरक्षिततेची भावना, 'आपली भूमी कोणती', असा प्रश्न पडावा अशी त्यांची संभ्रमित झालेली अवस्था, जणू काही इतिहासाचीच चक्रे उलटी फिरू लागलेली आहेत असे वाटायला लावणारी परिस्थिती आणि या सगळ्या झाकोळामध्ये माणसांचा परस्परांमधील संबंधांवरचा उडालेला विश्वास, माणसामाणसांमधला थांबलेला संवाद; या घटनाप्रसंगांच्या दाबाखाली ऐंशीच्या दशकामधील उपरोक्त नाटककार लेखन करीत आहेत. स्वाभाविकच त्यांच्या एकांकिकामधून, नाटकांमधून या घटनांचे पडसाद, प्रतिक्रिया कधी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे, कधी थेट तर कधी संपूर्ण नव्या नाट्याकारांमध्ये साक्षात् झालेल्या आहेत. नाटककार शफाअत खान हे याच पिढीमधील एक लक्षणीय आणि प्रयोगशील नाटककार आहेत. त्यांच्या लेखनाला ही सगळी पार्श्वभूमी आहेच.

'राहिले दूर घर माझे', या नाटकाच्या पूर्वी शफाअत खान यांनी 'काहूर', 'म', 'क' या एकांकिका 'मुंबईचे कावळे', 'किस्से भाग - एक', 'किस्से - भाग दोन' 'भूमितीचा फार्स' आणि 'शोभायात्रा' ही नाटके लिहिलेली आहेत. या काळातील त्यांच्या या लेखनामधून त्यांनी प्राधान्याने अ-संगतीचा अनुभव साकार केलेला आहे. घटनांकडे, त्यामधील माणसांकडे एका विशिष्ट तिरकस आणि व्यंग्यात्मक दृष्टीने पाहात आणि त्याचप्रमाणे त्यांना नाट्यरूपात साकार करीत एकूणच नाट्यांतर्गत जीवनानुभवावर आपल्या खास तिरकस संवादशैलीत भाष्य करणे हे त्यांच्या या काळातील नाट्यलेखनाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. मात्र, नंतरच्या काळातील बाबरी मशिदीचे उद्ध्वस्तीकरण आणि देशभर पेटलेला जातीय/धार्मिक दंग्यांचा वणवा आणि त्याच्या शफाअत खान यांना प्रत्यक्ष पोहोचलेल्या तीव्र झळा यामुळे नाटककार शफाअत खान यांना जीवनाचे एक नवेच आकलन झाले. नवे आत्मभान आणि जीवनभान आले. जीवनाच्या या नव्या आकलनाचे, भानाचे प्रस्तुतचे 'राहिले दूर...' हे नाट्यरूप आहे. (या नाटकाचा आणि प्रयोगाचा काळ १९९४-९५ साल हा आहे. त्या प्रयोगाचे

> धर्मांध क्रौर्याविरुद्ध सामान्य माणसानेच उभे राहिले पाहिजे. मानवी आत्मभानाने आणि आत्मबळाने आपण त्याच्याविरुद्ध ठामपणे उभे राहिलो तर त्या धर्मांधतेचा पराभव अटळ असतो आणि मानवी आत्मभानाशी संवादी नातेबंध माणसामाणसांमध्ये निर्माण होत असतो. हेच तर माणसाला हवे असते आणि हाच संस्कार, हीच समज हे नाटक देत राहते.
>
> **– एम. पी. पाटील (अनुष्टुभ्, ९७)**

दिग्दर्शन पुरोगामी विचारांचे प्रयोगशील दिग्दर्शक वामन केंद्रे यांनी केले होते, हेदेखील या संदर्भात औचित्यपूर्ण ठरावे.)

असगर वजाहत यांच्या 'जिस लाहौर नही देख्या...' या मूळ हिंदी/उर्दू नाटकावर प्रस्तुतचे नाटक आधारित असले तरीदेखील ते शफाअत खान यांचेच स्वतंत्र नाटक आहे. या नाटकाचा काळ फाळणीनंतरचा १९४७ सालाच्या आसपासचा काळ आहे. पाकिस्तानात आणि भारतात दंगे उसळण्याचा हा काळ आहे. हे संपूर्ण नाटक



पाकिस्तानातल्या लाहोर शहरात घडते. दंगलींमध्ये दोन्ही देशांमधल्या माणसांची वाताहत झालेली आहे. माणसे देशोधडीला लागलेली आहेत. देशाची फाळणी झालेली आहे. भारतातल्या दंगलीत सर्वस्व गमावलेले कोकणातील एक मुसलमान कुटुंब पाकिस्तानातील लाहोरमध्ये निघून आलेले आहे. या शहरामध्ये एक हिंदू बाई जिवंत आहे. नेमकी तिचीच हवेली कस्टोडीयनवाल्यांनी या विस्थापित मुसलमान कुटुंबाला 'अलॉट' केली आहे. मात्र ती हिंदू वृद्धा (माई) स्वत:ची राहती हवेली आणि लाहोरदेखील सोडायला तयार नाही. या वृद्धेची आणि त्या भारतीय मुसलमान कुटुंबाची आणि त्यांच्या माध्यमातून मुळे उखडून टाकलेल्या, स्वत:च्या भूमीतून विस्थापित केलेल्या, अलग पाडल्या जाणाऱ्या, धास्तावलेल्या परंतु अखेरीस जात-धर्म-देश यांच्या पलिकडे जाऊन एकमेकांच्या आश्वासक सोबतीने अतिरेकी हिंसेच्या आणि धर्मांध शक्तींच्या प्रलयंकारासमोर निर्भयपणे उभे राहणाऱ्या माणसांची ही नाट्यकथा आहे.

धर्मांध शक्ती, मग त्या कोणत्याही धर्मांच्या असोत, धर्माचा खरा अर्थ समजून न घेताच, स्वत:च्या राजकीय-सांस्कृतिक-धार्मिक सत्तेच्या स्थैर्यासाठी जनसामान्यांमध्ये द्वेषभावना पेरतात. त्यामधून धार्मिक आणि जातीय दंग्यांचा वणवा पेटतो. त्यामध्ये ज्यांना नवा देश जन्माला आला म्हणजे काय आहे, याचा अर्थही समजत नाही, असे सामान्य जन, श्रमिक, मोलमजुरी करणारे, यंत्रांवर राबणारे लाखो जीव परागंदा होतात, हकनाक मारले जातात. स्वत:च्या भूमीच्या, माणसांच्या, नव्या नातेसंबंधांच्या एकूणातच नव्या जीवनाच्या शोधात निघालेल्या अशा विस्थापित माणसांना परकी भूमीदेखील खऱ्या अर्थाने सामावून घेत नाही. तिथेही ते उपरे मोहाजिरच ठरत असतात. धर्माची निवड व्यक्ती करीत नसते, तो तिला जन्माने मिळालेला असतो. ज्याची आपण निवडच करू शकत नाही अशा निरर्थक धर्मासाठी लढण्यात कोणतेही हशील नाही. नकाशावर सीमा आखून आणि देशाचे विभाजन करून माणसांना अलग करता येत नाही. धर्मांध शक्ती मूलत: डरपोक असतात आणि म्हणूनच त्या झुंडीने आणि कळपाने वावरतात. त्यांच्यासमोर निर्भयपणे उभे राहिल्यास त्यांचे अवसान गळते. इतिहासामध्ये हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. या धर्मांध, पुनरुज्जीवनवादी, प्रतिगामी शक्ती, लेखक, कलावंत, कवी, बुद्धिवंतांना त्यांनी काय लिहायचे, कोणते निर्णय घ्यायचे यांचेही आदेश देत असतात. एक प्रकारचा सांस्कृतिक दहशतवाद निर्माण करीत असतात. प्रसंगी या क्रूर, उद्दाम शक्ती स्वधर्मियांना नवे प्रगतिशील विचार सांगणाऱ्या आदर्शांनाच भ्रष्ट करतात. या सर्व कल्लोळामध्ये संवेदनशील आणि

वैचारिक नाटकांपेक्षा या नाटकाचे यश फार मोठे आहे. 'मराठीमध्ये चांगली नाटके नाहीत,' असा टाहो फोडणाऱ्यांनी, 'जागतिक रंगभूमी कुठच्या कुठे गेली आहे', अशी हाकाटी करणाऱ्यांनी, 'राहिले दूर घर माझे'सारख्या नाटकांचा जरूर विचार करावा.

**- रत्नाकर मतकरी (महाराष्ट्र टाइम्स)**

नाकारलेली, तोडून टाकलेली, तुटलेली, अलग पाडलेली- धास्तावलेली माणसं... पुन: उभी राहतात. जात, धर्म, देशापल्याड जाऊन एकमेकांना जीवापाड जपतात. एकमेकांच्या आधारानं पुन्हा घरं उभी करतात... स्वप्नं बघतात...! आपल्याच घराला चूड लावणाऱ्यांविरुद्ध निर्भयपणे उभी राहतात... त्यांचंच तर हे नाटक आहे!

...शेवटी दुसऱ्याच्या नाटकाचा ताबा बळजबरीने माझ्या पात्रांनी घेतला-त्याची ही गोष्ट आहे. मी त्यांना रोखू शकलो नाही-मी नाटक लिहून काढलं... **आता ते नाटक किती कुणाचं,** त्याची मला चिंता नाही!

**- शफाअत खान**

विवेकी माणसांनी परस्परांमधील नाती, भावबंध दृढ करीत धर्मांधांच्या, हिंसेच्या, प्रतिगामी शक्तींच्या विरोधात निर्भयपणे उभे राहून नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण केला पाहिजे. अन्यथा नव्या पिढीचा सौंदर्यावरचा, मानवी मूल्यांवरचा विश्वास उडेल अशी अनेक आशयसूत्रे मूळ नाट्यानुभवातून विकास पावून आणि मूळ नाट्यानुभवामध्ये अर्थपूर्णरित्या विलीन पावून त्यांनी एकूणच हा नाट्यानुभव- वास्तव, समांतर, व्यामिश्र बनवलेला आहे. या नाट्यानुभवामधील ही आशयसूत्रे लक्षात घेतली म्हणजे त्यांचे वर्तमान जीवनाच्या संदर्भातील समकालीनत्वही प्रत्ययाला येते. मात्र, ज्या भूमीत, ज्या देशात अशा धर्मवेड्या, कृतक देशप्रेमाने ओथंबलेल्या शक्ती कार्यरत असतात, त्या भूमीचे, देशाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय पर्यावरण या आशयसूत्रांनी व्यापलेले असते, हे लक्षात घेतले म्हणजे, या नाट्यानुभवाचे देशकालपरिस्थितीच्यां सीमारेषा ओलांडणारे एकप्रकारचे शाश्वत स्वरूपही प्रत्ययाला येते.

कोणत्याही नाटकामधील व्यक्तिरेखा ह्या त्या नाट्यानुभवामध्ये अर्थपूर्ण कार्य करीत असतात. त्या जितक्या प्रत्ययकारक, मानवी बनतील, असतील तितके त्या नाट्यसंहितेचे (आणि प्रयोगाचेदेखील) नाट्यमूल्य वाढत असते. प्रस्तुतच्या 'राहिले दूर...' या नाटकामधील तन्नो, हमीदा, जावेद, कासीम, माई, नासीर, अलिम या व्यक्तिरेखांची वर्तमान स्थिती ही धास्तावलेली, भेदरलेली आहे. असुरक्षितता, असहाय्यता, कमालीच्या हिंसेमुळे प्रत्ययाला आलेली मृत्यूची विदारकता, या जाणीवांनी ग्रासलेली आहे. त्यांना त्यांचा भविष्यकाळ माहित नाही. मात्र, सुखावह भूतकाळाच्या आधाराने त्या त्यांचा आजचा वर्तमानकाळ सुसह्य करू पाहाताहेत. कासीमचे विस्थापित कुटुंबीय आणि नासीर वारंवार भूतकाळातल्या स्वतःच्या मूळ भूमीमधले माणसांचे मानवीय संबंध, जात, धर्माची बंधने नाकारून ओतप्रोतपणे भरून वाहणारा तिथला जिव्हाळा, स्नेह, तिथले प्रेमसंबंध, तिथल्या निसर्गाचे विविध विभ्रम, तिथल्या माणसांच्या जीवनाला आकार देणाऱ्या, त्यांना सुसंस्कृत बनविणाऱ्या सांस्कृतिक/आध्यात्मिक परंपरा, सण-उत्सव यांच्या आठवणींमध्ये डोकावून पाहताना दिसतात. या रमणीय, सुखद आठवणी जशा त्यांच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत, तशा जवळच्या माणसांच्या खुलेआम झालेल्या कत्तली, लुबाडली गेलेली आयुष्यभराची कमाई, रोजी-रोटी, स्वतःच्या भूमीतून परागंदा होताना जवळच्या माणसांचे तुटलेपण, यांच्या विकल करणाऱ्या आठवणीही या व्यक्तिरेखांच्या नेणिवेत आहेत. रमणीय आठवणी व विकल करणाऱ्या घटना यांनी भारलेला भूतकाळ आणि धास्तावलेला वर्तमानकाळ घेरून राहिल्यामुळे या व्यक्तिरेखा स्वाभाविकच प्रत्ययकारक बनलेल्या आहेत. उस्ताद आणि रझा, या दोन व्यक्तिरेखा स्वतःच्या तथाकथित धर्म-देश-प्रेमाच्या वेडाखातर कोणत्याही थराला जाऊ पाहणाऱ्या झुंडशाहीच्या निदर्शक आहेत. या दोन्ही व्यक्तिरेखा एकाप्रकारे मूलतत्त्ववादाची प्रतीके आहेत. नाट्यांतर्गत अनुभवामधील त्यांच्या कृती, त्यांचे विचार हे सारे त्याचेच द्योतक आहे.

तन्नोची निरागसता, हमीदाचा धास्तावलेल्या आईच्या, पत्नीच्या रूपातील हवेलीतला वावर, स्वतःच्या मुलीची 'शादी' मोडली या जाणिवेने होणारा तिचा उद्रेक, कासीमची कुटुंबप्रमुख म्हणून या परक्या मुलखात आपल्या मुलांना भविष्य असेल काय या जाणिवेने होणारी कासाविशी, माईचे आणि सभोवतालच्या गुंतागुंतीच्या वास्तवाचे आकलन करून घेताना त्याने दाखवलेली समज, जावेदची बालपणापासूनची नाकारले गेल्याची भावना, 'तू अन्य धर्माचा आहेस आणि म्हणून तुला आमच्या इतिहासावर हक्क सांगता येणार नाही', याची त्याला भारतीय मित्रांनी करून दिलेली जाणीव, यामधून

प्रारंभी उफाळून आलेली त्याची बंडखोरी, मूळ भूमीतल्या प्रेयसीच्या आठवणींमध्ये हरवत जाण्याची त्याची वृत्ती, स्वत:ची शायरी सैतानाच्या बाजूने उभे राहण्यासाठी नाही याचे भान असल्यामुळे नव्या शांतीच्या प्रदेशाचा आपण शोध घेतला पाहिजे, याची नासीरला झालेली जाणीव आणि माईंचे वात्सल्य, पराकोटीची हिंसा अनुभवल्यानंतरदेखील स्वत:च्या भूमीत, शहरात, देशात मूळं घट्ट रोवून ठेवण्याची त्यांची असोशी, धर्मातीत होऊन माणसाचा माणूस म्हणून विचार करण्याची त्यांची वृत्ती, तन्नोच्या रूपाने



स्वत:चे श्रेयस्कर ईप्सित सापडल्यानंतर स्वत:ची ती परंपरा तन्नोकडे सोपवून जीवनातील श्रेयसाच्या साखळीचे सातत्य राखण्याची त्यांची कृती, या साऱ्यांमुळेदेखील या व्यक्तिरेखा मानवी बनलेल्या आहेत. या व्यक्तिरेखांमधील बदलत गेलेले परस्परसंबंध, त्यामधून त्यांना जीवनाचे होणारे नवे आकलन, त्यातून त्यांचे आचार-विचार आणि कृती यांच्यामध्ये होत जाणारे बदल लक्षात घेतले म्हणजे, या व्यक्तिरेखा नाट्यानुभवाच्या विकासाबरोबरच विकास पावणाऱ्या आणि उलटपक्षी, नाट्यानुभवाचाही विकास करणाऱ्या परिवर्तनशील, विकसनशील व्यक्तिरेखा आहेत, हे प्रत्ययाला येते. त्याही अर्थाने त्या प्रत्ययकारक आणि मानवी बनलेल्या आहेत. त्यांच्यामधल्या काहीवेळच्या हृद्य परस्परसंबंधांमुळे - माई आणि तन्नोचे संबंध, माई आणि हमीदाचे संबंध, माई आणि कासीमचे संबंध, माई आणि नासीरचे संबंध - या विचारनाट्याला भावनाट्याचेदेखील परिमाण लाभलेले आहे.

प्रस्तुत नाटकाचे हे वैचारिक आणि भावनाट्यात्मक स्वरूप त्याच्या हिंदी/उर्दूमिश्रित मराठी संवादांमधूनदेखील ध्वनित होते. मानवी नाती, धर्माचे खरे आकलन, स्वत:चे आणि भूमीचे संबंध, धर्मांध शक्ती आणि कलावंत यांचे संबंध, झुंडशाहीचा पोकळपणा आणि तिच्यापुढे उभे राहणाऱ्या सामान्यजनांची, नि:शस्त्रांची निर्भयता, आदी बाबींविषयी ठोस विचार या संवादांमधून संक्रमित होतातच परंतु भावनिक प्रसंगांमध्ये या संवादांना काव्यात्मकताही प्राप्त होते. नाटककाराने घटना-प्रसंगाची उभारणी आणि जुळणी, व्यक्तिरेखांचे परस्परसंबंध, त्यांच्यामधील तणावाचे, संघर्षाचे आणि उत्कटतेचे प्रसंग आणि त्यांचे संवाद या सगळ्यामधून या नाटकाच्या वैचारिक आणि भावनाट्याच्या स्वरूपाचा तोल कमालीच्या कलात्मकतेने सांभाळलेला आहे.

या नाट्यसंहितेच्या रचनेची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. लाहोर शहरातील रतनलाल जोहरीची नाटकातील हवेली एक प्रतीक बनलेली आहे. या हवेलीच्या आत एक वास्तव आहे. ते माई आणि कासीम कुटुंबीय यांच्यामधले किंवा त्यांना सोसावे लागणारे वास्तव आहे. हवेलीच्या बाहेरदेखील एक उघडेवाघडे क्रूर आणि हिंसक वास्तव आहे. ते उस्ताद आणि रझा या धर्मगुंडांचे, तर क्वचित् ते अलिमसारख्या दीनवाण्या माणसांचे आहे. हे बाहेरचे कराल वास्तव (अलिम वगळता) हवेलीमध्ये घुसू पाहते आहे. आतले वास्तव बाहेरच्या वास्तवाचा प्रतिकार करीत आहे. या दोन वास्तवांच्या परस्पर संघर्षामधून हा नाट्यानुभव आकाराला आला आहे.

दादीचा एकांत कुणाचीच पडझड होऊ देत नाही. या एकांतात मन:शांती आहे, निवृत्ती आहे आणि निरोपही आहे. पण त्या निरोपाच्या वेळी स्वत:च्या वृत्तीच्या सगळ्या वेली दादीने तन्नोच्या आयुष्यात रुजवलेल्या असतात. साखळी तुटत नाही... दुवे जुळत जातात आणि जीवनाला निर्भयपणे, निर्धाराने, प्रतिष्ठेने पुढे नेतात...

– विजया राजाध्यक्ष (लोकसत्ता)

प्रेक्षकांना मुळापासून हलवण्याचं सामर्थ्य या नाटकात आहे. स्वत:ला हिंदू आणि मुसलमान म्हणवणाऱ्या प्रत्येकाने हे नाटक आवर्जून बघायला हवं.

**– निखिल वागळे (महानगर)**

दोन अंकांमध्ये विभागलेल्या एकूण बारा दृश्यांपैकी प्रत्येक दृश्याचा शेवट एका विशिष्ट उच्चांक बिंदूवर होऊन पुढच्या दृश्याविषयीची उत्कंठा वाढवीत राहतो. नाट्यानुभवामधील संघर्षात्मक ताण, उत्कंठावर्धक आणि नाट्यानुभवाला गतिमान करणारी दृश्यरचना, आणि नाटककाराने तपशिलात दिलेल्या रंगसूचना यांच्यामुळे या नाट्यसंहितेला प्रभावी प्रयोगमूल्यांचे परिमाण लाभलेले आहे. एकाच वेळेस समकालीन आणि देशकालपरिस्थितीच्या मर्यादाही ओलांडणारा शाश्वत नाट्यानुभव, प्रत्ययकारक व्यक्तिरेखा, वैचारिकता आणि भावनाट्यात्मकता यांना तोलून धरणारे संवाद, संहितेला प्रयोगमूल्याचे परिमाण देणारा रचनाबंध आणि या सगळ्या घटकांच्याद्वारे माणसांवर, त्यांच्या जगण्यावर एकूणातच जीवनावर नितांत प्रेम करायला शिकवणारी नाटककाराची मानवतावादी प्रगल्भ जीवनदृष्टी यांच्या अर्थपूर्ण संयोगातून या नाटकाचे रूप सिद्ध झालेले आहे.

**– नीलकंठ कदम**

# हिरोशिमाच्या कविता

## तोगे संकिची

### अनुवाद : निरंजन उजगरे ❖ हिदेआकी इशिदा

निरंजन उजगरे यांच्या 'हिरोशिमाच्या कविता' या कवितांच्या अनुवादसंग्रहाला यावर्षीचा महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार प्राप्त झाला आहे. निरंजन उजगरे हे सत्तरीच्या दशकातील मराठीतील एक महत्त्वाचे कवी. त्यांच्या गाठीशी गेल्या पंचवीस वर्षातल्या कविता-लेखनाचे पाच संग्रह 'नवे घर', १९७७, 'दिनार', १९७९, 'परिच्छेद', १९८७, 'प्रहर', १९९१ आणि 'दिपवा', १९९५ आहेत. मराठीतल्या या स्वतंत्र कविता-लेखनासोबतच एक कादंबरी 'जायंट व्हील', २०००, अनुवादांचे संग्रह आणि काही संपादने अशी







नाव : **निरंजन उजगरे**

जन्म : ६ ऑक्टोबर १९४९

साहित्य

कविता : नवे घर, दिनार, परिच्छेद, प्रहर, दिपवा

अनुवाद : सोविएट भावकविता,
विणू लागली आजी
हिरोशिमाच्या कविता
फाळणीच्या कविता

कादंबरी : जाएंट व्हील

भरीव कामगिरीही आहे. त्यांच्या सर्वच लेखनाचा आजवर गौरव होत आला आहे. पण या घटकेला त्यांच्या अनुवादातल्या कामाकडे विशेष महत्त्वाचे काम म्हणून पहाणे गरजेचे आहे. 'फाळणीच्या कविता', 'सोवियत भावकविता', 'आजी विणू लागली आहे' ही बालकविता आणि आत्ता गौरवप्राप्त 'हिरोशिमाच्या कविता' हे कवितांचे अनुवाद हे निरंजन उजगरे यानी केलेले काम सहज झालेले काम नाही. या सगळ्या अनुवादकामामागे निरंजन उजगरे यांची काही एक भूमिका आहे. आपल्या देशभरातल्या विविध भाषा आणि विविध प्रदेशातले कितीतरी साहित्यिक यांच्याशी जिवंत संपर्क ठेवण्याचा सततचा प्रयत्न निरंजन उजगरे करत आहेत. तशा कामात ते स्वत:ला अधिकाधिक झोकून देत आहेत. भारतीय भाषांतील साहित्य - विशेषत: कविता - यासोबतच विदेशी भाषांतील साहित्यावर त्यांचे पुरेसे लक्ष असल्याचे जाणवते. मराठी साहित्याची श्रीमंती सतत वाढावी हा त्यांचा ध्यास आहे. त्यासाठी त्यानी अनुवादाचा मार्ग स्वीकारला आहे.

परक्या भाषेतील साहित्य आपल्या मातृभाषेत वळवताना अनुवादक हा आपल्या सांस्कृतिक पर्यावरणात एक भाषिक हस्तक्षेप करत असतो. मातृभाषेला काहींशा अपरिचित असलेल्या परक्या भाषेचे सांस्कृतिक धन तो आपल्या भाषेत आणतो. भाषेलाही काही अपरिचित परिमाणे यातून मिळत जातात. अनुवादाचे काम करताना अनुवादकाचा स्वत:चा भाषिक 'रियाज'ही सुरू असतो. त्याने त्याच्याही लेखनात काही नवे उगवण्याची शक्यता निर्माण होते. निरंजन उजगरे यांच्या अनुवादकार्यात या प्रेरणा तर आहेतच. पण आता विशेषत: 'फाळणीच्या कविता' आणि 'हिरोशिमाच्या कविता' या संग्रहात त्यांचे अनुवाद आणखी एक प्रेरणा घेऊन येताना दिसतात. 'हिरोशिमाच्या कविता' हा केवळ सांस्कृतिक

प्रस्तावना

आमचे बाबा परत द्या.
आमची आई परत द्या.
आमचे वृद्ध परत द्या.
आमची मुलं परत द्या!

आमची माणसं परत द्या.
आमचे आम्हालाच परत द्या.

जोवर माणसं माणसं म्हणून जगतायत्
तोवरच त्यांना
चुराडा होऊ न शकणारी शांती परत द्या.

पर्यावरणातला भाषिक हस्तक्षेप नाही. हा हस्तक्षेप भाषिक तर आहेच पण त्याचबरोबर तो राजकीय हस्तक्षेप आहे.

'हिरोशिमाच्या कविता' या संग्रहाच्या आरंभी निरंजन उजगरे यांचे एकपानी मनोगत आहे. त्याच्या शेवटच्या चार ओळी अशा आहेत :

''अण्वस्त्रं बाळगण्याविषयीच्या फाजील गर्वानं फुगून जाण्याच्या ह्या दिवसांत हा संग्रह वाचून, अण्वस्त्र वापरल्यानंतर होणारी माणुसकीची दारूण दशा वाचकाच्या मनावर बिंबावी. हा अनुवाद म्हणजे, अण्वस्त्रविरोधी मानसिकता निर्माण होऊन, अण्वस्त्रविरहित जगाच्या स्वप्नाच्या दृष्टीनं एक लहानसं पाऊल ठरावं, हीच मनोमन इच्छा.''

१९९८ मधील भारतीय उपखंडातल्या - पाकिस्तानसहित - अणुस्फोट चाचण्यानंतर अण्वस्त्रांचा विरोध हा किती महत्त्वाचा राजकीय हस्तक्षेप असू शकतो हे आता २००३च्या आरंभी आपणा सर्वांना जाणवण्यास हरकत नाही. 'फाजील गर्वा'चा रोखही राजकीयच आहे. एका कवीचा हा 'भाषिक' शस्त्रानिशीचा 'राजकीय हस्तक्षेप' गैर तर नाहीच पण खूप आवश्यक आहे.

'हिरोशिमाच्या कवितां'चा जपानी कवी तोगे संकिची याने आपल्या मूळ जपानी कवितासंग्रहाला 'प्रस्तावना' या नावाच्या कवितेनेच आरंभ केला आहे. त्यातल्या या शेवटच्या तीन ओळी :

*''जोवर माणसं माणसं म्हणून जगतायत्*
*तोवरच त्यांना*
*चुराडा होऊ न शकणारी शांती परत द्या.''*

आणि त्याच्या संग्रहाच्या अखेरीस उपसंहारात त्याने म्हटले आहे :

''आमच्या काळात डोकं वर करू लागलेल्या प्रतिगामी शक्तींकडे निर्देश करणं मला भाग आहे. कवितांद्वारे शांतीचा प्रसार करण्याची माझी इच्छा आहे. पण ह्याच प्रयत्नांमुळं मला माझ्या मूलभूत अधिकारांपासून वंचित केलं गेलं आहे. ह्या साहित्यिक कलाकृतीचा परिणाम म्हणून मला नोकरी मिळण्याची शक्यताही जवळजवळ नाहीशी झालीय.''

१९४५ नंतरचा हिरोशिमा नागासाकीतून बाहेर येत असलेला जपान आणि १९९८च्या अणुस्फोट चाचण्यानंतरचा भारतीय उपखंड यात काही समान धागे आहेतच. तोगे संकिची आपल्या शब्दांतून जी

राजकीय कृती करू पाहतोय त्याच जातीची राजकीय कृती निरंजन उजगरे आपल्या अनुवादाच्या भाषिक हस्तक्षेपाने करू पाहात आहेत हे नोंदवायला हवे.

६ ऑगस्ट १९४५च्या सकाळी हिरोशिमावर अणुबॉम्ब कोसळला. तीन लाख माणसांना मरण आले. पुन्हा ९ ऑगस्टला नागासाकीवर. आणखी काही हजारो माणसे मरण पावली. उरलेल्यांच्या वेदनांना जपान आजही विसरलेला नाही. विसाव्या शतकाने ज्यूंचा वंशसंहार पाहिला. ऑशविझच्या छळछावण्या पाहिल्या. थिओदोर अडार्नो (Theodore Adorno) या संस्कृती



समीक्षकाने कळवळून उद्गार काढले. 'ऑशविझ (Auschwitz) नंतर कविता अशक्य आहे.' त्याचा कळवळा आणि तळतळाट खराच होता. पण त्याच काळात आणखी एक जर्मन कवी बर्टोल्ट ब्रेख्त म्हणत होता :

*''दिवस अंधारून येतात तेव्हाही*
*गाणं असेल का?*
*होय, तेव्हाही गाणं असेलच*
*अंधारून आल्या दिवसांविषयीचं.''*

ब्रेख्तही कवीचे सत्यच सांगत होता. तोगे संकिचीच्या 'हिरोशिमाच्या कविता' या अशा त्या 'अंधारून आल्या दिवसांविषयी'च्या आहेत. आपल्या फुलापानापर्वतांच्या कवितांत आणि तशाच हळव्या प्रेमकवितांत आणि निसर्गकवितांत बीभत्स रसाला फार अवकाश दिसत नाही. पण हिरोशिमा-नागासाकीतून मागे राहिलेल्या तोगे संकिचीला तो टाळणे कठीण आणि अशक्य आहे. या संग्रहातल्या अनेक कवितात 'पू', 'जखमा', 'घोंगावणाऱ्या माशा', 'सोललेली चामडी', 'जळलेले केस', 'मेंदूचे तुकडे', 'फुटलेल्या कवट्या' असलेल्या असंख्य प्रतिमा जागोजाग येत रहातात. 'अणुबॉम्बची दृश्यं' ही चित्रमालिका पाहिल्यावर कवीने 'इच्छा' या नावाची एक कविता लिहिली आहे. त्याच्या आरंभीच्या ओळी अशा आहेत :

*''मला ह्या विकृतीसमोर उभं राहू द्या.*
*मला ह्या क्रौर्याचा सामना करू द्या.'' (पान ७२)*

याच संग्रहात 'गोदामातली डायरी' (पान १६ ते १९) अशी एक गद्यसदृश कविता आहे. ही चार पानांची डायरी आपण वाचावी. (खरे तर मी कवितांमधली काही अवतरणेच देतोय ती माझ्या मनाविरुद्ध. आपण हा सगळा संग्रह पूर्ण आणि पुन्हा पुन्हा वाचावा.) त्यातल्या 'पाचवा दिवस' या अवतरणाचा हा काही अंश :

''हातांच्या हलक्या स्पर्शानं देखील तिचे केस निघून येतायत्. पुवाळलेल्या जखमांतून किडे वावरतायत. खाजवताना जमिनीवर पडलेले किडे पुन्हा जखमांत आणि पुवात शिरतायत.'' (पान १८)

दोन तीन वर्षाआधी हिरोशिमा स्मृतिदिनाच्या निमित्ताने मुंबईच्या नेहरू सेंटरमध्ये एक चित्रप्रदर्शन जपानने आयोजित केले होते. ते पाहिल्यावर तिथला कवी याहून वेगळे काही लिहिण्याची शक्यता नाही असेच वाटले होते.

अण्वस्त्रनिर्मितीचे कोणतेही समर्थन हे तकलादूच असते. १९४५ साली तर काही मोजक्याच देशांपाशी अण्वस्त्रे होती. आता तर ती अनेकांपाशी आहेत. आणि ती कोणालाच वापरता येत नाहीत. माणसांच्या श्रमांतून निर्माण होणारी सगळी समृद्धी या अण्वस्त्रांच्या निर्मितीत गोठून आणि नासून चालली आहे. लहानशा चुकीनेही सर्वनाशाचा धोका. अण्वस्त्रांचे विनाशकारी सामर्थ्य आणि त्यांच्या निर्मितीतली मानवी निर्मितीची-साधनसंपत्तीची उधळण याने त्यांचे निरर्थकत्व पुरेसे सिद्ध झाले आहे आणि तरीही हे थांबत नाही. थांबेल हे स्वप्न मात्र पहावेच लागते. कवीसाठी तर असे स्वप्न अग्रक्रमाचे आहे.

हिरोशिमाच्या संहारानंतर माणसाचा विवेक जागा करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला तर्काच्याआधारे बुद्धीला आवाहन करण्याचा. ते काम अनेकांनी केले आहे आणि आजही करीत आहेत. दुसरा मार्ग आहे कलेच्या आधाराने

माणसाला समजुतदार करण्याचा. ललित साहित्य, चित्रपट, नाटक, चित्रे अशा विविध माध्यमांतून हे होत आले आहे आणि होणारही आहे.

तोगे संकिचीच्या जपानी कविता आणि निरंजन उजगरेचा मराठी अनुवाद हे याच वाटेवरचे प्रयत्न आहेत. 'तो दिवस कधी उगवेल?' अशी एक दीर्घ कविता या संग्रहात आहे. (पान ६२ ते ६९) त्यातल्या अशा आशेकडे, भविष्यातल्या सुंदर स्वप्नाकडे पाहायला लावणाऱ्या या काही ओळी :

*''आमच्या हृदयात कोरलेली तुझ्या शरीराची अब्रू*
*लाव्हा आणि ऊर्जेसारखी जमा होईल*
*कुरूप, लोभी महत्त्वाकांक्षेला घाबरून*
*नवीन युद्धाच्या दिशेनं लोटल्या जाणाऱ्या*
*आयाबहिणींच्या आणि बालकांच्या अंतरातून*
*शांतीची आशा बाळगणारी दुर्दम्य शक्ती*
*जनतेच्या संतापाचं प्रतीक बनून*
*स्फोट पावेल,*
*तो दिवस नक्कीच उगवेल.'' (पान ७०)*

'हिरोशिमाच्या कविता' संग्रहात अशा अनेक जागा आहेत. तोगे संकिची त्यांच्या उपसंहारात म्हणतात :

''हिरोशिमाचा कवी असूनही, हा कविता संग्रह पूर्ण करण्यासाठी मला तब्बल सहा वर्षं लागली. ह्या माझ्या आळसाबद्दल मला शरम वाटतेय. माझ्या सामान्य प्रतिभेची मला लाज वाटतेय.''

कवीची ही विनम्रता मान्य आहे. पण लाज तर आम्हालाही आता जवळपास सत्तावन्न वर्षांनंतरही वाटतेय आणि तरीही आम्ही आमच्या साहित्यात अजून तितकेही दिले नाही. निरंजन उजगरे यांनी किमान या अनुवादाने आमच्या भाषेला काहीसे श्रीमंत केले आहे. कवितेच्या आशयाला तर मूळ कवीनेच झुकते माप दिले आहे. निरंजन उजगरे यांच्या अनुवादातही ते तसे असणे अपरिहार्य आहे. पण याबरोबरच कवितेच्या रूपाचे भान त्यानी जागते ठेवले आहे. त्याच्या खुणा संग्रहात अनेक स्थळांवर सापडतात. त्यातल्या फक्त एक-दोनच स्थळांना स्पर्श करतो :

''खेळताना धक्काबुक्की करणाऱ्या मुलांसारखे
शहराच्या एका कोपऱ्यात ढकलले गेलेले तुम्ही
सगळे
एकत्र उभे आहात.'' कबरीवर लावलेली पाटी
(पान ३१)

*''त्या दिवसापासून दूर येऊनही*
*कुठूनही जवळ येणारे हिरोशिमाचे दिवे*
*इतिहासाच्या काळोखात*
*चुपचाप पेटत राहिलेले,*
*हिरोशिमाचे अगणित दिवे.'' रात्र (पान ५३)*

या अनुवादाच्या कामात आणखी एक चांगली गोष्ट झाली आहे. मूळ जपानीचा इंग्रजी अनुवाद हाताशी असतानाही निरंजन उजगरे यांना मदत करण्यासाठी हिदेआकी इशिदा यांचा मदतीचा हात पुढे आला. त्यांना हिंदी भाषा येत होती. त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा करत हा अनुवाद मुळातल्या जपानीजवळ नेण्याची संधी उजगरे यांना मिळाली. तिचाही काही फायदा अनुवादात आहे. मूळ जपानी कवितासंग्रहातील रेखाटणेही अनुवादसंग्रहात वापरता आल्याने संग्रहाचा भेदक आशय अधिक प्रभावी झाला आहे.

**– सतीश काळसेकर**



**तोगे संकिची**

जन्म : १९ फेब्रुवारी १९१७
मृत्यू : १० मार्च १९५३

वाणिज्य शाखेची पदवी, हिरोशिमा गॅस कंपनीत नोकरी, हायकूंचं लेखन, क्षयाचा आजार, ख्रिस्ती धर्माचा स्वीकार, अणुस्फोटाचा आघात, कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश, अणुव्याधीनं आलेलं प्रदीर्घ आजारपण आणि आजारपणात लिहिलेला 'गेनबाकू शिशू' हा अणुस्फोटाच्या कवितांचा संग्रह (पहिली आवृत्ती १९५१)
असा ह्या कवीचा जीवनप्रवास.

सदर संग्रहातील कवितांचं लेखन पूर्ण करून वयाच्या छत्तीसाव्या वर्षी अकाली निधन झालेला हा कवी 'हिरोशिमाचा कवी' म्हणून सर्वमान्य झाला.



**प्रा. हिदेआकी इशिदा**

जन्म : २० सप्टेंबर १९४९

दिल्ली विद्यापीठात हिंदीचे पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर टोकियो येथील दाईतो बुन्का विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली.

आतापर्यंत, जपानी भाषकांसाठी व्यावहारिक हिंदी संभाषण (१९९३), मोहन राकेश ह्यांच्या लघुकथांचा जपानीमध्ये अनुवादित संग्रह (१९८८) आणि निवडक मराठी कथांचा जपानीमध्ये अनुवादित कथासंग्रह (१९९६) हे ग्रंथ प्रकाशित.

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते; संशोधक व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

'ट्रस्ट'मध्ये एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात 'कल्याण केंद्र' सुरू केले आहे.

'ट्रस्ट'च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिक व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तूतूनच केले जाते.

**विश्वस्त मंडळ**

श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे, श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर, श्री. मधू आडेलकर, श्री. श्रीनिवास प्रभू, श्री. रमाकांत कदम, श्री. चंद्रकांत केळकर, श्री. रवी देवगडकर, श्री. प्रमोद निगुडकर.



# महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना २००२
# निवड सल्लागार समिती (भारत)



**मृणाल गोरे**
अध्यक्षा
केशव गोरे स्मारक ट्रस्ट



**दिगंबर पाध्ये**
निमंत्रक, साहित्य पुरस्कार समिती
मराठीचे प्राध्यापक व समीक्षक



**डॉ. विजया राजाध्यक्ष**
प्राध्यापिका, मराठी विभाग प्रमुख
एस्.एन्.डी.टी. विद्यापीठ (निवृत्त)
प्रख्यात कथालेखिका व समीक्षक



**नागनाथ कोत्तापल्ले**
मराठी विभाग प्रमुख,
पुणे विद्यापीठ
कथाकार आणि समीक्षक



**नारायण सुर्वे**
प्रख्यात कवी



**वसंत आबाजी डहाके**
मराठीचे (निवृत्त) प्राध्यापक
कवी आणि समीक्षक



**सतीश काळसेकर**
अनियतकालिकांच्या चळवळीतील
कवी व कार्यकर्ते



**डॉ. सुधीर पानसे**
पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक
संशोधक व लेखक



**वामन केंद्रे**
प्रख्यात नाट्यदिग्दर्शक
एन्.एस्.डी.च्या
कार्यकारिणीचे सदस्य

## महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा

*- दिलीप वि. चित्रे*

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली दोन दशके करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे. अशा रीतीने आजपर्यंत भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ऐंशी लक्ष डॉलर्सच्या देणग्या दिल्या आहेत.

Invest in future
of those
with no future...
So they can reinvest

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू केली आहे.

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका) २००२



**सुनील देशमुख**



**दिलीप वि. चित्रे**

वास्तुविशारद, 'हिमगंध' हा कवितासंग्रह, 'ऐल तीरावर' व 'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची गुहा' हे दोन अंकी नाटक. 'कुंपणापलीकडले शेत' या प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक.



**संध्या कर्णिक**

'दिवा कुणाचा तेवत राही' हा ललित लेखसंग्रह, 'साधना', 'स्त्री', 'एकता,' 'नवयुग' इत्यादी नियतकालिकांतून कथा, कविता प्रसिद्ध. फिलाडेल्फियात सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सहभाग



**राजन गडकरी**

'लीझार्ट' या वित्तसंस्थेत अर्थविश्लेषक, ललित व वैचारिक साहित्यात मनापासून रस.



**विद्युल्लेखा अकलूजकर**

प्राध्यापिका, 'मेरा जूता है जपानी', आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च' ही दोन पुस्तके. मराठीत कविता व ललित निबंधलेखन, इंग्रजी व हिंदी कथा-कवितांचे मराठी अनुवाद.

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही १९७८ साली अमेरिकेत स्थापन झालेली संस्था आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या हलक्या करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याच्या निर्धाराने निवडक ध्येयवादी संस्थांतर्फे गरजवंतांना आर्थिक व श्रमदानाची मदत 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गेली दोन दशके करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेटिकट्, यू. एस. ए. ह्यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे.

# मराठी साहित्य पुरस्कार योजना

तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली. ही सामाजिक प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू राहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

या योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

## महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपयांचा एक गौरव पुरस्कार.

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

### ललित साहित्यिकांच्या संदर्भात

ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त होते.

ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले जाते.

ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वत्रिक मानवी मूल्यांचा आविष्कार होतो.

ज्यांच्या साहित्यातून मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

### वैचारिक साहित्यिकांच्या संदर्भात

इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे.

त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी नि:स्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.

ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.

मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे

अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

## विशेष पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रातील एखाद्या विभागातील विशेष कामगिरीबद्दल एका व्यक्तीस रु. ५०,०००/- व मानचिन्ह असा एक विशेष पुरस्कार दिला जातो.

## वैचारिक नियतकालिकांसाठी पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व वैचारिक जागृती या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एका नियतकालिकाला

रुपये ५०,०००/- व मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात येतो.

**यासाठी**

जी नियतकालिके पूर्णपणे वैचारिक असतील. (ललित साहित्य प्रकाशित करीत नसतील.)

जी तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या विशेष क्षेत्रांना वाहिलेली असतील.

जी शास्त्रीय दृष्टीने नि:स्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.

ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल वा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.

ज्या नियतकालिकांच्याद्वारा महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित विचारवंतांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील.

अशा नियतकालिकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जातो. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील 'अंतिम निवड समिती' अशा नियतकालिकाची निवड करीत असते.

**ग्रंथांसाठी पुरस्कार**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून सहा मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,०००/- व मानचिन्ह असे सहा 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' दिले जातात. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या तीन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जातो. यामध्ये संपादित भाषांतरित ग्रंथांचाही विचार केला जातो.

गौरव पुरस्कार, विशेष पुरस्कार आणि ग्रंथ पुरस्कार यासाठी महाराष्ट्रातील २०० विचारवंत व सुजाण वाचक यांच्याकडून शिफारशी मागविण्यात येतात.

या शिफारशी विचारात घेऊन 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व्यक्ती व ग्रंथ यांची शिफारस करीत असते. व अमेरिकेतील अंतिम निवड समितीकडून पुरस्कारांसाठी व्यक्ती व ग्रंथ यांची निवड केली जाते.

**कृष्णनाथ नेवरेकर**
कार्यकारी विश्वस्त
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड, मुंबई - ४०० ०६२
दूरध्वनी : ८७२ ४१२३



# सुनील देशमुख

श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी. केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम. एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे. डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरु केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजसेवा पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
1300, Rocrimmon Road,
Stamford, C T 06903
**U.S.A.**
Tel. : 203-322-0548
Fax : 203-322-1936
e-mail : sunild@aol.com

# महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कारांचे मानकरी

### गौरव पुरस्कार

| | |
|---|---|
| नारायण सुर्वे | १९९४ |
| मेघःशाम पुंडलिक रेगे | १९९४ |
| मालतीताई बेडेकर | १९९५ |
| य. दि. फडके | १९९५ |
| श्रीपाद नारायण पेंडसे | १९९६ |
| विष्णू भिकाजी कोलते | १९९६ |
| गो. वि. तथा विंदा करंदीकर | १९९७ |
| वसंत पळशीकर | १९९७ |
| विजय तेंडुलकर | १९९८ |
| रा. भा. पाटणकर | १९९८ |
| पु. ल. देशपांडे | १९९९ |
| रा. चिं. ढेरे | २००० |
| भालचंद्र नेमाडे | २००१ |
| ग. प्र. प्रधान | २००२ |

### विशेष पुरस्कार

| | |
|---|---|
| भा. रा. भागवत / बालसाहित्य | १९९६ |
| उमा कुलकर्णी / भाषांतर | १९९७ |
| बाबुराव बागूल / दलित साहित्य | १९९८ |
| वसंत दावतर / मराठी भाषा, संशोधन व समीक्षा | १९९९ |
| रा. वि. सोवनी / मराठीतून विज्ञानप्रसार | २००० |
| गंगाधर मोरजे / लोकसाहित्य | २००१ |
| दत्ता भगत / दलित साहित्य | २००२ |
| केशव मेश्राम | २००२ |

### प्रकाशन संस्था

| | |
|---|---|
| पॉप्युलर प्रकाशन, मुंबई | १९९४ |
| कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे | १९९५ |
| देशमुख आणि कंपनी, पुणे | १९९६ |
| मौज प्रकाशन गृह, मुंबई | १९९७ |
| साधना प्रकाशन, पुणे | १९९८ |

### वैचारिक नियतकालिके

| | |
|---|---|
| नवभारत, वाई | १९९४ |
| आजचा सुधारक, नागपूर | १९९४ |
| मराठी संशोधन पत्रिका, मुंबई | १९९४ |
| समाज प्रबोधन पत्रिका, पुणे | १९९५ |
| भाषा आणि जीवन, पुणे | १९९५ |
| विचारशलाका, लातूर | १९९५ |
| अर्थसंवाद, कोल्हापूर | १९९६ |
| संशोधक, धुळे | १९९६ |
| पंचधारा, हैद्राबाद | १९९७ |
| परिसर-वार्ता, पुणे | १९९७ |
| मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई | १९९८ |
| पुरोगामी सत्यशोधक, पुणे | १९९८ |
| ताज (Thinkers' Academy Journal), मुंबई | १९९९ |
| सृष्टिज्ञान, पुणे | २००० |
| बायजा, पुणे | २००१ |

### ग्रंथ / ललित

| | |
|---|---|
| ताम्रपट / रंगनाथ पठारे | १९९४ |
| दिवसेंदिवस / अनुराधा पाटील | १९९४ |
| भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा / भाऊ पाध्ये | १९९४ |
| उद्काचिया आर्ती / मिलिंद बोकील | १९९५ |
| वनवास / प्रकाश नारायण संत | १९९६ |
| एकूण कविता : दोन / दिलीप पुरुषोत्तम चित्रे | १९९६ |
| युगान्त / महेश एलकुंचवार | १९९७ |
| कार्यरत / अनिल अवचट | १९९८ |
| शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र | १९९८ |
| अधांतर / जयंत पवार | १९९९ |
| कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर | १९९९ |
| तणकट / राजन गवस | २००० |
| आतंक / विलास सारंग | २००० |
| कोरडी भिक्षा / श्रीनिवास कुलकर्णी | २००१ |
| तिची कहाणी / ना. धों. महानोर | २००१ |
| गल्ली बदललेला मोर्चा / राम दोतोंडे | २००१ |
| मन्वंतर / दीनानाथ मनोहर | २००१ |
| तिरिछ आणि इतर कथा / अनु. जयप्रकाश सावंत | २००१ |
| उत्तरायण / रवींद्र शोभणे | २००२ |
| हिरोशिमाच्या कविता / अनु : निरंजन उजगरे | २००२ |
| राहिले दूर घर माझे / शफाअत खान | २००२ |

### ग्रंथ / वैचारिक

| | |
|---|---|
| आस्तिक शिरोमणी चार्वाक / आ. ह. साळुंखे | १९९४ |
| आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी / गो. म. कुलकर्णी | १९९५ |
| हिंदु-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद / रावसाहेब कसबे | १९९५ |
| समाजपरिवर्तनाच्या दिशा / जनार्दन वाघमारे | १९९६ |
| जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड | १९९६ |
| नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत / गोपाळ राणे | १९९७ |
| तुकाराम दर्शन / सदानंद मोरे | १९९७ |
| नारायण मेघाजी लोखंडे / मनोहर कदम | १९९७ |
| आंबेडकर / नलिनी पंडित | १९९८ |
| साहित्यविवेक / म. द. हातकणंगलेकर | १९९८ |
| काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे | १९९९ |
| दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी | १९९९ |
| ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना / संपादक : विलास खोले | १९९९ |
| शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य / स. रा. गाडगीळ | २००० |
| नवरात्र / अशोक चौसाळकर | २००० |
| कर्मयोगी संन्यासी / नरेंद्र चपळगावकर | २००० |
| मार्क्सचा मानव विचार / मुरलीधर पवार | २००१ |
| प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती / म. अ. मेहेंदळे | २००२ |
| वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट / जया दडकर | २००२ |

### ग्रंथ / अ-पारंपरिक

| | |
|---|---|
| जिहाद / हुसेन जमादार | १९९४ |
| आक्रोश / भीमराव गस्ती | १९९५ |
| दशक्रिया / बाबा भांड | १९९६ |
| लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर | १९९७ |
| विमुक्तायन / लक्ष्मण माने | १९९८ |

## महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार स्वीकारताना डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केलेले भाषण ३० डिसेंबर २००२



ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष माझे फर्ग्युसनमध्ये चारही वर्षे गुरुवर्य असलेले प्रधानमास्तर, महाराष्ट्र फाउण्डेशनचे रा. सुनील देशमुख, माझे अत्यंत आवडते नट रा. मोहन आगाशे, माझे सर्व सहकारी लेखक आणि पुणे शहर, ज्याच्यावर मी मनापासून प्रेम आणि मनापासून राग व्यक्त करत असतो, त्या पुणे शहरातले नागरिक, इतर मराठी प्रेमी आणि साहित्यप्रेमी मित्र हो,

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या गौरव पुरस्कारासाठी माझी निवड करणाऱ्या सगळ्या वाचकांची आणि निवड समित्यांवरच्या सभासदांची मी इथे कृतज्ञतापूर्वक आठवण करतो. रा. सुनील देशमुख आणि महाराष्ट्र फाउण्डेशन तसेच रा. दिगंबर पाध्ये आणि केशव गोरे स्मारक ट्रस्ट यांचेही मी इथे प्रत्यक्ष आभार मानतो. ह्या सर्वांनी माझ्या साहित्यावर केलेला लोभ आणि या गौरव पुरस्कारासाठी लावलेल्या कसोट्या दोन्ही गोष्टी मला अंतर्मुख करून गेल्या. 'ज्यांच्या साहित्यात मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक अशा सार्वकालीन मूल्यांचा आविष्कार दिसतो, जे नि:स्पृहवृत्तीने, निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतात आणि मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरते.' अशा या अतिशय कठीण कसोट्यांना आपण पात्र ठरावं, यामुळे माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं आहे. इथे हे "मूठभर मांस चढलं आहे" हे खोडून त्याला आधुनिक पर्याय म्हणून "कमी झालंय" असा

प्रयत्न केला आहे. हा वाक्प्रचार ज्या काळात रूढ होता त्या काळात मराठी लोक अतिशय सडपातळ आणि चपळ असावेत. हा वाक्प्रचार आता कालबाह्य झाला आहे.

मित्रहो, मराठीचा माझा पात्रतेच्याबाबतीत संबंध म्हटला तर, अजूनही बऱ्याच गोष्टी त्यात येतील: ज्याच्यात मी मराठीचा अतिशय कट्टर पुरस्कर्ता आहे हेही असेल आणि व्यवहारातही मराठीचा कट्टर पुरस्कर्ता आहे हेही असेल, अशाही कसोट्या लावल्या असत्या तर मी त्याला पुरलो असतो. तुमची मुलं मराठी माध्यमातच शिकतात काय? या कसोटीलाही मी पात्र ठरलो असतो आणि एकूणच मराठीसाठी मी सतत काहीतरी करत आलो आहे, या गोष्टीची मला धन्यता वाटते.

खरं तर पात्रता आणि मान्यता या दोन्हीही गोष्टी वस्तुनिष्ठ आणि परस्परांसाठी तयार झालेल्या असल्या तरी पात्रता ही वैयक्तिक आणि मान्यता ही सामाजिक बाब असते आणि त्यांच्यात प्रचंड सत्ताशास्त्रीय असा झगडा चाललेला असतो. म्हणजे आपल्यात पात्रता आहे तरीसुद्धा आपल्याला मान्यता मिळत नाही, असं सगळ्यांनाच वाटत असतं. त्याचप्रमाणे दुसरा सत्ताशास्त्रीय संघर्ष म्हणजे आपल्याला मान्यता मिळाली आहे पण आपल्यात पात्रता नाही असा एक झगडा — एक समाजशास्त्रीय झगडा म्हणून साहित्याच्या इतिहासात नेहमी म्हटला जातो. आपले सर्वांचे कवीकुलगुरु मिर्झा गालिब यांनीही आपल्या प्रेयसीबद्दल सूफी शैलीत असं म्हटलं आहे त्यातला जो संबंध आहे तोच मान्यतेचा आणि लेखकाचा असतो, असं मला वाटतं. ते म्हणतात 'नुक्ताची है गमे दिल' या गझलाद्वारे :

*मैं बुलाता तो हूँ उसको मगर ऐ जज्ब-ए-दिल*

म्हणजे मी तर बोलावतोच आहे, ती तर माझी भावनाच आहे, तिला उद्देशून मी म्हणतोच आहे पण खरी गोष्ट पुढे आहे की

उसपे बन जाए कुछ ऐसी के बिन आये न बने

पण असाच तिच्यावर काही प्रसंग यावा की तिनं स्वत:च येऊन मला भेटावं. हे सगळ्यात चांगलं असतं. मान्यतेच्या बाबतीतही मला असंच वाटतं. आपल्याला ती मिळावी असं आपल्याला सारखं वाटतंच असतं. पण तिच्यावरच असा काही कठीण प्रसंग यावा की ती आपल्याला आपोआपच मिळेल. तीन पिढ्यांच्या वाचकांच्या मान्यतेचा आणि माझा असा हा जो गुप्तसंबंध आहे तो असा आज चव्हाट्यावर येत आहे. हे मी अगदी खरी गोष्ट आहे म्हणून सांगतो. कारण, 'कोसला' ह्या नावाची तीन घरं आहेत म्हणजे मोठमोठे असे बंगले, एक कोल्हापुरात आहे, एक नांदेडला आहे आणि एक मालेगावला आहे, 'बिढार' नावाचीही दोन घरं आहेत. ही परिस्थिती चालू राहिली तर मला स्वत:ला माझ्या घराचं नाव ठेवायला माझी एखादी कादंबरी उरेल की नाही, याची शंका आहे.

वाचकांनी मोठ्या प्रमाणावर माझ्यावर प्रेम केलं आहे आणि मी नेहमी त्यांचा ऋणी असतो. त्यांची परतफेड आपण कधी करू शकू की नाही हेही मला बऱ्याचदा सुचत नाही. खरंतर मी धडधड धडधड असा लिहिणारा, कोसळत लिहिणारा असा लेखक आहे आणि या अशा लिहिण्याच्या प्रक्रियेत वाचकांना गोंजारायला मला वेळही मिळत नाही. उलट, मराठी माणसांच्या वृत्ती, स्वभाव, तत्त्वप्रणाली, जातीवाद ह्यांना मी धारेवर धरत असतो. अधूनमधून माजलेल्या प्रवृत्तींना नांगीही मारत असतो. परंतु हे सगळे आपल्याशी काहीतरी अज्ञात संबंधांनी जोडलेले आहे, ही सगळी पात्रं, प्रवृत्ती आपली लेकरंच आहेत ही जाणीव झाल्याशिवाय मला लिहिणं शक्यच होत नाही. संपूर्ण चेतनेनं लिहिणं हे मी अगदी पहिल्या कलाकृतीपासून करत आलो. ही वाचकांचा आदर करणं वाचकांना अदब करण्याची माझी रीत आहे. आपण वाचकांना थोडंसंच देतो. कधी तरी देतो, कधी दहा वर्षांनी पंधरा वर्षांनी आतातर तीस वर्षांनी मी देणार आहे — ते तरी निदान चांगलं द्यावं अशी मी सारखी धडपड करत असतो. त्यांना आपण कधीतरी देणार ते तरी निदान चांगलं देता आलं पाहिजे आणि त्यासाठी मी अपरंपार कष्टही घेत असतो.

वाचकांना ही माझी धडपड कळली इथेच कुठेतरी वाचक आणि लेखक यांच्यात अदृश्य स्वरूपात संथपणे धीमे धीमे होत असलेल्या चिरंतन अशा मूल्य प्रस्थापनेचा संबंध येतो. की हे लेखक लेखन करतात ते कोणाच्या बळावर? तुकारामासारख्या लोकांना हे सोपं होतं की ते म्हणत माझा जो काही कर्ता करविता आहे तो परमेश्वरच आहे, विठ्ठलच आहे. आज मला ते काही म्हणता येत नाही. पण, आज ह्या शक्तीची उर्जा येते कुठून? याचा मी अंतर्मुख होऊन मघाशी म्हणालो तसा विचार करतो. वाचकच लेखकाला घडवत असतात, असंही मी तीन महिन्यांपूर्वी एका भाषणात म्हणालो होतो. लेखकाला लहान करणं किंवा मोठं करणं हे वाचकांच्या हातात असतं किंवा त्याला पूर्ण विस्मृतीत गाडून टाकणं हेदेखील वाचकच करत असतात. दर वीस वर्षांनी नव्यानं येणारी पिढी, जुने लेखक बाद करून टाकते आणि अभिरुचीच्या झेंड्यासारखे नवे

लेखक उभारत जाते.

बदलत्या युगाचे संदर्भ वाचकांकडून लेखकाकडे एका अद्‌भुत अशा आंतरिक शक्तीनं प्रक्षेपित होत असतात. ही शक्ती कोणती? गेली चाळीस वर्षं लिहित असूनही समाजाच्या अंत:स्तरातून लेखकाला सतत उर्जा पुरविणाऱ्या या शक्तीबद्दल मला अचूक असं तार्किक विधान करता येणार नाही. आपल्या आध्यात्मिक परंपरेत बुद्धीच्या अनेक कोटी मानलेल्या आहेत. त्यातली एक प्रज्ञा असते की ती आत्ता जे काही घडतंय ते जाणवून देते किंवा Information Technology मध्ये फार तर बुद्धी कामा येते पण, आपले लोक अजून दुसऱ्या अनेक प्रकारच्या बुद्धी वापरायचे, त्यात मेधा नावाची एक बुद्धी असे जी समाजातल्या खोल अशा गोष्टींचे आकलन घडवून आणते. तुर्या नावाची बुद्धी दुसऱ्यांना कळणार नाही अशी गुप्त गोष्टसुद्धा ती ज्याला वश आहे त्याला समजावून देते. आपल्या ज्ञानेश्वरांबद्दल एक आरती आहे एका जनार्दन नावाच्या माणसाने लिहिलेली –

*'प्रकट गुह्य बोले, विश्व ब्रह्मचि केले'*

गुह्य ज्ञानेश्वर प्रकट बोलला, हे कुठल्यातरी तुर्या नावाच्या शक्तीशिवाय शक्य होत नाही. हे इतरांना कळलं नाही पण त्याला कळलं, कारण त्याच्याजवळ तुर्या नावाची शक्ती होती. अशा समाजमनातलं गुह्य प्रकट करणाऱ्या शक्ती समाजातल्या अंत:स्तरातल्या जाणीवा व्यक्तीतही निर्माण करतात. भूत, वर्तमान आणि भविष्याच्या मीती यावेळी काम करू लागतात. आपल्या संस्कृतीतले वेगवेगळ्या चिन्हांनी समाजाचे, माणसांचे, वृत्तींचे, मागचे-पुढचे, आतले-बाहेरचे, दडपून टाकलेले किंवा नाहीसे केलेले असे सर्व साचे अशावेळी उघडतात.

आता मी आपल्यासमोर एक उदाहरण देऊ इच्छितो. माझ्या एका पुढच्या कादंबरीत मराठी स्वराज्य सुरू झाले, शहाजी, शिवाजी, संभाजी, पेशवे आणि नंतर ते संपलं, यांच्यावर एक प्रकरण आहे. हे प्रकरण मी कसं लिहिलं हे आपल्यासमोर थोडक्यात सांगतो. मी मघाशी म्हणालो त्याप्रमाणे अशा काही शक्ती असतात की ज्याच्यामुळे हे सुचत जातं. आणि मग ते आपण जमा करत जातो. मी औरंगाबादला एक घर भाड्याने घेतलं. त्यावेळी त्या घरासमोर उंच बुरुजासारखा एक काहीतरी भाग होता. सगळ्यांनी सांगितलं की, तो पाडून त्याजागी बसायला ओटा वगैरे बांधा. तुम्हाला जे हवं ते करून घेत चला, असं मालकांनी सांगितलंच होतं. ते काम बहुतेक त्यांच्या हातून होत नसल्यामुळे मला दिलं होतं. मी मग बराच खर्च वगैरे करून, त्यात डायनामाईट लावला पण तो बुरुज काही ढासळत नव्हता. लोक म्हणाले, अरे ही 'नहरे-अंबरी' मलीक अंबराच्या काळापासूनची पाणी पुरवठ्याची व्यवस्था आहे. ती कधी फुटत नाही.

मी अहमदनगरला असताना दोन महिने एका घोड्याच्या पागेत राहत होतो. ती पागा आजच्या अतिशय आलिशान माणसाच्या घरापेक्षाही सुंदर होती. सुंदर प्रतीचे घोडेच तिथे राहात असतील. सदाशिव अमरापूरकर हे एकदा मला भेटले. ते या मलीक अंबरची इतिहासप्रसिद्ध कबर असलेल्या मूळ अंबरापूर गावचे. इथे विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ फूका जे म्हणतो की Documents आणि Monuments यांच्यातून इतिहास घडतो. तसं हा आपलाच इतिहास मी मॉन्युमेंटसमधून स्वत: जुळवत गेलो आणि हळूहळू असं लक्षात आलं की तो रयतवारी पद्धतीचा शोध लावून अजरामर झालेला मलीक अंबर कोण होता? मूळचा इथियोपिया मधला हा आफ्रिकी मुलगा आठ वर्षांचा असतांना गुलाम म्हणून बगदादला विकला गेला. तिथून तो अहमदनगरला गुलाम म्हणून विकला. ह्या हबशी शिपायानं फक्त दहा शिपायांबरोबर स्वत:चं सैन्य उभारलं. शहाजी वगैरे इथले लढवय्ये तयार केले. गमिनी कावा शोधला. अत्यंत दूरदृष्टीचा आणि अफलातून असा तो राज्यकर्ता होता. महाराष्ट्रातल्या प्रत्येक खेड्यात त्यानं रयतवारी पद्धत लावून जमिनीची मोजणी केली.

प्रत्येक खेड्यात पाटील आणि कुलकर्णी ही दोन वतनं एकमेकांवर वचक ठेवण्यासाठी निर्माण केली. आपल्या समाजाचं त्याला अतिशय खोल ज्ञान असलं पाहिजे की पाटील आणि कुलकर्णी प्रत्येक गावात असलेच पाहिजेत. त्याच्याशिवाय गाव चालणार नाही. मार्क्सचं जसं एक डायलेक्टिक्स होतं तसं हे मलीक अंबरचं मराठी डायलेक्टिक्स महाराष्ट्राच्या गाभ्यापर्यंत पोहोचतं.

अशा पद्धतीचा हा थोर पुरुष याच्याबद्दल काही वाचलं पाहिजे म्हणून मग मी सोळाव्या शतकातले कागदपत्र वाचले तेव्हा, असं लक्षात आलं की हा अत्यंत दूरदृष्टीचा आणि अफलातून असा माणूस होता. आजच्या भूम परांड्यापासून म्हणजे लातूर पासून ते चौल म्हणजे अलिबागपर्यंत अहमदनगरची निजामशाही त्यानं सांभाळली. बलाढ्य अशा मोगलांपासून सांभाळलं. एवढंच नाही तर मलीक अंबरनं धर्मनिरपेक्ष न्यायव्यवस्था स्थापन केली हे कऱ्हाडच्या जगदाळे प्रकरणावरुन सुप्रसिद्ध आहे. त्यानं मोगलांच्या विरुद्ध मराठा अशी एक फळी उभी केली, आणि महसूलाची आणि रयतवारीची पद्धत सुरू केली जी शेतकऱ्यांच्या बाजूची होती. तीच

पुढे शिवाजीनं चालवली आणि तीच पुढे इंग्रजांनी चालवली, आजही तीच चालली आहे. एवढ्या अफलातून माणसाचं आज महाराष्ट्रात कुठे काही चित्र आहे? परवा अहमदनगरला गेलो, मला असं वाटलं इथे मोठा मलिकअंबरचा पुतळा असला पाहिजे. इथियोपियातल्या ह्या हबशी माणसानं एवढे कष्ट केले, एवढी कृतघ्न आपण मराठी माणसं आहोत की काय? आता हे जे मी सांगतो ते थोडंसं कादंबरीतलं. थोडंसं इतिहासातलं, थोडंसं कथाचरित्रातलं असं यातून तयार होतं आणि मग शेवटी आपल्याला कुठेतरी मूल्यं, जी तयार होतात त्याचा असा तपास लागू शकतो. त्याचं एक उदाहरण म्हणून मी आपल्यासमोर सांगितलं. कारण मराठा शक्ती मलिकअंबरने स्थापन केली. याबाबतीत माझं दुमत नाही. आणि हे मी वारंवार वाचून पाहिलं आहे. कारण तुम्हाला माहिती आहे खंडागळेचा हत्ती लखूजी जाधवाच्या गोटात शिरला, त्यानं खूप लोक तुडवले, मारामाऱ्या झाल्या, लखूजीचा मुलगा मेला; तिकडे त्यामुळे शहाजी आणि लखूजी चिडले. भोसले संभाजी त्यात मारला गेला. नंतर पुन्हा संघर्ष इतका वाढला की बुरहान निजामशहाही हताश झाला आणि हे मराठे आपसात का भांडतात, असं मोठ्या प्रमाणावर त्यावेळी चिंतन केल्यानं मलिकअंबरनी ही शक्ती जमा केली. आणि आज आपण ज्याला स्वतंत्र मराठा साम्राज्य म्हणतो, त्याची बीजं आपल्याला या अशा परदेशी माणसात दिसतात. म्हणजे एका दृष्टीने मलिकअंबर त्या काळचा एन.आय.आर. च म्हटला पाहिले.

आज लोक आंतरराष्ट्रीय सहकार्याचं बोलतात. इथिओपियाचा माणूस एकदा इकडे आला आणि नगरला त्यानं मलीक अंबरचं स्मारक पाहिलं तर आपल्या देशाचं केवढं मोठेपण त्याला जाणवेल?

पण कुठेतरी आपल्याकडे इतिहास पुसून टाकण्याची, डॉक्यूमेंट्स नष्ट करण्याची, मॉन्युमेंट्स न वाचण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. आपण जे काही घालवून बसलो, त्याची नोंद केली पाहिजे. त्याबद्दल मी आपल्याला थोडं सांगू इच्छितो की, या एका उदाहरणामधून आपल्याला एकूण आजच्या आपल्या सगळ्या संस्कृतीची कल्पना येते. परंतु जसं म्हणतात, नक्षीचा एक तुकडा जरी सापडला साडीच्या पदरातला तरी सबंध नक्षी आपल्याला पुन्हा बांधता येते. कारण ती सारखी चालूच असते. अशी जर आपण मराठी संस्कृती, मराठी शैली जी आहे, ज्याला आर्ट आणि आर्किटेक्चरमध्ये मराठा स्टाईल म्हणतो तिची जर आपण पुनर्रचना करायला लागलो तर आपली देवळं, शिवालयं, वाडे यातून आपल्याला अतिशय सशक्त, म्हणजे महादजी शिंदे, इकडे नागपूरचे भोसले, बंगालपर्यंत, पानिपतपर्यंत, काबूलपर्यंत जी शक्ती काम करत होती तिचं कुठेतरी आपल्याला दर्शन होतं. ही शक्ती काय करत होती? ही संस्कृती हिंदू-मुसलमान असल्या बुळ्या वादात पडत नव्हती. ती मुसलमानी संस्कृतीशी संयोग करून सगळ्यांना घेऊन चालणारी, शेवटपर्यंत चालायचे, खालच्या सर्व जाती-जमातीपर्यंत ही नक्षी आपल्याला दिसू शकते. ती कधीही एककेंद्रीय, एकजातीय, एकधर्मीय अशी संस्कृती नव्हती. ज्या ज्या वेळी ती उच्च स्तरावर गेली त्या त्या वेळी ती मराठींच्या परिघाला स्पर्श करणारी होती. मराठीच्या सगळ्या परिघाला साहित्याची एक त्रिज्यासारखी स्पर्श करू पाही.

साहित्याचा परिघ तेवढाच रहाणं हे दुर्दैवानं महाराष्ट्रात गेल्या १०० वर्षांत होत नाही, म्हणजे हा असा प्रकार पुन्हा जेव्हा होईल तेव्हा, आजही मराठी, जगातल्या भाषांची क्रमवारी केली तर निदान पोर्तुगीजच्या किंवा इटालियनच्या बरोबरीत मराठी निश्चितपणे येईल. जगातल्या पहिल्या समृद्ध दहा संस्कृतीपैकी एक होईल. पण हा जर आपला मराठा शैलीविशेष बंगाली लोक ज्याच्यातून ऑथेल्लो तयार करतात, कारण ऑथेल्लोचं जो मराठापण होतं, ते समावेशक असं बाहेरच्या लोकांना जाणवत होतं. जी काही उदार भूमिका होती; जे काही उग्रपण होतं ते मराठी संस्कृतीमध्ये होतं त्यामुळे ते सुसूत्रपणे मराठ्यांना मान देत, हा धागा कुठेतरी निखळला आणि आपण हिंदुस्थानातीलच एक किरकोळ minor संस्कृती होऊन बसलो. ही प्रत्येक मराठी माणसाला दुःख होईल अशी परिस्थिती आहे.

ह्यापुढे जरी हे आपल्या लक्षात आलं आणि पुन्हा आपल्याला या गोष्टींची पुनःर्रचना करणं जमलं, तरी आजच्या या जगाच्या संरचनेत आपल्याला बरंच महत्त्वाचं स्थान मिळणं शक्य आहे. जर आपण सत्य गाडून टाकायच्या सवयी टाकून दिल्या तर! आपण मुख्य प्रवेशद्वारातून सत्याचं स्वागत केलं नाही तर ते मागच्या दारानं कुठूनतरी येऊन बसलेलं असतं; किंवा दारं खिडक्या तोडून आत आले असते. सत्याची ताकद प्रचंड असते. विध्वंस करूनही ते तुमच्या घरात येऊ शकतं. म्हणून तरी सत्याचा आदर करण्याची गरज असते. हेसुद्धा आपण अनेक वर्ष करीत नाही आहोत. उदाहरणार्थ, आंबेडकरांची क्रांती याच प्रकारात बसेल. जातीसंस्थेला जे आपण नीच मानतो त्याच्यात दिसेल, इतकंच नाही तर देशी परंपरा देशी शैली यांना दुय्यम

स्थान मिळतंय त्याच्यात असेल.

दलितांप्रमाणे स्त्रियांचे प्रश्नसुद्धा असेच विध्वंसक आहेत. १३व्या शतकात देवगिरीच्या रामदेवरायाची राणी कामाडू हिला बळजबरीनं सती जाणं भाग पाडलं. तेव्हापासून ते आजपर्यंत स्त्रियांचं परावलंबन तसंच आहे. सिंघणानं, तिच्या सावत्र मुलानं तिला सती जाण्याबद्दल धमकीच दिली तेव्हा ती तिच्या बापाकडे जीव वाचविण्यासाठी गेली. निदान बापतरी आपल्याला वाचवेल म्हणून. पण तिचा बाप म्हणाला, हे काइ कामाई : गोड तवं रनाइजे : आणि कडू तवं सांडिजे. उठ. माझी मुलगी हातपाय बांधून सती गेली असं कोणी म्हणता कामा नये. तू सरळ सती जा. १३ व्या शतकापासूनच चोखामेळ्याने ज्या तळमळीनं मला आत येऊ द्या म्हटलं, ते आपण होऊ दिलं नाही आणि बाबासाहेब आंबेडकरांनी विसाव्या शतकात पुन्हा तेच म्हटलं, तेही आपण होऊ दिलं नाही. मग ते सत्य जर विध्वंसक मार्गांनी आत आलं, तर त्याला तोंड देणं आज भागच आहे. आणि आपण अशाच रीतीने चालत राहिलो आणि सर्वसमावेशक वृत्ती पुढे आणली नाही तर विध्वंस आपला चालू राहील. आणि जी मराठी संस्कृती १६व्या शतकापासून २०व्या शतकापर्यंत कमी-कमी होत गेली तिचं २१व्या शतकात तरी उत्थान होणं आवश्यक आहे, असं एक मराठी लेखक म्हणून मला वाटतं.

मराठी संस्कृती केवढ्या मोठ्या प्रमाणावर परक्या प्रभावांचं देशीकरण करत आली, हे आपण विसरतो. त्यामुळे मराठी भाषेचं काय होणार, अशा चर्चाही यातून सुरू होतात.अस्सल संस्कृती ही धबधब्यासारखी कोसळत विश्वाच्या अफाट पसाऱ्यात स्वत:ला झोकून देत असते. मागे सहस्रावधी ओहोळ, ओढे, झरे, नाले, नद्या, डोंगर खोऱ्यांतून शेकडो स्रोत त्यात मिसळत असतात. त्यामुळे पुढे कोसळणाऱ्यांनी मागचा अजिबात विचार करू नये. त्यांनी पुढे जाऊन विश्वाला सामोरं जावं आणि सरळ आपल्या कर्तबगारीने जे काय करता येईल ते करावं, अशा मताचा मी आहे. त्यामुळे स्वत:ला झोकून देण्याची जीं मराठी शैली १७व्या-१८व्या शतकातली होती ती आज पुनरुत्थापित करण्याची आपल्याला गरज आहे.

आपापल्या समाजाच्या मूल्यं निर्माण करण्याच्या प्रक्रियेत लेखक हिरिरीनं भाग घेत असतात, असं मी पहिल्यापासून मानतो, आणि याच कसोट्या मी दुसऱ्यांनाही लावतो. अशा मूल्यनिर्मितीत लेखक भाग घेतात, म्हणून त्यांना गौरवाचं स्थान समाजात मिळतं. एरवी फक्त गमती करणाऱ्याला, रंजन करणाऱ्याला गौरवाचं स्थान समाजात नाही. हे आपण जसं एकनाथ तुकारामपर्यंत येऊन थांबतो, त्यावरूनही दिसतं. तुकारामापुढे आपण सरकत नाही, हे आपलं दुर्दैव. कारण पुढे त्या ताकदीचे मूल्यनिर्माण करणारे लोक झाले नाहीत आणि झाले त्यांना ह्या परंपरेत स्थान मिळत नाही. याच्या अनेक कारणांपैकी एक मुख्य कारण हे की, आपल्या मूल्यं निर्माण करण्याच्या ज्या काही व्यवस्था असतात त्याही काम करत नाहीयेत आणि ह्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या जगण्याच्या कोलाहलात मराठी माणसाची धूळधाण उडत चालली आहे. आपल्याच इतिहास घडवण्यावर आपला ताबा राहिला नाही. असा इतिहास घडवणारी मूळ मराठी शैली होती. पण तीच आता आपल्याला सापडत नाही.

आता लेखकाला मूल्यनिर्मितीत महत्त्वाचं स्थान दिलं जातं ते अशामुळे की त्यानं कायम सत्यच बोलावं, त्यानं पक्षपाती असू नये, अशी वाचकांची अपेक्षा असते. तर कारण नसतांना लेखकानं आपल्याच मित्रांचा गौरव केला, किंवा आपल्याच जातीचा किंवा धर्माचा गौरव केला किंवा महाराष्ट्राचा खोट्या गोष्टींसाठी गौरव केला तर वाचकांना वाटतं की, हे बरोबर नाही, हा कुठे तरी पक्षपात करतो आहे. सत्यासाठी लेखकानं किंमत द्यावी, असंसुद्धा वाचकांना वाटत असतं. वाचकांचं हे बरं असतं की बसल्या बसल्या त्यांना वाटतं की लेखकानंच किंमत मोजावी. म्हणजे ते स्वत: मोकळे.

पण ह्यामुळेच हा लेखक-वाचकांमधला अलिखित करार पिढ्यान पिढ्या चालू असतो. वाचकांनी लेखकाचा गौरव का म्हणून करावा? मी गोवा सोडून मुंबईला ट्रकमध्ये माझं सामान घेऊन जात असतांना बॉर्डरवरचा ऑफिसर ट्रकमधली पुस्तकं पाहून म्हणाला, ही तुम्ही विकायला चाललात का पुस्तकं? मी म्हणालो, मी प्राध्यापक आहे. तेवढ्यात त्यानं खोका उघडून पाहिलं. मी पुस्तकाच्या पहिल्या पानावर नेहमी माझं नाव मोठ्या अक्षरात टाकतो. ते पाहून तो म्हणाला, तुम्ही ते नेमाडे लेखक का? तुम्ही जा. नाक्यावर थांबायची गरज नाही. हे मला त्यानं काय म्हणून सोडून द्यावं? कारण मी लेखक आहे. ह्यामागे मी आता म्हटलेला एक अलिखित करार आहे - मला तो गौरवाचं स्थान देतो आहे कारण मी खरं बोलतो, पक्षपात करत नाही. तो तपासणारा माणूस कोण होता, कोणत्या प्रांतातला होता, कोणत्या जातीचा होता, कोणत्या धर्माचा होता हे मला माहीत नाही. त्याची भाषाही मराठी नसावी. परंतु तो एक वाचक होता आणि त्यानं मला मानलं.

ही अत्यंत निखळ प्रेमाची अशी जी बाब आहे. ती आजच्या जगात दुर्मिळ आहे. याचं काय मोल आहे, हे समजण्यासाठी वाचक तर तुम्ही आहातच, पण तुम्ही लेखक झाल्याशिवाय कळणं सोपं नाही.

अशा उत्कटतेनं वाचक प्रेम करतात याचा प्रतिसाद आपण त्याची काहीतरी किंमत देऊन घडतो. आता या किंमत देण्याच्या करारानुसार जेव्हा मला मानाचं स्थान असेल तर त्याचा मी गैरफायदा घेणं बरोबर नाही. नुस्तं पक्षपात करत नाही असं दाखवत राहिलं आणि आतून पक्षपात करत गेलो किंवा नुस्ता बहाणा करत गेलो की मी खरंच बोलतोय तर हे वरपांग लोकांच्या लक्षात लगेच येतं. कारण ज्या मध्ये लेखक आणि वाचक बरोबरच पोहत असतात असं भाषा हे अत्यंत पारदर्शी, फारच पारदर्शी असं एक माध्यम आहे. ह्या माध्यमात कोण कुठल्या बाजूला गचांडी मारतो, कोण कुठल्या बाजूला उलटा फिरतो हे वाचकांना बरोबर कळतं. त्यामुळे लेखनाचा हा करार पाळणं भाग असतं, वाचकच त्याला भाग पाडतात.

आता अजून एका मूल्यकचाट्यात लेखक सापडलेला असतो. तेही मूल्यं निर्माण करण्याचा दृष्टीनं आवश्यक असतं. ते आपण बघू या. लेखक हा सामाजिक वास्तवाकडून सतत गरोदर होणारा मादीसारखा गर्भशापित प्राणी आहे. पण त्याला बाळंतपणासाठी एक कोना लागतो. तोही सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेल्या समाजात मिळणं दुरापास्त होतं. म्हणजे बरेच लोक चांगलं लिहू शकतात परंतु लिहिण्यासाठी जी उसंत लागते ती मिळू नये, अशीसुद्धा व्यवस्था शत्रूंनी केलेली असते.

याची उदाहरणं म्हटली तर केशवसुतांपासून अश्लीलतेच्या खटल्याला तोंड देणाऱ्या मर्ढेकरांपर्यंत सगळ्यांनाच दिसतील. ह्या गरोदर अशा लेखकांना कधीही प्रसूतीची उसंत मिळू नये अशी व्यवस्था आपण कुठेतरी केली आहे. त्यामुळे आपल्याकडे संबंध २०व्या शतकात अतिशय खुजे असे लेखक मराठीत झोलेल दिसतात. महाकाय असे लेखक झालेच नाहीत. झालेले ते साने गुरुजींसारखे काही थोडे झाले. ते सुद्धा त्यांना कायम तुरुंगात टाकलं जायचं, म्हणून ते तिथे लिहू शकले. त्यांना तिथे तो बाळंतपणाचा कोना मिळत गेला. बाहेर असते तर त्यांच्यामागे व्याख्यानं, सामाजिक कामं, चर्चासत्रं अशी लागली असती आणि त्यांनी काही लिहिलं नसतं. अर्ध आयुष्य त्यांचं कैदेत गेलं म्हणून ते महाकाय लेखक होऊ शकले.

असे फार थोडे मराठी लेखक झाले कारण, गरोदर माणसानं प्रसूत होऊ नये अशी एक व्यवस्था समाजानं केल्यामुळे अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपली सृजन प्रक्रिया मराठी लेखक सांभाळत असतात. कशीबशी २-४ पुस्तकं, ती सुद्धा तकलादू, २५-३० पानी कवितांचं पुस्तक, ४०-५० पानी कादंबरी ती छापत छापत लांबवून शंभरापर्यंत नेलेली - अशी सगळी आपल्याकडची विसाव्या शतकातली ही परंपरा आहे. ते प्रचंड असं काही होत नाही याचं कारण निर्मितीप्रक्रियेत जी समाजशास्त्रीय जमीन उगवण्यासाठी माती ती नसली तर नुस्ता पाऊस पडून, नुस्त बी पेरून फार काही तरारत नाही. ही जमीन आपल्याकडे तयार होत नाही. त्यामुळे काय होतयं की कमी पावसाच्या प्रदेशातल्या वनस्पतीसारखं पाऊस पडल्याबरोबर उगवून झटपट तरारुन फुलून बी तयार करून मोसमाचा जास्तीत जास्त उपयोग करुन २ महिन्यात नाहीसं होणं असं रूपक म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासाकडे पाहता येतं.

नव्या मराठी लेखकाला असं सारखं वाटत असतं की आता आपण तिशीपर्यंत आलो तरीसुद्धा आपल्याला अजून महाराष्ट्र राज्य वार्षिक पारितोषिक सुद्धा मिळालं नाहीय. मग काहीतरी केलं पाहिजे, भेटलं पाहिजे कुणाला तरी. पुढे आपलं खरं नाही. कारण नोकरी, मुलंबाळं झाल्यानंतर तर लिहिणं शक्यच होणार नाही. आपण निदान जमेल तर एकादा संग्रह तरी काढूनच टाकू. अशा तऱ्हेच्या वातावरणातून जे काही अपक्व अपुरं, अबॉर्शन, बालमृत्यू मराठी साहित्यकृतीच्या बाबतीत होत असतं. याला सर्वस्वी आपली सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे.

मित्र हो, शेवटून मी सांगू इच्छितो की पूर्वी आपल्या जुन्या किल्ल्यांमध्ये आणि वास्तूंमध्ये गोलघुमटासारख्या अशा जागा केलेल्या असायच्या तिथून बोललेलं त्या सर्व परिसरात स्पष्टपणे ऐकू येई. आवाज सर्वत्र घुमत असे. तिथे पुटपुटलेलं ही सर्वत्र स्पष्ट ऐकू येई. हा असा एक बिंदू एवढ्या वास्तूत त्या वास्तुशास्त्रज्ञानं निर्माण केलेला असे. एरवी अन्यत्र तुम्ही कितीही मोठ्यानं ओरडला तरी फार दूर ऐकू जात नसे. असा एक आश्चर्यकारक बिंदू सापडेपर्यंत साहित्यिकांनी आविष्कार करणं कुचकामी ठरतं. कधी तरी जिथे पुटपुटले तरी ते सर्व समाजभर मोठ्यानं पडसाद उमटतील अशी जागा नेमकी आपल्याला सापडेपर्यंत लेखकानं तिचा शोध घेत राहाणं एवढं तरी लेखक करू शकतात. बऱ्याचदा अशी भीती वाटते की ही

जागा आपल्याला सापडायचीच नाही आणि आपण असेच नाहीसे झालो तर? तर त्याची पण तयारी ठेवायची. पण मी असंच लिहिणार आणि ऐकू जाईल असंच लिहिणार, नाही लिहून झालं तर चालेल. ही अशी जुगारी वृत्तीही लेखकाला लागते.

ही जोखीमही ह्या शोधाचा आणि निर्मितीचा एक भागच असतो. पण एकदा ही जागा सापडली की समाजातल्या कानाकोपऱ्यापर्यंत तुमच्या संज्ञाशक्ती पोहोचतात आणि तुमच्या आविष्काराचे स्रोत दोन्ही बाजूनी - मनात येणारे आणि मनाबाहेर जाणारे - भक्कम होतात. नाही सापडलं तर नाही, पण सापडेल ते अतिशय उत्तम सापडेल यावर विश्वास ठेवून पुढे जावं. मग तुम्ही लिहिता लिहिता प्रत्यक्षात कोसळत राहिला तरी चालतं. संज्ञाशक्तीची रूपं त्याला आपण होऊन सांभाळून घेतात. टीकास्वयंवरच्या सुरुवातीच्या अवतरणात मी कवीकुलगुरु मिर्जा गालिबच्या ह्या ओळी दिल्या होत्या.

*दैर नहीं हरम नहीं दर नहीं आस्तां नहीं*

मंदिर नाही, मशीद नाही, दरवाजा नाही, कोणाचा उंबरठा नाही.

*बैठे है रहगुजरपे हम गैर हमे उठाये क्यौं?*

आम्ही बसलो आहोत भर रस्त्यावर, भलत्यांनी आम्हाला कां उठवांव?

ही तशी एक जागा, गालिबला सापडलेली. दुर्दैवानं आपण साहित्यिक कुठल्या तरी भलत्या बंधनात सापडून आयुष्यभर कशाचे तरी ओलिस म्हणून जगत राहतो. त्यामुळे आपल्याला अशी जागा सापडत नाही. काही लेखक कुठल्या तरी राजकीय पक्षाचे ओलिस झालेले असतात, कुठल्या तरी विचारसरणीचे गुलाम झालेले असतात. त्या पक्षाचं काम करत राहतात. त्यांना सत्य सापडणं शक्यच नसतं. कोणी राष्ट्रीयतेचे पुरस्कर्ते राष्ट्रीयताच मानत असतात. राष्ट्रीयतेइतका मोठा दहशतवाद दुसरा कुठलाच आज नाही, अशी परिस्थिती आहे. कोणी जुनाट धर्माच्या आदेशांचं पालन करत असतात. तर कोणी कपोलकल्पित भूतकाळाचे ओलिस असतात. काही जण तर एल.आय.सी.चे ओलिस झालेले असतात आणि आयुष्यभर ते हप्ते फेडीत राहतात. त्यामुळे निर्मितीप्रक्रियेच्या जागा अशा कोणाला सापडणं शक्य होत नाही.

ह्यामुळे होतं असं की, आपल्याला विस्तीर्ण समाजमनाच्या वरच्या आणि अंत:स्तरातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म स्पंदनांचं संवेदन होणं बंद होऊन जातं. समाजजीवनातले जांभळ्याच्यावरचे आणि तांबड्याच्याखालचे रंग दिसत नाही. आणि आपल्याला दिसत नाहीत म्हणून ते नसतातच असं आपण अभिनिवेशानं मांडत जातो. ते खरं तर तिथे असतातच, ते दिसण्यासाठी खास संवेदनशक्ती निर्माण करावी लागते. जे कळलं नाही ते आपल्याला कळलं असं समजून लिहीत सुटणारे लेखक रोमँटिक, कलावादी, अवास्तव, रंजक -असं मूल्यविवेकाशी काहीही संबंध नसलेलं लेखन करत राहतात. आणि दुर्दैव आपलं असं की, अशा लोकांची युगंची युगं आपल्याकडे तयार होतात. एकदोन लेखक असे असले तर चालते, पण युगंची युगं अशा लेखकांची आपल्याकडे व्हावी? विनोदी लेखकांचंच एक युग निर्माण होतं. सांस्कृतिकदृष्ट्या विकसित लोकांना हे शोभत नाही. मराठीला तर हे अजिबात शोभत नाही. कारण मराठीची अतिशय विकसित अशी वाङ्मयीन संस्कृती आहे.

आपण पाहिलं की ज्या मुख्य कारणासाठी साहित्यिकांचा गौरव केला जातो, ते म्हणजे त्यांनी मूल्यसंवर्धन करावं. त्यासाठीच अशा प्रकारचं साहित्य समाजाच्या मध्यवर्ती ठिकाणी सतत असलं पाहिजे. निव्वळ रोमँटिक, कलावादी, रंजक किंवा तकलादू साहित्य समाजाच्या मध्यवर्ती ठिकाणी येणं हे सगळ्यांनाच घातक आहे. हल्ली अशी आशा वाटते की लवकरच आपल्याकडे बरी परिस्थिती येईल. त्याची चिन्हं आता दिसताहेत. उदाहरणार्थ सरकारी बक्षिसांवर मान्यतेसाठी विसंबून राहावं, अशी आज काही परिस्थिती राहिलेली नाही. कुणावर रिव्ह्यू चांगला आला म्हणून ते पुस्तक गाजेल, अशी पूर्वीसारखी स्थिती आता नाही, पूर्वी अशीच परिस्थिती होती की, सत्यकथेत तुमचं काही छापून आलंय का? सरकारी बक्षीस मिळालं आहे का तुम्हाला? नाही ना, मग तुम्ही लेखक नाही. आणि ही बक्षीसंसुद्धा अडीचशे रुपये विभागून अशी मिळायची. त्यासाठी मोठमोठे मराठी लेखक अर्ज करीत असत.

इतकी अशी वाईट परिस्थिती मान्यतेच्या क्षेत्रात ४० वर्षांपूर्वी होती. ती रा. सुनील देशमुख सारख्यांनी आता कायमची घालवून टाकली आहे. सरकारला - तुम्ही गेला खड्ड्यात, असं आता म्हणायची सोय झाली आहे. एकूण अभिरुचीच्या क्षेत्रातही नवीन पिढीतली मुलं ज्या कविता लिहितात, एकूण जे काही लिहितात, वाचतात ते अतिशय मनापासून, जाज्वल्य असं असतं. आणि ह्या आधारावर मी असं म्हणू शकतो की येत्या शतकात आपली जुनी मराठी शैली परत आपल्याला सापडेल आणि मराठीचा दर्जा सुधारेल. असे म्हणून मी माझे भाषण संपवतो.

❑

*संवादिनी २००२